# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. ०२/०३/२०१९**

आज शनिवार दि. ०२/०३/२०१९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी १०.०० वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. २१/०२/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | डिम्पल विनोद मेहता | महापौर |
| २) | चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | व्यास रवि वासुदेव | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | भोईर राजू यशवंत | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ११) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १२) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २१) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २३) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २४) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २५) | जैन गीता भरत | सदस्या |
| २६) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २७) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २८) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २९) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ३०) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३१) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३२) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३३) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३५) | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | सदस्या |
| ३६) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३७) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३९) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४०) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४१) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४३) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४४) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४५) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४६) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४७) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४८) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ४९) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५०) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५२) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५३) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५५) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५६) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५७) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५८) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५९) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६१) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६२) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६३) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६४) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६५) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६७) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६८) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६९) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७०) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७१) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७२) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७३) | भावसार वंदना संजय | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| **७४**) | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| **७५**) | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| **७६**) | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| **७७**) | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| **७८**) | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| **७९**) | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| **८०**) | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| **८१**) | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| **८२**) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| **८३**) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| **८४**) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| **८५**) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| **८६**) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| **१**) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| **२**) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| **३**) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| **४**) | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| **५**) | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |
| **६**) | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| **७**) | **भोईर विणा सुर्यकांत** | **सदस्या** |
| **८**) | **भोईर कमलेश यशवंत** | **सदस्य** |
| **९**) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |

**रजेचा अर्ज - निरंक**

**मा. महापौर :-**

सचिव महोदय सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा . विशेष महासभा शनिवार दि . ०२/०३/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०८ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे .** आजच्या विशेष महासभेमध्ये अंदाजपत्रकाचे विषय घेण्यात आलेले आहेत तरी महानगरपालिकेला स्थायी समिती सभापती श्री. ॲड. रवी व्यास हे बजेट सादर करणेसाठी येत आहेत. त्यांनी कृपया डायसवर यायचे आहे. स्थायी समिती सभापती ॲड. रवी व्यास बजेट मा. महासभेसाठी महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करीत आहेत. स्थायी समिती सभापती ॲड. रवी व्यास हे महासभेला अंदाजपत्रक सादर करत आहेत. सन-२०१८-१९ चे सुधारीत व सन-२०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक महासभेपुढे सादर करीत आहेत. स्थायी समिती सभापती अंदाजपत्रकावरुन निवेदन सादर करत आहेत.

**मा. सभापती (स्थायी समिती) :-**

मा. महापौर यांच्या परवानगीने बोलतो, आजच्या ह्या सभेकरिता उपस्थित, सन्मा. महापौर मॅडम, उपमहापौर साहेब, आयुक्त साहेब, सभागृहनेते, विरोधी पक्षनेते, सर्व गटनेते, सर्व नगरसेवक/नगरसेविका, तसेच महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सर्व अधिकारी, पत्रकार बंधु, जेष्ठ नागरीक, सर्व नागरीक यांचे मी हार्दिक स्वागत करीत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित

व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक मांडण्याची संधी महाराष्ट्र राज्याचे आ.मा. मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्र फडणवीस, मा. आमदार श्री. नरेंद्रजी मेहता, मा. महापौर डिम्पल मेहता यांच्यामुळे मिळाली. याबद्दल मी ह्या सर्वांचे तसेच माझ्या पक्षाचे मान्यवर नेत्यांचे ऋणी आहे. भारताचे पंतप्रधान आ.मा. श्री. नरेंद्रजी मोदी, यांच्या कणखर नेतृत्वाने देशाला विकासाकडे घेऊन जाण्याचे कौशल्य तसेच जगात भारताला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची त्यांची दिव्यदृष्टी व कर्तृत्ववार प्रभावित होऊन मिरा भाईंदर शहराला विकासाकडे घेऊन जाणारा आर्थिक अंदाजपत्रक सादर करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. त्याबद्दल मला अभिमान वाटतो.

देशामध्ये राज्यामध्ये तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जनतेमध्ये "विश्वास का दौर आणि मिरा भाईंदर शहर प्रगतिकी और" घेऊन जाण्याकरीता मी माझ्या सहकार्य मार्फत प्रयत्नशिल आहे. आजच्या ह्या अंदाजपत्रकामध्ये समाजातील सर्व जाती, धर्म, तरुण, तरुणी, जेष्ठ नागरीक, व सामान्य वर्गाला विकासाकडे घेऊन जाणारे व त्यांच्या गरजा पुर्ण करणारे अंदाजपत्रक सादर करण्यास माला आनंद होत आहे. ह्या अंदाज पत्रकात शहरातील रस्ते, खड्डे मुक्त करण्यासाठी नागरिकांना अद्यावत रस्ते असावेत त्यादृष्ट्रीनेच शहरातील बहूतांश रस्ते आर.सी.सी. करणेसाठी ह्या अंदाजपत्रकामध्ये १३० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच सध्या काशिमिरा येथील मेट्रोसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या वरुन मार्गिका होणार असून शिवाजी महाराज यांच्या पुतळा झाकला जाईल याबाबींचा विचार करता भविष्यात घोडबंदर येथे सगनाई देवी याठिकाणी ६ रस्त्यांचे नाका होणार आहे व शहराच्या विविध भागात याठिकाणाहून वाहणाची ये-जा होणार असून ह्याठिकाणी सुमारे अर्धा ऐकर मध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठा असा छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यासाठी २ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच घोडबंदर येथे, मा. छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ला असून आ. मंत्री महोदय, श्री. विनोद तावडे यांनी सदरचा किल्ला व त्याबाजूचा परीसर सुशोभिकरण करणे करीता महापलिकेस सुपूर्द केला आहे. त्यांचे मी आभार मानतो. सदरचा किल्ला व त्या बाजुचा परिसर सुशोभिकरण करण्यासाठी सुमारे ५६ कोटींची तरतुद केली असून ४ कोटी महानगरपालिका फंडातुन व उर्वरित रक्कम राज्यशासनाकडून मिळणार आहे. शहरात बौध्द समाजाची फार मोठी संख्या असून त्यांची अनेक वर्षापासून त्याच्या समाजाकरीता बौध्द विहार बांधावे अशी त्यांची मागणी होती. सदर मागणीचा विचार करता त्याला महासभेत मंजूरी दिलेली आहे. सदरची काम संकल्पचित्र तयार केले असून बांधकामाकरीता सूमारे २० कोटीची तरतूद केलेली आहे. त्याकरिता पहिल्यावर्षी ५ कोटी मनपा फंडातून व पुढील रक्कम शासनाकडून अनुदान रूपात घेऊन सदरची वास्तू पुर्ण करण्यात येणार आहे. स्वर्गिय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गिय प्रमोद महाजन यांचे कलादालन उभारून पुढील केलेल्या सर्व माहिती उपलब्ध होणे करीता त्याठिकाणी त्यांची वास्तू बांधण्यात येणार आहे. त्याकामी १५ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी महाराणा प्रताप लोक पूरुष सरदार वल्लभभाई पटेल व माजी राष्टपती स्वर्गिय डॉ. अब्दुल कलाम यांचे पुतळा उभारण्याचे असून त्याकरिता १.५० तरतुद केलेली आहे. मिरा भाईदर शहर हे प्रामुख्याने आगरी कोळी ह्या लोकांचे शहर असून त्यांचे अनेक वर्षापासून आगरी भवन बांधण्याची मागणी होती. सदरची मागणी मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता, मा. महापौर डिम्पलजी मेहता. यांच्या अथक प्रयत्नाने व मा. मंख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस यांनी सार्वत्रिक निवडणूकी वेळी दिलेल्या शब्दा प्रमाणे दि. २७-०२-२०१९ रोजी कॅबीनेट मध्ये मंजूरी देऊन दि. २८-०२-२०१९ रोजी आगरी समाजाला जागा देण्यासंबधी त्याची अधिसुचना काढून आगरी समाजाच्या प्रतिनिधीच्या ताब्यात दिली. सदर कामी शासनाकडून १० कोटी अनुदान म्हणून देणार आहे त्याची तरतूद देखील ह्या अंदाजपत्रकात केलेली आहे. याबाबत मी आदरणीय मुंख्यमंत्री श्री. देवेंद्र फडववणीस, मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता, मा. महापौर श्रीम. डिम्पल मेहता यांची मी आभार मानतो. शहरातील महिला व बालकल्याण विकासाकरीता ५ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच मिरारोड येथील इंदीरा गांधी रुग्णालय व वाढीव मजल्याकरीता ३ कोटीची तसेच पंडीत मिमसेन जोशी रुग्णालय करीत सोयी व सुविध करीत ५ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. ह्या अंदाजपत्रकात भविष्यात आपल्या हॉस्पीटलमध्ये नविन ऑपरेशन थियटर नविन आय सी यू उपलब्ध होणार आहे ह्याकरीता देखील तरतूद केलेली आहे. शहरातील मतिमंद मुलांच्या विकासाकरीता शाळा बांधकामाकरीता ३ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. पशु वैद्यकिय चिकित्सा करीता १.५० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच शहरातील विविध आरक्षण विकसीत करण्याकरिता २३ कोटीची तरतुद केलीली आहे. व राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ वरून पुतळ्याखाली जागृत उद्यान पे ॲन्ड विकसीत करणेकरीता ४ कोटीची तरतूद देखील केलेली आहे. शहरात उंच उंच इमारती विकसीत होत असून सध्या मनपा कडे असलेल्या अग्निशमन विभागाच्या लॅडरची उंची कमी

असल्यामुळे उंच इमारतीना आग लागल्यास त्या विझविणे जिकरीचे होते ह्या बाबीचा विचार करता ७० मीटर उंची पर्यंत जाणा-या टी टी एल व ए पी एल ह्या प्रकारचे आधुनिक सिड्या घेण्याकरिता ह्या अंदाज पत्रकात १७ कोटीची तरतूद केली आहे.

शहरातील साफसफाई घनकचरा बायोमायनिंग व कच-याची विल्हेवाट लावण्याकरीता ३० कोटीची तरतुद केलेली आहे.

शहर वाढत असून गुन्हेगारीचे वाढते प्रमाण पाहता त्यावर नियंत्रण ठेवणेकरीता सी सी टी व्ही कॅमेरे महत्वाची भुमिका बजावत असून त्याकरिता १० कोटीची तरतूद केलेली आहे. भाईदर पश्चिमेला जो अभाव होता ते क्रिडरसिकांना सुविधा उलब्ध होण्याच्या दृष्टीने यु येस्ट  स्पोर्टस कॉम्पलेक्स क्लब म्हणजे कला क्रिडा व सांस्कृतिक भवन भाईदर पश्चिम ६० फिट रोड येथे उभारण्याकरीता ६ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच स्केटिंग करिता मैदान तयार करण्याकरिता २ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तरणतलावा करीता २ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे ,शहरातील तलाव सुशोभिकरण अद्ययावत करणेकरीता १० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच शहरातील वाहतूक कोंडीस सोडविणेकरीता बहूउद्देशिय जैसलपार्क ते घोडबंदर हा रस्ता तसेच राई मुर्धा ते उत्तन हे रस्ते टप्पा दोन ह्यामध्ये विकसित करावयाचे असुन त्याकामी २७० कोटी तरतुद केली असुन शासनाकडून अनुदान घेऊन सदरची कामे करावयाची आहे.

शहरातील बी.एस.यु.पी. योजना अर्धवट अवस्थेत होती. ती पुर्ण करण्याच्या उद्देशाने २०० कोटीची तरतुद केली असुन एम.एम.आर.डी.ए. कडून १८० कोटी व महानगरपालिकेकडून २० कोटीची तरतुद देखील केलेली आहे.

भाईंदर रेल्वे स्टेशन हे वर्दळीचे स्टेशन असून ते मिरा भाईंदरचे प्रमुख आकर्षण आहे. त्यावर मोठ्या संख्येने गावावरुन नागरीक येत असतात त्यामुळे भाईंदर पुर्व व भाईंदर पश्चिम स्टेशन सुशोभिकरण करणेकरीता ५ कोटीची तरतुद केलेली आहे. मिरा भाईंदर शहरातील दिव्यांगां करीता उर्दु शाळा करीता १ कोटीची तरतुद केलेली आहे.

आपल्या शहरात सर्वत्र एल.ई.डी. दिवे लावण्याचे प्रस्तावित आहे. यात देखील तरतुद केलेली आहे. परिवहन सेवेतुन शहरातील नागरीकांसाठी नविन बसेस खरेदी साठी १२ कोटींची तरतुद केलेली आहे.

तसेच महिला सक्षमिकरण, अंध अपंग, दुर्बल घटक, जेष्ठ नागरीक यांच्यासाठी नवनविन योजना राबविणेकरीता अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. नागरी सेवा सुविधा यामध्ये मुलभुत सेवा सुविधा पुरविण्यासाठी अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात आलेली आहे. या अंदाजपत्रकात कुठल्याही प्रभागावर घटकावर अन्याय होणार नाही याचा विचार करुन तसेच भावी काळात शहराचा होणारा विकास झपाट्याने वाढणारी लोकसंख्या ह्या प्रमाणात  महापालिकेचे मर्यादीत उत्पन्न ह्या उत्पन्नातुन शहरातील सर्व घटकांना दिलासा देण्याचे धेर्य जवळ ठेवले आहे. हे अर्थसंकल्प तयार करतांना आमचे लोकप्रिय आमदार श्री. नरेंद्रजी मेहता यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याच बरोबर स्थायी समितीचे सर्व सदस्यांनी अर्थसंकल्पावर अत्यंत चांगली चर्चा घडवून आणली. त्याच बरोबर काही मोलाच्या सुचना सुचविल्या तसेच महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, अधिकारी व कर्मचारी तसेच मुख्य लेखाधिकारी यांच्या कार्यालयाचे देखील मोलाचे सहकार्य लाभले याबदल मी सर्वांचे आभार माणतो,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १९९६ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन-२०१८-१९ ह्या सुधारीत व सन-२०१९-२० च्या मुळ शिल्लक अर्थसंकल्प कुठल्याही प्रकारचे कर दरवाढ न करता मा. स्थायी समितीच्या मंजुरीने मा. महापौर महोदयाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करीत आहे.

सदर अंदाजपत्रकाला आपण सर्वांनी एकमुखाने एक दिलाने सर्वानुमते मंजुरी द्यावी ही मी विनंती करतो. आपल्या सर्वांचे धंन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम सभागृहाला विनंती करतो की, सभापतीने बजेट सादर केलेला आहे. त्याच बरोबर देशात जे वातावरण आहे त्याचा आपण उल्लेख करणे त्याचे श्रंध्दांजली आणि अभिनंदन दोन्ही करुन दोन अभिनंदनाचे मी ठराव वाचत आहे. जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात केंद्रीय राखीव सुरक्षा दलाच्या (सीआरपीएफ) एका तुकडीवर दहशतवाद्यांनी केलेल्या भीषण हल्ल्यात  ४६ जवान शहीद झाले होते. दहशतवाद्यांनी 350 किलो स्फोटकं असलेल्या कारने सीआरपीएफ जवानांच्या ताफ्याला धडक देवून आयईडी स्फोट केला. यात सीआरपीएफचे अनेक जवान जखमी झाले होते.

या हल्ल्याचा सडेतोड जवाब म्हणून भारताचे पंतप्रधान मा . श्री. नरेंद्रजी मोदी, संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन, गृहमंत्री राजनाथ सिंग व तीनही दलाचे प्रमुख यांनी विचारपूर्वक सुनियोजन करुन दि.२६/०२/२०१९ रोजी पहाटे ३.३० वा. मिराज -२००० लढाऊ विमानांनी पाकिस्तान व्याप्त काश्मिर मध्ये घुसून दहशतवाद्यांचे अनेक तळ उद्ध्वस्त केले. त्यामध्ये ३२५ अतिरेकी व त्यांचे २५ जहाल प्रशिक्षक यांना २१ मिनीटामध्ये यमसदनी पाठवून पुन्हा आपल्या मायभूमीमध्ये सुखरुप परतले व आपल्या ४६ जवानांचा प्रतिशोध घेतल्याबद्दल भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन आणि गृहमंत्री राजनाथ सिंग व तीनही दलाचे प्रमुख , १२ शूर वैमानिक यांचे मन :पूर्वक आभार व त्यांच्या अफाट शौर्यास मिरा भाईंदर महापालिका व शहरवासियांचा मानाचा सलाम करीत आहोत.

तसेच दि .२७/०२/२०१९ रोजी पाकिस्तानच्या लढाऊ विमानांनी भारताच्या भारताच्या हद्दीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला असता सेनेच्या जवानांनी त्यास प्रतिउत्तर देवून त्यांचे लढाऊ विमान जमिनदोस्त केले व त्यांच्या उर्वरीत विमानांचा पाठलाग करताना भारतीय वायूसेनेचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांचे लढाऊ विमान पाकव्याप्त काश्मिरमध्ये नादुरुस्त झाल्याने त्यांनी हवाई छत्रीद्वारे खाली उतरण्याचा प्रयत्न केला परंतु ते पाकव्याप्त काश्मिरमध्ये असल्याने त्यांना पाक सैनिकांनी पकडून त्यांचा छळ केला, मारहाण केली त्याही परिस्थीतीत त्यांनी कोणतीही गुप्त माहिती न देता सतत "जय हिंद" हे ब्रीदवाकय म्हणत राहीले . त्यांच्या या वीरशौर्याला देखील मिरा भाईंदर महापालिका व शहरवासियांचा सलाम करीत आहोत.

तसेच त्यांना पाकिस्तानी सैनिकांकडून सोडविण्याकरीता भारताचे पंतप्रधान मा . श्री. नरेंद्रजी मोदी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव आणून विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांची दि .०१/०३/२०१९ रोजी मुक्तता केली त्याबद्दल आम्ही भारत सरकारचे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचे या दोन्ही अतुलनीय कर्तृत्वाबाबत अभिनंदन ठराव मांडत आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर ठरावाला अनुमोदन देतांना एक बाब नमुद करावशी वाटते की, भारताच्या आणि जगाच्या इतिहासामध्ये प्रथमच ६० ते ७० तासाच्या आत मध्ये आपले अभिनंदन हे वेगवान पध्दतीने भारतामध्ये आले ही एक अभिनंदनाची बाब आहे. आणि ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १३२ :-**

जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात केंद्रीय राखीव सुरक्षा दलाच्या (सीआरपीएफ) एका तुकडीवर दहशतवाद्यांनी केलेल्या भीषण हल्ल्यात ४६ जवान शहीद झाले होते. दहशतवाद्यांनी 350 किलो स्फोटकं असलेल्या कारने सीआरपीएफ जवानांच्या ताफ्याला धडक देवून आयईडी स्फोट केला . यात सीआरपीएफचे अनेक जवान जखमी झाले होते.

या हल्ल्याचा सडेतोड जवाब म्हणून भारताचे पंतप्रधान मा . श्री. नरेंद्रजी मोदी, संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन, गृहमंत्री राजनाथ सिंग व तीनही दलाचे प्रमुख यांनी विचारपूर्वक सुनियोजन करुन दि.२६/०२/२०१९ रोजी पहाटे ३.३० वा. मिराज -२००० लढाऊ विमानांनी पाकिस्तान व्याप्त काश्मिर मध्ये घुसून दहशतवाद्यांचे अनेक तळ उद्ध्वस्त केले. त्यामध्ये ३२५ अतिरेकी व त्यांचे २५ जहाल प्रशिक्षक यांना २१ मिनीटामध्ये यमसदनी पाठवून पुन्हा आपल्या मायभूमीमध्ये सुखरुप परतले व आपल्या ४६ जवानांचा प्रतिशोध घेतल्याबद्दल भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन आणि गृहमंत्री राजनाथ सिंग व तीनही दलाचे प्रमुख , १२ शूर वैमानिक यांचे मन :पूर्वक आभार व त्यांच्या अफाट शौर्यास मिरा भाईंदर महापालिका व शहरवासियांचा मानाचा सलाम करीत आहोत.

तसेच दि .२७/०२/२०१९ रोजी पाकिस्तानच्या लढाऊ विमानांनी भारताच्या भारताच्या हद्दीत घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला असता सेनेच्या जवानांनी त्यास प्रतिउत्तर देवून त्यांचे लढाऊ विमान जमिनदोस्त केले व त्यांच्या उर्वरीत विमानांचा पाठलाग करताना भारतीय वायूसेनेचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांचे लढाऊ विमान पाकव्याप्त काश्मिरमध्ये नादुरुस्त झाल्याने त्यांनी हवाई छत्रीद्वारे खाली उतरण्याचा प्रयत्न केला परंतु ते पाकव्याप्त काश्मिरमध्ये असल्याने त्यांना पाक सैनिकांनी पकडून त्यांचा छळ केला, मारहाण केली त्याही परिस्थीतीत त्यांनी कोणतीही गुप्त माहिती न देता सतत "जय हिंद" हे

ब्रीदवाकय म्हणत राहीले . त्यांच्या या वीरशौर्याला देखील मिरा भाईंदर महापालिका व शहरवासियांचा सलाम करीत आहोत.

तसेच त्यांना पाकिस्तानी सैनिकांकडून सोडविण्याकरीता भारताचे पंतप्रधान मा . श्री. नरेंद्रजी मोदी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव आणून विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांची दि .०१/०३/२०१९ रोजी मुक्तता केली त्याबद्दल आम्ही भारत सरकारचे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचे या दोन्ही अतुलनीय कर्तृत्वाबाबत अभिनंदन ठराव मांडत आहोत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर शहर हे प्रामुख्याने आगरी कोळी समाजाचे मुळ गाव असून आगरी समाजाच्या लोकांचे आगरी भवन उभारण्याकरीता जागा मिळावी म्हणून २०११ मध्ये महापालिकेने ठराव करुन जागा देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता परंतु काही अपरिहार्य कारणामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आल्यामुळे मोठया प्रमाणात आगरी समाजामध्ये नाराजी पसरली होती.

मिरा भाईंदर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१७ करिता महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस हे मिरा भाईंदर शहरामध्ये निवडणुक प्रचाराकरिता आले असता त्यांची जाहिर सभा जैसल पार्क चौपाटी भाईंदर (पुर्व) येथे आयोजित केलेली होती . सदर सभेमध्ये मा . मुख्यमंत्री महोदयांनी आगरी समाजाच्या भवनाकरीता आमचे सरकार जागा देईल असे जाहिर केले होते.

तद्नंतर मिरा भाईंदर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडूक २०१७ मध्ये भाजपाची सत्ता आल्यानंतर आगरी समाजाकडून आगरी भवनाकरीता जागा मिळावी म्हणून सतत मागणी होत राहीली . त्याअनुषंगाने आगरी उन्नती मंडळाचे पदाधिकारी यांनी मिरा भाईंदर शहराचे तरुण तडफदार कार्यसम्राट आमदार मा . श्री.नरेंद्र मेहता यांची भेट घेवून त्यांना आपले निवेदन दिले . त्याअनुषंगाने मा. आमदार श्री. नरेंद्र एल. मेहता यांनी आगरी समाजाला जागा देण्याकरीता , “मी मा . मुख्यमंत्री महो दयांशी चर्चा करेन ” असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे मा . आमदार श्री . नरेंद्र एल . मेहता यांनी महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्री श्री . देवेंद्रजी फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना विनंती केली असता मुख्यमंत्र्यांनी देखील आगरी भवनास जागा देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक मान्यता दिली होती.

त्याप्रमाणे मा. आमदार श्री. नरेंद्र एल. मेहता यांनी या शहराच्या प्रथम नागरीक तथा महापौर श्रीम . डिम्पल मेहता यांना पत्र देवून आगरी समाजाला जागा देण्याकरीता सदरचा प्रस्ताव दि .२६/०२/२०१८ च्या मा. महासभेत घेणेबाबत विनंती केली . त्यानुसार दि.२६/०२/२०१८ रोजीच्या मा. महासभेत विशेष प्रस्ताव घेवून त्याला ठराव क्र . ८१ नुसार आगरी समाजाला ६००० मी. जागा देण्याबाबतचा विषय बहुमताने मंजुर झालेला आहे. सदरचा प्रस्ताव शासनाकडे आवश्यक त्या कार्यवाही करीता पाठविण्यात यावा असे ठरले . त्याप्रमाणे आ ज दि . २७/०२/२०१९ रोजी कॅबीनेट मध्ये सदरचा प्रस्ताव मंजुरीला ठेवण्यात आला होता सदरचा प्रस्ताव मंजुर करुन मा . मुख्यमंत्री यांनी आपला दिलेला शब्द पुर्ण केला असून संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये हे एकमेव भव्य आगरी भवन असेल.

या शहराचे लोकप्रिय मा . आमदार श्री . नरेंद्र मेहता यांनी देखील आपला दिलेला शब्द व आगरी समाजावर असलेले प्रेम आगरी समाजाला भवनाकरीता जागा देवून दाखवून दिलेले आहे . त्याचप्रमाणे या शहराच्या प्रथम नागरीक मा . महापौर श्रीम. डिम्पल मेहता यांनी देखील आगरी समाजाच्या भवनाला जागा देण्याबाबतचा दिलेला शब्द पूर्ण केलेला आहे.

त्याबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस व त्यांचे सहकारी यांचे तसेच मा .आमदार श्री. नरेंद्र मेहता, शहराच्या प्रथम नागरीक मा . महापौर श्रीम . डिम्पल मेहता तसेच मा . आयुक्त श्री . बालाजी खतगांवकर यांचे आभार मानत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**जयेश भोईर:-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम, आता जो सभागृहनेत्यांनी ठराव मांडला तो शोक प्रस्ताव होता की अभिनंदन प्रस्ताव होता? सुरुवात त्यांनी शोक प्रस्तावा पासुन केली मग शोक प्रस्ताव असेल तर आदरांजली वाहायला पाहिजे. शोक प्रस्ताव आणि अभिनंदन प्रस्ताव एकाच ठरावामध्ये होऊ शकत नाही. माझे पुलवामा मध्ये पॅरा मिलिट्री फोर्सचे जे ४६ जवान ज्यांना विरगती प्राप्त झाली अतिरेक्यांनी अमानुष असा हल्ला केला त्याच्यामध्ये सी.आर.पी.एफ चे ४६ जवान शहीद झाले एक अमानुष असा हल्ला त्याठिकाणी ह्या सी.आर.पी.एफ. जवानांवर झाला संपुर्ण देश हळहळला आज या सभागृहातर्फे त्या जवानांना श्रध्दांजली वाहण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब, आपल्या सर्वांच्या भावणा याबाबत निश्चित पणे तिर्व आहेत, परंतु आपण श्रध्दांजलीचे ठराव ही सभा संपल्या नंतर घेऊया.

**रोहिदास पाटील :-**

मला असे वाटते की, अनिलजीने दिलेली सुचना ही स्वागतार्थ आहे.

**अनिल सावंत :-**

श्रध्दांजली विधान परिषद असुदे विधानसभा असुदे संसदिय लोकशाही असुदे श्रध्दांजली सुरुवातीला होते.

**मा. आयुक्त :-**

उपमहापौर साहेब, आपण श्रध्दांजली घेऊन आणि कामकाज करू.

**धृवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब आपण हे घेऊ शकत असाल तर आपण असे सांगावे.

**अनिल सावंत :-**

करु शकतो विधानसभा, संसद असुदे अगोदर श्रध्दांजली वाहीली जाते आणि नंतर कामकाजाला सुरुवात होते. असे होत नाही की कामकाज तुमचे झाले आणि नंतर लास्ट त्याला कुठेतरी वेळ असेल.

**धृवकिशोर पाटील :-**

विधानसभा लोकसभेचे कामकाज नियमाप्रमाणे होते. महानगरपालिकेचे कामकाज वेगळ्या ॲक्ट प्रमाणे होते.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

आयुक्तांनी सांगितलेले आहे श्रध्दांजली वहा आणि कामकाजाला सुरुवात करा.

**मा. उपमहापौर :-**

आयुक्त साहेब, आपण सांगितले की, श्रध्दांजली घेतली तरी चालेल परंतु आता पर्यंत महानगरपालिकेच्या संकेता प्रमाणे आपण हा कार्यक्रम सभेचा शेवटी घेऊया त्यानंतर मग कुठच्याही विषयावरती चर्चा होणार नाही कारण त्याबरोबर आपल्याला ह्या शहरातल्या अनेक मान्यवरांचे देखिल निधन मधल्या काळात झालेले आहे. त्यांचेही शोकप्रस्ताव आहेत आणि एक निश्चित मी गौरवाने सांगने सांगेण की, मिरा भाईंदर महानगरपालिका कदाचित ह्या महाराष्ट्रात अशी पहिली महानगरपालिका असेल ज्यांनी या पुलवामाच्या हमल्या नंतर एक सार्वजनिक शोक सभा श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी प्रमोद महाजन हॉल येथे आयोजित केली होती त्याला आजी/माजी नगरसेवक, विद्यमान नगरसेवक शहरातले प्रतिष्ठीत नागरीक अनेक एन.जी.ओ., आमदार, खासदार, ह्या सर्वांना आपण इथे बोलविले होते. तरी ह्या सभागृहामध्ये ह्या शुरांना ह्या विरांना अभिनंदन होणे गरजेचे आहे. आपण सभेच्या नंतर ते घेऊया.

**अनिल सावंत :-**

बालाकोटा येथे, नौदलाच्या अतुट असा पराक्रम गाजवून त्याठिकाणी अतिरेकी तळ उद्वस्त केले त्याबद्दल ह्या तिन्ही दलांचा अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

तसेच वायु सेनेचे अधिकारी अभिनंदन वर्धमान यांनी सुध्दा अतुलनिय असे शौर्य दाखवून पाकिस्तानच्या गोटामधून ते परत आले त्यासाठी सुध्दा ह्या तिन्ही दलांचे अभिनंदन असे मी कॉंग्रेस पक्षातर्फे ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

शोक प्रस्ताव मांडल्या नंतर सन्मा. सभागृह नेते यांनी एक अभिनंदनाचा ठराव मांडला.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब, त्याच्यात शोक प्रस्ताव घेतला नाही. शब्दप्रयोग केला पण शोक प्रस्ताव सादर केला नाही.

**जुबेर इनामदार :-**

ठिक आहे. तुम्ही ते काय घेतले त्याला काय नाव द्यावे लागेल?

**मा. उपमहापौर :-**

तो अभिनंदनाचा ठराव आहे.

**जुबेर इनामदार :-**

झालेल्या घटनेच्या उल्लेख केला त्याच्या नंतर सभागृह नेत्यांनी एक अभिनंदनाचा ठराव मांडला मलाही त्याचा आनंद आहे. तसे काही घडले असते तर खंर तर त्या समाजाची फसवणूक केली असा ठराव मांडायला पाहिजे आणि त्या समाजाचे तुम्ही एक प्रतिनिधी आहात.

**मा. उपमहापौर :-**

हे आमचे कष्ट आहेत त्याच्यामागे.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही कष्ट केले तुम्ही मागण्या केल्या सभागृहाने त्याला मान्यता दिली पारदर्शक कामकाज करणारे ह्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी त्यांच्या सुध्दमुखी त्यांच्या सभेमध्ये त्यांनी असे आवाहन केले होते की, मी आगरी समाजाला आरक्षण देणार आरक्षणामध्ये जागा देणार त्यांना आगरी भवन त्यांना मान्य करणार. सर्व काही असतांना सुध्दा २८ फेब्रुवारीला ही जी बैठक पार पडली त्याच्यामध्ये कदांचित तुम्ही होता की नव्हता मला तशी काही कल्पना नाही. होते तर तुम्हाला त्याची कल्पना असायला पाहिजे. सभागृहनेता साहेब की, ह्या शहराच्या आगरी समाजाची फसवणूक कशा प्रकारे करण्यात आलेली आहे. त्यांनी केली तुम्ही उगाच त्यांना कशाला पाठीशी धरता. त्यांनी ती एक फसवणूक केली आहे. ती स्पष्ट आणि कागदावर फसवणूक आहे. मी तोंडी बोलत नाही मोघम बोलत नाही.

**मा. उपमहापौर :-**

सातत्याने फसवणूक ह्या शब्दावर जाण्यापेक्षा आपण पुढे चला आम्ही खुलासा करतो.

**जुबेर इनामदार :-**

फसवणूक ह्या कारणाला बोलतो कारण त्याचा अभिनंदनाचा ठराव झाला. इथल्या आमदाराचा ठराव झाला मा. महापौरांच्या नावाचा त्याच्यात उल्लेख करण्यात आला. बरेच श्रम, बराच प्रयत्न प्रयोग त्या आगरी समाजाने ह्या विषयासाठी केला तरीही त्याला मानसन्मान देणे ऐवजी त्यांना त्यांची दिशाभूल केली जाते म्हणून मी बोलतो फसवणूक आणि भाजपा खोट्यामध्येच आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत रेटून खोटे बोलतात आणि त्यांना काही फरक पडत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

का खोटे बोलतो ते दाखवतो. तुम्हाला सिध्द करुन दाखवतो. मुख्यमंत्री बोलले आगरी भवन देतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब आपण सांस्कृतिक भवन ह्या विषयावर बोलत असाल तर आपल्या माहितीसाठी आरक्षण क्र. १२२ हे प्रत्यक्ष आरक्षण सामाजिक वनिकरणासाठी आणि खेळाच्या मैदानासाठी आरक्षित होते. याच्यामध्ये तत्कालीन आयुक्त डॉ. नरेश गिते साहेबांनी एक प्रस्ताव सादर केला होता आणि अशा वेळेला दि. २६/०२/२०१८ रोजी ह्या सभागृहात तुमच्या साक्षीने ठराव ठेवण्यात आला. ह्या ठरावामध्ये आम्ही मागणी केली होती की, ह्या आरक्षणामधले एकूण ४६,७०० चौ.मी. जागेपैकी ३५१८२ चौ.मी. इतकी जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली आहे. त्याच्यातली दिड ते दोन एकर जागा रस्त्याच्या बाजुची रस्त्याच्या साईटची जागा आपल्याला देण्यात यावी. ६ हजार चौ.मी. जागा ह्या आरक्षणातून वगळावी आणि महाराष्ट्र

नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ च्या एक प्रमाणे ह्या मुळ आरक्षणातून आगरी भवनासाठी ६ हजार चौ.मी. जागा ही आरक्षित व्हावी आणि एवढ्या साठीच मुख्यमंत्री साहेबांकडे हे प्रकरण गेले. तुम्हाला सांगु इच्छितो हे शहर हे गाव १५ व्या शतकापासून ह्या नकाशावरती आहेत. १५१६ साली उत्तनचे चर्च बांधले गेले दरिया माऊली चर्च बेथलेन माऊली चर्च बांधले गेले. १५७४ साली घोडबंदरचा किल्ला पोर्तुगीजांनी बांधला. १७३९ साली काशिमिराचे चर्च बांधले गेले. १७३४ साली मुर्धा गावातून पहिला भुसुरंग वसईच्या किल्ल्यावर पेरला. हे नावे सांगण्याचे कारण त्यावेळेला ह्या गावांची नावे अस्तित्वात होती. मुळात आगरी कोळीची वस्ती आगरी कोळी सारखा माणूस म्हात्रे, भोईर, पाटील असे १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये ४० हून अधिक स्वातंत्र्य सैनिकांनी जे समर्पण केले जे योगदान स्वातंत्र्य लढ्यामध्ये दिले. ह्या आगरी कोळ्यांची गाव आहेत. ह्या आगरी कोळी समाजाचा सन्मान झाला पाहिजे. मग आगरी भवन मागितले तर काय चूक केली नाही. त्याच्यात  अनेक लोकांनी राजकारण करण्याचा प्रयत्न केला. परंतु रोहिदास पाटील साहेबांच्या नेतृत्वाखाली ह्या सभागृहाचे माजी नगरसेवक भानुदास भोईर, मा. नरेंद्र पाटील साहेब, एकनाथ भोईर साहेब, सुरेश पाटील साहेब अशी अनेक नामवंत मंडळी ह्या समाजातल्या मंडळींनी पुढाकार घेतला स्वतःच्या खिशातले पैसे काढले. दिड करोड रुपयाचा निधी आमच्या आगरी कोळी समाजाने जमवून ठेवलेला आहे. जागेची व्यवस्था होत नव्हती. ह्या आरक्षणातून जागा मागितली अनेक लोकांनी अनेक प्रकारचे अंदाज लावले आणि महाराष्ट्र सरकारी कधीही समाज भवन किंवा सांस्कृतिक भवन ह्याच नावाने  आपल्याला पत्र देऊ शकते आगरी भवन ह्या नावाने देणार नाही. फसवणूक केली म्हणजे काय केले. काय २५-५० लोकांनी मागण्या केलेल्या त्या सभागृहामध्ये २५-५० लोकांनी ठराव केले होते. आम्ही आगरी भवनासाठी ठराव केला विरोधकांनी विरोध केला. त्यावेळचे सभेमध्ये आमचे ठरावाच्या बाजूने ५५ नगरसेवकांनी मतदान केलेले आहे आणि आपल्याकडून २८ लोकांनी त्या ठरावाला विरोध केला होता. मग अचानक आमच्या बद्दल एवढे प्रेम का. आगरी भवन ह्या जागेसाठी फक्त आगरी कोळी समाजाचा ठराव होता त्यांचीच मागणी होती आणि त्यांच्यासाठी ही जागा मिळालेली आहे. त्याच्यामुळे तुमच्या डोक्यातून हे काढून टाका. समाजाला संपूर्ण माहिती मिळालेली आहे आणि समाजाच्या भावनांचा उद्रेक होऊ नये याची सभागृहात बोलताना काळजी घ्यावी.

**जुबेर इनामदार :-**

उपमहापौर साहेब तुम्ही मोठ्याने बोलता मी हळूच बोलणार. प्रेमाने बोलणार. माझा आवाज कमी ठेऊन बोलणार. कारण मोठ्याने बोललो तर खरे बोलतो असे कधी नसते. तुम्ही ह्या शहराचा इतिहास आम्हाला परिपूर्ण परत एकदा आम्हाला ह्या शहराची माहिती दिली. आमच्या साहेबांनी म्हणजे आमच्या साहेबांकडे तेव्हा तुम्ही असणार. त्या साहेबांनी तुम्हाला  छत्रपती म्हणून पदवी दिलेलीच आहे. तुमचे त्या विषयावर काही भाग होऊ शकत नाही. मात्र परत मी त्या विषयावर येतो. प्रथमतः मी आगरी भवनाला कधीच विरोध केला नाही. ते ठराव उघडून वाचून सांगा. म्हणून बोलतो साहेब खोटे माणसाने बोलू नये. आम्ही विरोध केला होता आरक्षणाचा आरक्षणामध्ये तो मिश्र आरक्षण असल्यामुळे सामाजिक वनिकरण आणि मैदान हे दोन आरक्षण एकत्र असताना त्याचे क्षेत्रफळ निश्चित नव्हते. त्या क्षेत्रफळाला निश्चित करण्याचे संदर्भात आम्ही ठराव केला. आम्ही आरक्षण बदलण्याचा ठराव केला होता की तुम्ही हे आरक्षण सोडून दुसरे आरक्षण कुठेतरी मागा. जेणेकरुन आगरी भवन निर्माण झाले पाहिजे. आगरी बांधवांनी शहराच्या दिड दोन कोटी रुपये जमवले खरे पण साहेब ते तुम्ही वापरू शकणार नाही. ह्या परिपत्रकात अधिसुचना आहे. स्पष्ट उल्लेख आहे. ६००० चौ.मी. जागा ह्या आरक्षणामधून वगळून सांस्कृतिक भवन याकरिता आरक्षण क्र. १२२ अ अन्वये आरक्षित करण्यात येत आहे व ह्या आरक्षणाकरिता महापालिका समुचित प्राधिकरण असणार. मग आगरी भवन कसे तयार होईल. आगऱ्यांचा जो त्यांनी पैसा जमा केलेला आहे त्या आगरी भवन निर्मीतीसाठी तो तिथे कसा वापरता येईल. महापालिकेचाच निधी लागेल. महापालिकेने सांस्कृतिक भवन होणार आणि महापालिकेचाच अधिकार आणि महापालिकेला त्याला आगरी समाज कोळी समाजाला द्यायचे आहे वापरण्यासाठी भाडे तत्वावर जेव्हा जेव्हा वाटेल मी आलो मला गरज असली माझा समाजाला तर मलाही द्यावे लागेल. याचा अर्थ मागणी यांनी एक केली ३७ खाली आम्ही स्पष्ट मागणी केली होती आगरी भवनासाठी आणि आम्हाला प्राप्त उत्तर विसंगत आहे याचा अर्थ शासनाने फसवणूकच केली.

**मा. उपमहापौर :-**

आमच्या आगरीचे मन एवढे मोठे आहे ते आपली लंगोटी पण सोडून दिली म्हणून ते एवढे मोठे शहर झाले. नाहीतर एवढे मोठे शहर झाले नसते. आमचे लोक भोळे असले प्रेमळ असले तरी शुर आहेत, वीर आहेत चिंता करु नका. आम्ही तुम्हाला सगळ्यांना पुन्हा प्रेमाने जवळ करु.

**जुबेर इनामदार :-**

याच्यातून काय निष्पन्न होईल. शुर आहेत बरोबर आहे. मारामारी कराल का? मारता का जाऊन मुख्यमंत्र्यांना आपण ते करु शकत नाही.

**रिटा शहा :-**

साहेब त्यांना शब्द मागे घ्यायला सांगा. त्यांनी मुख्यमंत्र्यांना मारायची.......

**जुबेर इनामदार :-**

शुर वीर बोललो. शुरवीर मारामारीच करतात. शुर म्हणजे क्षेत्रिय झाले. ते मारामारी करणारच ना. मी मुख्यमंत्र्यांचा शब्द मागे घेतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही फार काळजी करु नका. हे आरक्षण आमच्या समाजाला आम्ही सुपुर्द केलेले आहे. त्याच्याबद्दल चिंता करु नका.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम सभागृहाला ही सभा ऐकणाऱ्या नागरिकांना, पत्रकारांना याची सर्व जाणीव आहे. लोकशाही आहे बोलायला सगळ्यांना अधिकार आहे. लोकशाही आहे शंका व्यक्त करायलाही अधिकार आहेत. पण एक नक्की ठेवा कोणावर तरी आपण विश्वास ठेवला पाहिजे. आम्ही विश्वास मुख्यमंत्र्यांवर ठेवला. मुख्यमंत्र्याने आम्ही म्हणतो तुम्हीही म्हणायला पाहिजे की त्यांनी शब्द पाळला. सभागृहाला अधिकार हे सभागृहालाच दिलेले आहेत. महापौर आहेत, आयुक्त आहेत आणि सभागृह आहे मला असे वाटते की आपण ही समाजामध्ये वेगवेगळे मॅसेज पाठविण्यापेक्षा व्हॉटसअपवर, फेसबुकवर आमची विनंती आहे समाज बांधवांची विनंती आहे. समाजामध्ये अनेक वर्ष हे प्रकरण चालले होते म्हणून वैयक्तिक आणि समाजाच्या वतीने विनंती करतो की झाले तेवढे भरपूर झाले. आता आपण सगळे एकत्र काम करुया. याच्यात शंका कुशंका असेल तर मांडावित पण ते असे न व्हावे की त्याचा वेगळा मॅसेज जावा म्हणून आयुक्त आहेत. त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. महापौरांकडून आपण मंत्रालयात जाऊया. तुम्हाला असे वाटते की कोणीतरी कन्सलटन्ट चांगले असतील तर त्यांना ही बरोबर घेऊन समाजाच्या वतीने मी बोलत आहे. जर शंका कुशंका कुठे असू शकली तर निरसन करायला आपण समर्थ आहोत. महापौर मॅडम तुमच्या सहीत आयुक्तांसहीत आता आमचे वेगळे काम चालू झाले. प्रशासकीय कामकाज आयुक्त करतील. आम्ही फक्त पैसे गोळा करणार. पैसे गोळा करायचे काम आहे. त्यामुळे असा जर तुम्ही मॅसेज दिला की पैसे तुम्ही वापरु शकत नाही काही अडचणी होतील. आमचे असे मत आहे की तुम्हाला वाटते की ही अडचण आहे तर खाजगीत बोलावे. आयुक्तांकडे बोलावे. आयुक्तांकडे तुम्ही मांडले आम्हालाही बोलून घ्यावे. पण याचा सगळा निर्णय घेण्याचा आम्हाला जेवढे समजते तेवढे किंवा आमच्या अवतीभोवती असलेले जे सल्लागार आहेत त्यांचे असे म्हणणे आहे की आपल्याला सर्वांना आयुक्तांकडे सर्व बोलायचे आहे आणि आम्ही तर विनंती करतो पक्षिय असेल तरी किंवा मान्यवर असाल तरी अनुभवी असाल तरी काही विशिष्ट खासियत असेल तरी आपण सगळे एकत्र जाऊन ह्या कामास एकत्र यावे. अशी आमची विनंती आहे. आयुक्तांकडे आयुक्त ही वेळ देतील. एकच्या ठिकाणी अनेक वेळ आपल्याला बैठकीचा वेळ देतील आणि आपल्या शंकेचे निरसन करतील मला असे वाटते की आता मांडलेल्या विषयावर फार उथक उथक चर्चा केली तुम्ही तुमचे मत मांडले इथे थांबावे अशी आमची सभागृहाला विनंती आहे. धन्यवाद.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय कदाचित शासनाला काही अडीअडचणी तांत्रिक असाव्यात नाहीतर त्यांनी आगरी भवन हे नावच देऊन पाठविले असते. आरक्षण बदलून त्यांनी त्याच्या ऐवजी सांस्कृतिक भवन असे नाव दिले. माझी तर सभागृह नेते साहेब आपल्याला विनंती आहे. म्हणजेच दानविरकरण आपल्या आमदारांनी व्हावे ते मोठे विकासक आहेत. त्यांच्याकडे बरेचशे काही भुखंड असतील. त्यांनी एखादा भुखंड आगरी समाजाला अशी दान करावी. कारण प्रत्येक पालिकेला अशाप्रकारे कुठल्या समाजाला भुखंड देता किंवा अशा आरक्षणामध्ये भवन निर्माण करुन देता येत नाही. ही तांत्रिक अडचण आहे. सभागृहनेते साहेब हे तुम्ही आणि आम्ही समजून घेतली पाहिजे. तुमचा समाज मला २५ वर्ष ह्या गावामध्ये झालेली आहेत. २५ जास्त वर्ष झाली. मी जन्माला नाही आलो तरी माझी मुले आली. त्या मुलांनी माझ्या आगरी समाजाच्या लोकांच्या बरोबरच लहानाचे मोठे झालेले आहेत. आम्हाला ही आपुलकी आहे आणि आम्हाला ही त्याचा मान आहे. ह्या शहराच्या आमची प्रामाणिक इच्छा आहे की आगरी भवन व्हावे. आगरी भवन काय प्रत्येक

समाजाचे एक भवन ह्या शहरामध्ये व्हावे ही आमची प्रामाणिक इच्छा आहे म्हणून आयुक्त महोदय ह्या विषयावर आमचे निवेदन............

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, मुख्यमंत्र्यांनी आपले काम केलेले आहे. आता ह्या सभागृहाला आपले काम करायचे आहे. आगरी भवन व्हावे अशी काँग्रेस पक्षाची पूर्वीपासून मागणी आहे आणि आगरी समाजाच्या पाठीमागे काँग्रेस पक्ष आहे आणि यापुढे राहणार आहे. परंतु तुम्ही आज बजेटमध्ये मा. सभापती यांनी सांगितले की १० करोड आम्ही ठेवले आहेत पालिकेने आगरी समाज उन्नती मंडळाने स्वतःचे पैसे जमा केलेले आहेत. त्यांना फक्त जागा पाहिजे आणि जागा त्यांना द्यावी असा एकमताने ठराव ह्या सभागृहाकडून महाराष्ट्र शासनाला पाठवा. आज तुम्ही १० करोड रुपये प्रोव्हिजन केलेले आहे. पालिकेने उद्या खर्च केल्यानंतर ती वास्तु आगरी भवनाची होणार नाही यांना जागेचा ठराव करा त्यामुळे ते आगरी भवन लवकरात लवकर होईल. पैशाचे प्रोव्हिजन बजेटमध्ये करु नका. मग ती महापालिकेची वास्तु होईल, सांस्कृतिक भवन होईल.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम आरक्षण क्र. १२२, ४६ हजार स्क्वेअर फिट उसमें से ३५ हजार अपने अंडर आया हुआ है। लेकिन २००७ में नगररचनाने ही आझाद नगर रहिवासी संघ को ऐसा पत्र दिया है की २००० स्क्वेअर फुट में ऑलरेडी अनधिकृत बांधकाम इंडस्ट्रीयल गाले, रहिवासी संघ सब उसमें समाहित है। तो ३५ हजार स्क्वेअर फिट अपने कब्जे में कैसे आया है। पहली बात तो यही है और दुसरा उसी आरक्षण में बालासाहेब सांस्कृतिक कला दालन और आगरी भवन दोनो चिजे पास हुई। उसके लिए भी में अभिनंदन करती हूँ। लेकिन इसके साथ मैं यह भी चाहती हूँ की, वहाँ के जो १९९७ के पहले से रहिवासी रहते है या इंडस्ट्रीयल गाले है आरक्षण पडने से पहले उनके लिए भी कुछ सोचा जाए। उस क्षेत्र को जहाँ वह लोग जिसके पास पुरावा है आरक्षण के पहले का उनको आर झोन में तबदील करके वहाँ पे १-२ बडे टॉवर बनाके उनको भी शिफ्ट किया जाए। ऐसी मेरी मागणी है और मैं यह खुलासा नगररचना से चाहती हूँ की जब २००० स्क्वेअर फीट पे अनधिकृत बांधकाम है ३५ हजार अपने अंडर केसे आया है।

**मा. महापौर :-**

ठिक है मैं बाद में खुलासा करने के लिए बोलती हूँ।

**तारा घरत :-**

तुम्ही आता आगरी भवन जे सांगत आहेत नक्की होईल का? का परत इथे गुड लावायचे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही फक्त सोबत रहा काम नक्की होणार.

**तारा घरत :-**

आम्ही सोबत आहोत. पण तुम्ही आगरी भवन हे देत नाहीत ना.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब एक न्युज मॉर्निंग मैं आयी थी। जिसपर मैने भी यह आरक्षण से ही रिलेटेड है........

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम, आपल्या सभाशास्त्राप्रमाणे पेपरला आलेल्या न्यूजवर सभागृहात चर्चा करता येत नाही.

**स्नेहा पांडे :-**

त्याच्यानंतर मी पण चौकशी केली मला पण हा पुरावा भेटला. पुरावा सोबत मी बोलत आहे असे मी बोलत नाही. पुरावा घेऊनच मी सभागृहामध्ये बोलते.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विष्यात आयुक्त साहेबांशी भेटून आपण चर्चा करा. हा महासभेचा विषय होत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**अभिनंदन ठराव क्र. १३३ :-**

मिरा भाईंदर शहर हे प्रामुख्याने आगरी कोळी समाजाचे मुळ गा व असून आगरी समाजाच्या लोकांचे आगरी भवन उभारण्याकरीता जागा मिळावी म्हणून २०११ मध्ये महापालिकेने ठराव करुन जागा देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता परंतु काही अपरिहार्य कारणामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आल्यामुळे मोठया प्रमाणात आगरी समाजामध्ये नाराजी पसरली होती.

मिरा भाईंदर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१७ करिता महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस हे मिरा भाईंदर शहरामध्ये निवडणुक प्रचाराकरिता आले असता त्यांची जाहिर सभा जैसल पार्क चौपाटी भाईंदर (पुर्व) येथे आयोजित केलेली होती . सदर सभेमध्ये मा . मुख्यमंत्री महोदयांनी आगरी समाजाच्या भवनाकरीता आमचे सरकार जागा देईल असे जाहिर केले होते.

तद्नंतर मिरा भाईंदर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडूक २०१७ मध्ये भाजपाची सत्ता आल्यानंतर आगरी समाजाकडून आगरी भवनाकरीता जागा मिळावी म्हणून सतत मागणी हो त राहीली. त्याअनुषंगाने आगरी उन्नती मंडळाचे पदाधिकारी यांनी मिरा भाईंदर शहराचे तरुण तडफदार कार्यसम्राट आमदार मा . श्री.नरेंद्र मेहता यांची भेट घेवून त्यांना आपले निवेदन दिले . त्याअनुषंगाने मा. आमदार श्री. नरेंद्र एल. मेहता यांनी आगरी समाजाला जागा देण्याकरीता , “मी मा . मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करेन ” असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे मा . आमदार श्री . नरेंद्र एल . मेहता यांनी महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्री श्री . देवेंद्रजी फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना विनंती केली असता मुख्यमंत्र्यांनी देखील आगरी भवनास जागा देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक मान्यता दिली होती.

त्याप्रमाणे मा. आमदार श्री. नरेंद्र एल. मेहता यांनी या शहराच्या प्रथम नागरीक तथा महापौर श्रीम . डिम्पल मेहता यांना पत्र देवून आगरी समाजाला जागा देण्याकरीता सदरचा प्रस्ताव दि .२६/०२/२०१८ च्या मा. महासभेत घेणेबाबत विनंती केली . त्यानुसार दि.२६/०२/२०१८ रोजीच्या मा. महासभेत विशेष प्रस्ताव घेवून त्याला ठराव क्र . ८१ नुसार आगरी समाजाला ६००० मी. जागा देण्याबाबतचा विषय बहुमताने मंजुर झालेला आहे. सदरचा प्रस्ताव शासनाकडे आवश्यक त्या कार्यवाही करीता पाठविण्यात यावा असे ठरले. त्याप्रमाणे आज दि . २७/०२/२०१९ रोजी कॅबीनेट मध्ये सदरचा प्रस्ताव मंजुरीला ठेवण्यात आला होता सदरचा प्रस्ताव मंजुर करुन मा . मुख्यमंत्री यांनी आपला दिलेला शब्द पुर्ण केला असून संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये हे एकमेव भव्य आगरी भवन असेल.

या शहराचे लोकप्रि य मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी देखील आपला दिलेला शब्द व आगरी समाजावर असलेले प्रेम आगरी समाजाला भवनाकरीता जागा देवून दाखवून दिलेले आहे . त्याचप्रमाणे या शहराच्या प्रथम नागरीक मा . महापौर श्रीम. डिम्पल मेहता यांनी देखील आगरी समाजाच्या भवनाला जागा देण्याबाबतचा दिलेला शब्द पूर्ण केलेला आहे.

त्याबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. देवेद्रजी फडणवीस व त्यांचे सहकारी यांचे तसेच मा .आमदार श्री. नरेंद्र मेहता, शहराच्या प्रथम नागरीक मा . महापौर श्रीम . डिम्पल मेहता तसेच मा . आयुक्त श्री . बालाजी खतगांवकर यांचे आभार मानत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदन :- श्री. जयेश भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. कमिशनर साहेब बजेटच्या विषयावर मी बोलतो. आपण जाहिरात विभागाचे किती इनकम दाखविलेले आहे? ५ वर्षापासून जाहिरात विभाग आलेला नाही. पाच वर्षामध्ये किती घाटा झालेला आहे. ५ वर्षापासून किती करोड रुपये मिळतात. १०० करोड रुपये खर्च झालेला आहे. तो मला दाखवा.

**मा. उपमहापौर :-**

अजून बजेटच्या विषयाला सुरुवात झालेली नाही. विषयाला सुरुवात होऊ द्या. मग बोला.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

बजेटमध्ये ते घेतलेले आहे का? अजून एक पण टेंडर निघाले नाही. इथे यांचा बापाचा राज चालू आहे का? टेंडर का काढले नाही ५ वर्षापासून. किती जाहिरात अजून डिस्पॅच झालेल्या आहेत. ते मला सांगा. कोणाच्या बापाचा राज इकडे चाललेले आहे. ते टेंडर काढायचे नाही म्हणून. सर्वांना माहिती नसेल किती नुकसान झालेले आहे. १०० करोड रुपये नुकसान झालेले आहे. ते पैसे कुठे गेले? मला इतक्या करोडोचा हिशोब इकडे दाखवा.

**मा. महापौर :-**

मॉरसजी अभी बोल दिए शुरुवात हमने कर दिया है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७, **परिवहन सेवेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २०८, ठराव क्र. १७३)** आपण मुळ विषय पत्रिकेवरील प्रकरण वाचन केलेले आहे. तथापी आजच्या सभेकरिता पुरक घोषणा देखील आलेल्या आहेत. मुळ विषयपत्रिकेवरील तुम्हाला जेव्हा याच्यात चर्चा करुन सुधार करायचे असतील तर हे आपल्याला क्लब करावे लागते.

**मा. उपमहापौर :-**

जुबेर साहेब ह्या क्लब करुन आपण घेतल्या ना तर आपल्याला सुधारणा करता येतील. एकदा आपण ठराव पास केल्यानंतर मग सुधारणा कशा करणार.

**जुबेर इनामदार :-**

ठराव तर तुम्ही करणारच. आमची सुधारणा आमच्या सुचना घेणार कुठे तुम्ही.

**मा. उपमहापौर :-**

घेणार ना.

**जुबेर इनामदार :-**

१०० टक्के.

**मा. उपमहापौर :-**

निश्चितपणे.

**जुबेर इनामदार :-**

शब्द देता.

**मा. उपमहापौर :-**

होय.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७ सोबतच पुरक घोषणेतील प्रकरण क्र. १४० सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचे दि. २५/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. प्रकरण क्र. १४०, **सन्मा. सदस्य श्री. जुबेर अ. इनामदार यांचा दिनांक २५/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव . -- मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०२/०३/२०१९ प्रकरण क्र. १३७ वर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट २ (ज) अन्वये प्रस्ताव सादर.** तसेच प्रकरण क्र. १४३ श्री.प्रशांत ज्ञानदेव दळवी यांचे दि. २६/०२/२०१९ रोजी पत्रान्वये प्रस्तााव प्र.क्र. १४३, **सन्मा. सदस्य श्री. जुबेर अ. इनामदार यांचा दिनांक २५/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०२/०३/२०१९ प्रकरण क्र. १३९ वर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट २ (ज) अन्वये प्रस्ताव सादर.**

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम ह्या विषयावर ज चे जे प्रस्ताव आलेले आहेत त्याच्यावर चर्चा करुन त्याच्या सगळ्यांचा एक क्लब केलला ठराव करा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

आमची नाही हरकत नाही. पा आमच्या सुचनेचे त्याच्यामध्ये समावेश होत असेल तर एक मताने आम्ही करु.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पहिले मला जाहिरातीचे हे दाखवून द्या. जाहिरातीचे किती इनकम आहे ते मला दाखवा. सभापती साहेब आपण किती इनकम दाखविलेले आहे?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. जे सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यामध्ये सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकामध्ये जाहिरातीच्या माध्यमातून ३ कोटी ३० लाख आणि होर्डिंग्जच्या माध्यमातून ५ कोटी ५० लाख असे ८ कोटी ८० लाखाची आपण अपेक्षित केलेली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

एवढीच का?

**मा. आयुक्त :-**

मागच्या वर्षाचे जर विचार केला...........

**मॉरस रॉड्रीक्स :-**

तुम्ही टेंडर काढलेले नाही म्हणून का दिलेले नाही म्हणून.

**मा. आयुक्त :-**

नाही मागच्या वर्षाच्यापेक्षा आम्ही २०-५० टक्के जास्तीचे पकडलेले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी तुम्हाला १० कोटी देतो. मला सर्व टेंडर द्या.

**मा. आयुक्त :-**

मी त्याचे टेंडर काढतो आपण भरायला सांगा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

तुम्ही एवढे कोटी दाखविलेले आहेत. मी तुम्हाला १५ कोटी देतो. मला सर्व टेंडर द्या.

**मा. आयुक्त :-**

बेसिक अमाऊंट मी ८ कोटी ८० लाख अपेक्षित.........

**मॉरस रॉड्रीक्स :-**

चला मी २५ कोटी मी देतो.

**मा. आयुक्त :-**

याच्यावर आपण टेंडर काढतो.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हा हिशोब तुम्ही कसा पकडला? कसे पकडलेले आहे मला सांगा. तुम्हाला टेंडर काढायला होत नाही. दोन वर्षापासून तुम्ही आलेले आहेत का टेंडर काढलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

मला दोन वर्ष झालेले नाहीत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी चार वेळा लेटर दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही टेन्शन घेऊन बोलू नका. तुम्ही सिनियर आहात. मला दोन वर्ष झालेले नाहीत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी सांगतो पाच वर्षापासून कुठल्याही कमिशनरने टेंडर काढलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

तुमची सुचना रास्त आहे. याच्यामध्ये उत्पन्नाचा भाग आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हे महत्वाचे आहे.

**मा. आयुक्त :-**

हा एकदम महत्वाचे आहे. ३ दिवसात आपण याचे टेंडर काढू. प्रोसेस मध्येच आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

एकाच तारखेला सर्व टेंडर दिलेली पाहिजे. जे ब्लॅक लिस्टमध्ये आहेत त्यांना टेंडर देऊ नये. ज्यांची कर वसूली बाकी आहेत त्यांना ही टेंडर देऊ नये.

**मा. आयुक्त :-**

तसेच नियोजन केलेले आहे जे ब्लॅक लिस्टेड असतील त्यांना टेंडर भरता येणार नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ते दुसऱ्याच्या नावाने भरतील पण आम्ही मनुष्य दाखवू. तुम्ही टेंडर पास करु शकत नाही. ते माहिती घेतील आज करोडोचे नुकसान करुन बसलेले आहेत. कुठल्या तारखेला टेंडर काढणार ते मला सांगा. ते ८ लाखाचे दाखवत आहेत.

**मा. आयुक्त :-**

८ लाख नाही हो. आपण जाहिरात म्हणून ८ कोटी ८० लाखाची टोटल उत्पन्न अपेक्षित केलेली आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

तुम्ही कशी अपेक्षा केली टेंडर काढली नाही.

**मा. आयुक्त :-**

टेंडरची बेस कॉस्ट आहे. ही आता आपण सभापती राहिलेले आहात. प्रशासकीय ही कॉस्ट आहे याच्यावर १५ कोटी २० कोटी येईल. १० कोटी येईल आपण टेंडर भरायला सांगा. टेंडर काढले होते कोणीच टेंडर भरले नाही. परत आम्ही त्याचे रिकॉल करु

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी भरलेले आहे. ३ वेळेस भरलेले आहे. माझ्याकडे पुरावा आहे. अजून पैसे बाकी आहेत तुम्ही काय सांगता.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी भरलेले नाही त्यांनी म्हणजे त्यांचे कोणी माणूस भरलेला असेल. त्यांच्या वेगळ्या संस्थेने भरला असेल.

**दादासाहेब खेत्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, टेंडर काढलेले आहेत पण एकही ओनरने टेंडर भरलेले नाही म्हणून आपणत्याला रिकॉल करत आहात.

**प्रशांत दळवी :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या ''परिवहन'' विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात व्हायबल फंड तरतूद अंतर्गत ५ कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती, ती रक्कम रु.१ कोटी करण्यात येवून काही दुरुस्त्या करून आजची सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2018-19 (सुधारित अंदाज) | 2019-20 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहीत) | 7401.31 | 8055.96 |
| परिवहन खर्च | 7387.35 | 8054.35 |
| **अखेरची शिल्लक** | **13.96** | **1.61** |

**अनिल विरोणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना ज च्या प्रस्तावामध्ये तसे करावे लागेल. आम्ही सचिव महोदयांना आता क्लब करायला सांगितले. यावर आम्ही चर्चा करणार.

**नगरसचिव :-**

दोन्ही मुळ विषय आणि ज चे प्रस्ताव एकत्र घेऊन चर्चा करुन एकत्र ठराव मांडावा अशी सभागृनेत्यांनी देखील विनंती केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभागृह नेत्यांनी विनंती केली असली तरी आमची चर्चा बाकी आहे.

**नगरसचिव :-**

तुम्ही चर्चा चालू द्या.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक विषयावर येईल.

**नगरसचिव :-**

चर्चा करा.

**जुबेर इनामदार :-**

परिवहनच्या विषयपत्रिकेवरचा खंड आय च्या आणि ज हे दोन्ही विष्यावर तुम्ही नेहमी नेहमी विचारा. जेव्हा जेव्हा विषय येईल विषय पटलावर.

**नगरसचिव :-**

नक्की.

**जुबेर इनामदार :-**

तेव्हा विचार हे तुम्हाला मान्य आहे का?

**धृवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब आपण सांगितल्याप्रमाणे विषयपत्रिकेची जे मुळ विषय आहेत १३७ मा. महापौर मॅडम सचिव साहेबांनी सांगितल्याप्रमाणे विषयपत्रिकेची जे प्रकरण क्र. १३७ या परिवहन सेवेच्या अंदाजपत्रकामध्ये तसेच १४० प्रकरण क्र. मध्ये सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी ज चा प्रस्ताव दिलेला आहे. प्रकरण क्र. १४३ प्रशासन दळवी साहेबांनी पण ज चा प्रस्ताव दिलेला आहे. आणि हे तिन्ही विषय परिवहन सेवेच्या अंदाजपत्रकाशी निगडीत असल्यामुळे ह्या तिन्ही विषयाचा एकत्रितपणे विषय घेऊन चर्चा करुन तसा तो ठराव केलेला आहे. प्रशांत दळवी यांना जो ठराव केलेला आहे जर समजा जुबेर इनामदार यांना काही चर्चा करायची असेल तर त्या ''ज'' च्या याच्याने चर्चा करु शकतात.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम ह्या शहरामध्ये परिवहन सेवा सुरु झाली ५० टक्के अनुदान आपल्याला राज्य आणि केंद्र सरकार जवळून मिळाले. एक काळ असा होता की, परिवहन कमिटी जवळून मुळ बजेटमध्ये रॉयल्टी येत होती. अनुदान येत होते. आज परिस्थिती ही आहे की आज १५ करोड रुपये आपण परिवहन बजेटला देत आहोत. अ मधून हस्तांतरण करत आहोत. आज परिवहन सेवेची परिस्थिती काय आहे. २७ ते २८ बसेस फक्त चालू आहेत. ५० बसेस आपल्या जवळ येणार होत्या. ५० आहेत की ७८ आहेत. ७० बसेसचे बोर्ड लागले ऐ सी बसेस सर्व शहरामध्ये होर्डिंग बाजी झाली  आज अत्यंत डबघाईने आलेली परिवहन सेवा आहे. आणि त्यांच्यासाठी मुळ बजेट मधून १५ करोड रू. रॉयल्टी देत आहोत अनुदान मग आपण नक्की परिवहन सेवा काय चालवत आहोत आज ह्या ठिकाणी तुम्ही रॉयल्टी लिहीलेली आहे ठेकेदाराकडून रॉयल्टी जमा १ करोड ८२ लाख अजून पर्यत किती जमा झाले? का ठेकेदारांकडून जमा झाले नाही? पूर्ण वर्षामध्ये झीरो जमा आहेत आणि जानेवारी ते मार्च १ करोड ८२ लाख दाखविलेले आहेत ते जमा होणार आहेत की नाही होणार आहेत इथे बजेटमध्ये तर तुम्ही जमा दाखवले. साहेब पारिवनसेवेसाठी नाही तरी करा. आता तुम्ही म्हणालात मला जास्ते वेळ झालेला नाही. तुम्ही जातीने लक्ष द्या एक उत्कृष्ठ परिवहन सेवा आहे जे एन एन यू आर एम च्या अंडर मनमोहन सिंगजी प्रतप्रधान असते वेळी याला सुरूवात झाली. ५० टक्के आपल्याला अनुदान मिळाले ५० टक्के  आपण खर्च केले. पण आज अक्षरशा भंगारमध्ये जाण्याच्या लायकीच्या त्या बसेस आहेत. आज शहरामध्ये कुठेही फिरलात तरी २-३ ठिकाणी बसेस तुम्हाला ब्रेक डाऊन झालेल्या दिसतील. ५८ मधल्या २८ बसेस फक्त चालू आहेत. आपण काय करत आहोत. कशी चालवत आहोत. परिवहन सेवा आणि अशी चालवत आहोत. नगरपालिका साहेब आपण निवेदन करा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब महापौर मॅडम आम्ही  खरतर हा अंदाजपत्रक तयार करतो. पुढच्या वर्षाचे म्हणजे २०१९-२० आर्थिक वर्ष अंदाजपत्रक बोलण्यापेक्षा अंडापत्रक बोलले पाहिजे शुन्यपत्रक. शाळेत आपल्याला अंडे मिळायचे तसा हा प्रकार आहे. परिवहन सेवा या शहराची सर्वांत गरजेची मुलभूत सेवा आणि हा ज्वलंत विषय आता हा अर्थसंकल्प म्हणून हा विषय परत आला चर्चेला चर्चा करणे गरजेचे आहे. कारण अर्थसंकल्प पुढच्या वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करायचे आहे. त्याला आपल्याला अंदाजित खर्च मान्यता द्यायची आहे. साहेब जी.सी.सी. पध्दत आपल्याकडे २००५ ला परिवहन सेवा सुरु झाली. महालक्ष्मी कृपाचे बस ५० बसेस होत्या. त्या ५० बसेस त्यांनी स्वतःच्या बसेस चालवल्या. आपल्याला काही तरी रॉयल्टी दिली. त्याचे इंधन आणि वंगण म्हणजे स्पेस त्याची शेवटची भुमिका आहे १ कोटी ६० लाखाला तो विषय संपला होता की आपल्याला त्याला तिककेच द्यायचे आहे. आणि ती सेवा बंद केली त्याने थोडीशी चालवली आणि एक क्रिस्टक नविन कंपनी तेव्हा पी.पी.पी. पध्दतीने पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप त्या धोरणा अंतर्गत आयुक्त शिवमुर्ती नाईक तत्कालीन आयुक्त होते त्या काळात हा विषय झाला होता. तेव्हा ही जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत आपल्याला बसेस प्राप्त झाल्या. आपल्याकडच्या फक्त ५० टक्के आपला जो हिस्सा होता तो त्यांनी ठेकेदाराने भरायचा असे करुन आपल्याला तेव्हा ५० बसेस तेव्हाही आपल्याला प्राप्त झाल्या होत्या. आता सुरेश काकाणी साहेब तत्कालीन आयुक्त असताना १०० टक्के अनुदान आहे आणि ८५ परिवहन सेवेचे बसेस उपलब्ध होते. आपल्याला त्यातुन आम्ही फक्त ५८ बसेस आजपर्यंत ताब्यात घेऊ शकलो आणि त्या ५८ बसेस मधून सुध्दा साहेब कालची चर्चा आहे. स्थायी समिती सभापतीने चांगली संधी दिली. काल चर्चा करायला ह्या विषयावर त्यांचे मी आभार मानतो. ते चर्चा करायला नेहमी

संधी देतात. आणि ते शहराच्या हितामध्ये विषय होतात म्हणून मी त्यांचे आभार मानतो. फक्त ३२ बसेस वैती साहेब ह्या शहरामध्ये चालू आहेत. ५८ मधून आणि त्यातून १५ बसेस काय कारणामुळे बंद आहत. माहिती आहे का साहेब फक्त टायरसाठी टायर विकत घेणेचा विषय काल स्थायी समितीमध्ये मान्यतेसाठी म्हणजे साहेब १५ बसेस बंद पडेपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाही. तुमच्या अवलोकनामध्ये तुम्हाला अधिकार आहेत २५ लाखापर्यंत टायरचे दर निश्चित करुन घेतले असते. तांत्रिक लोकांना तुम्ही आता कामावर ठेवलेले आहे. हे सगळी काही बाबी आपल्याकडे असताना सुध्दा हे आपण अर्थसंकल्प तयार करतो पण त्याचा काय फायदा लोकांना मालमत्ता कर हा एकमेव स्तोत्र लोकांनी आपल्याला कर भरायचा त्यातून आम्ही त्या मालमत्तामधून परिवहनला पैसे वर्ग करतो. ते कुठेतरी कमी पडले नाही पाहिजे. ती सेवा चालली पाहिजे. आयुक्त महोदय तुम्हाला मी बजाऊन सांगतो साहेब इथे हा विषय सभागृहामध्ये आजपर्यंत २००५ पासून आजपर्यंत परिवहन सेवेसाठी कुठल्याही पक्षाने भाजपा विरोधात होती. काँग्रेस सत्तेवर होती, आज काँग्रेस विरोधात आहे. भाजपा सत्तेवर आहे. कुठल्याही विषयावर कधीही विरोध केला नाही. कारण ही मुलभूत गरज सामान्य नागरिकांची गरज ह्या शहरामध्ये चालली पाहिजे. शासनाने मन मोठे करुन आपल्याला अनुदानाच्या स्वरुपात वाहने उपलब्ध करुन दिली. ८५ वाहने १०० टक्के अनुदान अभिनंदन त्या आयुक्तांचे तत्कालीन आयुक्त सुरेश काकाणी साहेबांचे त्यांनी त्याच्यामध्ये बरीच काही धावपळ केली. त्यांनी ते अनुदान प्राप्त करुन आणले. आज परिस्थिती काय आहे साहेब त्या विभागाला विचारा. त्यांना त्यांच्यावर काय जबाबदाऱ्या आहेत. त्या जबाबदाऱ्या पूर्ण करत का नाही. परिवहनचे काम आज जी.सी.सी. पध्दतीने नाही झाले पण एन.सी.सी. कडे गेलो. व्हायबल च्या आधारे आपण ते काम चालवणार आहोत. हे सर्व काही स्पष्ट असताना जी.सी.सी. ची मागणी केली. प्रशासनाने जी.सी.सी. ची मान्यता दिली. महापौर मॅडम एन.सी.सी. केली केली. एन.सी.सी. ची मान्यता दिली. तुम्हाला काय अडवण राहिलेली आहे ती आता चालू करायला साहेब ८-८, ९-९ कोटीचे अनुदान मिळाले म्हणून ९-९ कोटी रुपयाचे तुम्हाला त्या विषयाबद्दल सुचनाही दिली होती. ते ९ कोटी रुपये साहित्य विकत घेतले काही कारण नसताना ते ८-९ कोटी वापरले असते. आज डेपोची तयारी नाही. येणारा ठेकेदार त्याचे काही साहित्य आणणार त्याचे आपल्याला त्याची कल्पना नाही. ते त्यांनी केले पाहिजे. त्यांनी सांभाळले पाहिजे. त्यांनी त्याची देखरेख केली पाहिजे. सर्व काही त्या ठेकेदारावर जबाबदारी असताना सुध्दा आम्ही ७-८ कोटी रुपये विल्हेवाट लावली होती फक्त इंटरेस्ट निविदा काढण्यामध्ये अधिकाऱ्यांच्या साहेब ह्याला कुठेतरी अंकुश लावा. परिवहन सेवा कमीत कमी साहेब तुम्ही ह्या विष्यावर मला वाटते तुमची परिवहनवर पी.एच.डी. आहे साहेब याच्यावर तुम्ही हा विभाग तुमच्याकडे घ्या. विभाग तुमच्याकडे घेता येतो. आयुक्त आहेत, सर्व काही आहेत तुम्ही करु शकतात. आज तुम्ही साहेब हा विभाग तुमच्याकडे घेऊन ह्या विषयावर खरोखर ही परिवहन सेवा कशी चांगली चालेल तशी सुविधा आपल्याला भेटेल याच्यावरती साहेब तुम्ही कार्य करा. अर्थसंकल्पावर परत मी ह्या विषयावर येतो, मुख्यतः म्हणजे उत्पन्नाची बाजू एका बाजूला आपला उत्पन्न हे जे मालमत्ता करामधून होणारे उत्पन्न बाकीचे माध्यमातून होणारे उत्पन्न आपले साहेब ४५ टक्के ने घटले आहे. गेल्या वर्षामध्ये साहेब २०१८-१९ मध्ये तुमचेच आकडे दिलेले आहेत सुधारीत त्याच्यामध्ये ३७ टक्के तफावत आहे आणि ह्या वर्षामध्ये वाढीव ४५ टक्केची तफावत म्हणजे ४५ टक्के वाढ दिसते. तफावत नाही वाढ दिसते अशी परिस्थिती डोळ्यासमोर असताना साहेब जेव्हा जी.सी.सी. पध्दतीने परिवहन सेवा देण्याचा विषय जेव्हा झाला तेव्हा बरीच काही बैठकी झाली. महापौर मॅडमच्या अध्यक्षतेखाली गिता जैन मॅडम महापौर होत्या, वैती साहेब १२ कोटी रुपये सबसिडी जी.सी.सी. पध्दतीने आपला जाणार होती. जी.सी.सी म्हणजे पालिका परिपूर्ण पध्दतीने पालिका चालवणार होती. तेव्हा १२ कोटी रूपये लागणार होते फक्त १२ कोटी रूपये तुम्हाला २००५ पर्यंत परत घेऊन जातो. १६० कोटीमध्ये आपण हे दुकान बंद केले होते. महाराष्ट्र कृपा शेवटचा दोन डिफरन्स आज तो १२ कोटी रुपयेवर गेला. सेवा तितकीच तेव्हा ५० तरी चालत होते. आता ३२ चालत आहेत. एवढी वाईट परिस्थिती साहेब तेव्हा १२ कोटीच्या माझ्याकडे जी.सी.सी. पध्दतीने सबसिडी जी आपल्याला अनुदान द्यावे लागेल. जी.सी.सी. पध्दतीवर तेव्हा १२ कोटीचा होता आणि आज प्रशासनाने त्याला २० कोटीवर घेऊन गेले. एन.सी.सी. पध्दतीवर जेव्हा बराच काही खर्च ठेकेदार स्वतः उचलणार आहे. ५० टक्के खर्च आणि तो व्हाईबल गॅप २० कोटीपर्यंत घेऊन गेले स्थायी समितीला सुचले की हे कुठेतरी चुकीचे चालले आहे. तर त्यांनी १५ वर आणले. १५ ची साहेब गरज नाही. तुम्ही जितके पैसे द्याल तितके त्याची विल्हेवाट लावायला काही वेळ लागत नाही. हिशोब करुन लाखो का हिसाब करोडो की भुल चोपडा खोलके देखा तो मुद्दल भी गुल ही मुद्दल सुध्दा तुमची गुल होणार आहे. म्हणून अशाप्रकारे जे काही वाढ अननेसेसरी दिली जाते. त्याला मी विरोध करतो. तर आमच्या या विषयावर ठराव असणार आहे. अ अंदाजपत्रकावर

हस्तांतरण जो १५ कोटी रुपये तो आम्ही १५ ऐवजी १० देतोय. आम्हाला ते चालवायची आहे म्हणून १० करत आहोत.

**अनिल सावंत :-**

आयुक्तांना निवेदन तर करु देत.

**मा. उपमहापौर :-**

माझे असे मत आहे सभागृह व महापौर मॅडम उपायुक्त साहेब परिवहनचा कारभार सांभाळतात. परिवनहची आवश्यकता ह्या शहराला आहे. आणि त्याच्यात निश्चितपणे सुधारणा झाली पाहिजे. हा आपला विभाग अत्यंत लंगडा आहे. तरी ह्या संदर्भात एकदा निवेदन सभागृहात झाले पाहिजे आणि परिवहन सेवा ह्या शहरात कशी चालू करता येईल त्यासंदर्भात चर्चा व्हायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब, फक्त २३ बसेस चालू आहेत. ह्या शहराचे काय होणार आहे बघा.

**जुबेर इनामदार :-**

म्हसाळ साहेबांनी सभागृहामध्ये खरा आकडा सांगावा. स्थायी समितीमध्ये आणि याच्यामध्ये तफावत आहे १० बसेसची.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

कमिशनर साहेब जाहिरात वाल्यांना बोलवा. कोणाला टेंडर दिलेले आहेत का?

**मा. महापौर :-**

दिलेले नाहीत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपल्याला भाईंदर स्वच्छ ठेवायचे सगळे बॅनर लावायचे नाही असे आपले चालू आहे. मग आता जी बॅनर, होर्डिंग्जवर दिलेले ती कोणाची त्याला कोणी परमिशन दिलेली आहे. हे किती वर्षापासून चालू आहे. हे कसे दिले. मला सोमवार नंतर एकही होर्डिंग्जवरती बॅनर जो पर्यंत टेंडर पास होत नाही तोपर्यंत एकही बॅनर होर्डिंग्जवर लागले नाही पाहिजे. मी तुम्हाला बुधवारी फोटोसहित तुम्हाला होर्डिंग्जवरती लागलेली बॅनरचे मी तुम्हाला फोटो दाखवेल. याचा अर्थ तुम्ही इथे पैसे खातात आणि होर्डिंग्ज लावायला देतात याचा हा अर्थ आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे ज्या निविदा आहेत त्यांच्या खर्चानेच त्या होर्डिंग्ज लावलेल्या आहेत आणि त्यांच्या मुदतीपर्यंत ते लावणारच. त्याची मुदत संपली कि त्याचा ठेका................

**मॉरस रॉड्रीक्स :-**

साहेब ५ वर्ष झाली. टेंडरच काढलेले नाही. कोणाची कसली निविदा बाकी आहे?

**मा. आयुक्त :-**

वेगवेगळ्या आहेत एकाकडे ९० आहेत, एकाकडे काही वेगवेगळ्या संख्या आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

कोणी दिलेल्या आहेत?

**मा. आयुक्त :-**

आपल्याच काळात, वेगवेगळ्या काळात दिलेल्या आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

नाही साहेब सवालच येत नाही.

**मा. आयुक्त :-**

ती मुदत मी तुम्हाला दाखवतो आणि आता आपण नविन ठेका काढलेला आहे त्याच्यामध्ये भरायला सांगा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

परंतु ५ वर्षापासून कोणी टेंडर काढलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

नविन तयार झाली की हे मागचे बंद होऊन जातील.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मागचे कधीच बंद झाले त्याचे पैसे पण घ्यायचे बाकी आहेत.

**मा. आयुक्त :-**

पैसे घेण्यासाठी सगळ्यांना नोटिसा दिलेल्या आहेत.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

५ वर्ष झाली.

**मा. आयुक्त :-**

जुन्या पैशासह.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

किती येणे बाकी आहे त्याला माहिती आहे का?

**राजीव मेहरा :-**

कमिशनर साहब, जो होर्डिंग्ज की बात मॉरस साहब कर रहे है बॉम्बे हायकोर्ट, दिल्ली हायकोर्ट, चेन्नई हायकोर्ट का ऑर्डर है सिग्नल पे एक भी होर्डिंग्ज नही होनी चाहिए।

**मा. महापौर :-**

विषय अपना परिवहन का है वह विषय पुरा होने दो।

**राजीव मेहरा :-**

वह बोल रहे थे इसलिए मैंने कन्टीन्यू किया।

**मा. महापौर :-**

ठिक है आप कमिशनर से मिलीए जो भी है आप उनसे बात किजीएगा अभी यह विषय पुरा किजीए आयुक्त साहेब।

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय सभागृहामध्ये परिवहन सेवेबाबत जी चर्चा झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. सन्मा. सदस्य जुबेर इनामदार साहेब मेकॅनिकल इंजिनियर आहेत. त्यांना ह्या विषयाची माहिती आहे. त्यात दुमत नाही आणि आपण जॉईंट झाल्यानंतर या सेवेमध्ये आतापर्यंत जे काही बारकावे होती इश्यूज होते. ते सेटल करण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. यामध्ये महापालिकेवर बोजा न येता केंद्र शासन राज्यशासन आणि वर्ल्ड बँक याच्या माध्यमातून आम्ही काम करत आहोत. यापूर्वीच जवाहरलाल नेहरु अर्बन डेव्हलपमेंट मिशनमध्ये तुम्ही सांगितल्याप्रमाणे जे बसेस मंजूर होते. त्या सगळ्या बसेस आपल्या ताब्यात आलेल्या नव्हत्या. ५८ बसेसच आपल्या ताब्यात आल्या होत्या. उर्वरीत बसेस ताब्यात न आल्यामुळे त्याचा जो निधी होता. ती योजना बंद झाल्यामुळे तो लॅब्स झाला. आपल्याला मिळाला नाही आणि त्या उर्वरीत बसेस आपण घेऊ शकलो नाही. ही वस्तुस्थिती आहे आणि जे ५८ बसेस आपल्याकडे आल्या त्याची ऑपरेटर नेमण्याची आपल्याला गरज होती आणि तसे प्रयत्न वेळोवेळी झालेले आहेत आणि आपल्याला त्या सगळ्या गोष्टी माहित आहेत. अपेक्षित ऑपरेटर आपण न सक्सेसफुली नेमल्यामुळे त्यामध्ये आपण अपेक्षित प्रगती किंवा नागरिकांना ज्याप्रकारची सुविधा देणे अपेक्षित होते. आपण देऊ शकलो नाही. ही वस्तुस्थिती आहे आणि त्याला परिपूर्ण करणेसाठी आम्ही आपल्याकडून एक निविदा कशा पध्दतीची काढावी ह्या सभागृहामध्ये मान्यता घेतली होती. त्यानंतर आपण सगळ्यांनी गटनेते, पदाधिकारी आणि महापौर यांच्या उपस्थितीत चर्चा करुन याच्यावर निर्णय घ्यायचे ठरले होते. त्याअनुषंगाने आपण सगळे पदाधिकारी, गटनेते यांच्यामध्ये निर्णय केला आणि त्यानुसार आम्ही आता निविदा मागविली निविदा मागविण्यासाठी सुध्दा पहिल्याच्या निविदेची अडचण होती ती राज्यशासनाकडे डिटेल अहवाल सादर करुन त्याला आम्हाला क्लियरन्स करुन घ्यावे लागले. कारण तो ऑलरेडी ए.सी.बी. मॅटरमध्ये पहिली जी आपली निविदा राहिलेली आहे तर अशा पध्दतीने हे सगळे मागचे आम्ही क्लियर करुन नविन निविदा आपण आता काढलेली आहे आणि एन.सी.सी. कॉस्ट बेसिसची निविदा आता आपल्याकडे आलेली आहे. त्यांचे दर सुध्दा खुप जास्तीच्या साईजचे आलेले आहेत. म्हणून मला ते जरा अपेक्षित दर त्यांनी कमी केले नाहीत तर मला ते परत रिकॉल करावे लागणार आहे. ही वस्तुस्थिती आहे आणि एकप्रकारे ऑपरेटर नेमण्याचे आम्ही काम अंतिम टप्प्यात आणलेले आहे आणि दुसरीकडे डेपो जे आपल्याला अद्ययावत करायचा होता खूप मोठ्या प्रमाणात आता डेपोचे काम पूर्ण झालेले आहे. पाहिजे तर आपण स्टॅन्डिंग सदस्याने एक त्याची जॉईंटली व्हिजीट करुन घेऊ. त्यामध्ये वर्ल्ड बँकेकडून आम्ही मोठ्या प्रमाणात अनुदान घेऊन यापुढे आपले सगळे बसेस जी.पी.एस ट्रॅकिंगमध्ये राहणार आहोत. त्या ठिकाणी आवश्यक ते मेन्टेनन्स आम्ही मटेरियलचे जे कॅट लॉगिंग करायचे असते ते ऑनलाईन करत आहोत. कंडक्टरचे जे कलेक्शन असते आणि कंडक्टर ड्युटी चार्ट असतो तो सुध्दा आम्ही ऑनलाईन करत आहोत. म्हणजे इंदौरचे मॉडेल आहे त्या पध्दतीने १०० टक्के कार्यपालनसाठी सगळ्या प्रकारची मदत वर्ल्ड बँक त्यामध्ये करते. सगळे पैसा वर्ल्ड बँक देते आणि त्यांचे सगळे साहित्य आपल्याकडे आता आलेले आहे आणि त्यामुळे आपल्याला नविन ऑपरेटरला कोणत्याही प्रकारचे मेन्टेनन्ससाठी जी मशीनरी लागतात, वॉशिंग असेल, त्याचे वेगवेगळे इंटरनल जे असेम्बली तयार करणेसाठी त्या सगळ्या प्रकारच्या ब्रेक व्हेईकलचे जे

युनिट असतात ते सगळे वर्ल्ड बँक आपल्याला प्रोव्हाईड करते आणि ते सगळे मटेरियल प्रोकोनॉबी आता होते आणि त्याठिकाणी आता इन्स्टॉलेशनचे काम चालू आहे आपण कधी जाऊन तिथे बघु शकता. आपल्याला माहिती चांगल्या पध्दतीने होईल. डेपो आपण अद्ययावत तयार केलेला आहे. डेपो आणि तिथे एक पेट्रोल सुध्दा आम्ही लॉन्च करत आहोत त्याचेही काम अंतिम टप्प्यात आलेले आहे आणि आपले जे टर्मिनल रुट आहेत त्याचे जी.पी.एस ट्रॅकिंगमध्ये शेड्यूल ऑफ व्हेईकल सुध्दा त्याठिकाणी डिस्प्ले होणार आहे आणि याच्यासाठी कार्यक्षम ऑपरेटर आम्हाला आवश्यक आहे आणि ऑपरेटरसाठी आलेल्या निविदा अंतिम करण्याचा प्रयत्न आम्ही करु. फक्त मुद्दा यामध्ये आपण सांगतात ठाणेमध्ये जी.सी.सी. च्या माध्यमाने म्हणजे उत्पन्न महापालिकेकडे घेऊन त्याला मेन्टेनन्स आणि ड्रायव्हरचा खर्च आणि फ्युलचा खर्च त्याच्याकडे तर ते ५३ ते ६८ रुपये पर कि.मी. रेंजवर आहेत. उत्पन्न आपल्याकडे येतो. एन.सी.सी. मध्ये उत्पन्नाचे राईट जे आपण त्यांना देतो आणि ई टिकीटींग इक्वीपमेंट त्या सर्व कंडक्टरकडे राहणार आहेत. त्याच्यामध्ये एरोजन होणार नाही आणि वास्तविक त्याचा जो गॅप आहे परिवहन सेवेचे उत्पन्न आणि खर्च हा जास्त आहे. खर्च हा जास्तीचा आहे आणि उत्पन्न कमी आहे. हे अख्या इंटरनॅशनल परिवहनमध्ये सुध्दा ते सुत्र आपल्याला माहिती आहे. तर तो जो गॅप भविष्यामध्ये राहू नये आणि डबघाईने सेवा चालली नाही पाहिजे. यासाठी आपण एन.सी.सी. बसे आपल्याकडून मान्यता घेतलेली आहे. पण ते सुध्दा देत असताना त्याचे ऑप्टीमम त्याला बेनिफीट भेटला पाहिजे. त्याने त्याचे भांडवल केले नाही पाहिजे. म्हणून जे केंद्र शासनाचे सेंट्रल इन्स्टीट्यूट पुण्याला आहे त्याच्याकडे आम्ही प्रकरणाला आलेले दर पाठविलेले आहेत. त्यांचे अभिप्राय आले की आम्ही ते स्टॅन्डिंगला पाठवणार आहोत. तर डेपो अद्ययावतचे काम अंतिम टप्प्यात आहे आणि जे २८-२७ बसेस आहेत त्याच्यासाठी मी वित्त आयोगाच्या शिफारशीतून राज्यशासनाकडून अनुदान प्राप्त केलेले आहेत. आपल्या ज्या २७-२८ टाटाच्या बसेस आहेत आणि ५ ए.सी. बसेस आहेत ते येणाऱ्या २-३ महिन्यामध्ये आम्ही त्या बसेस सुध्दा उपलब्ध करत आहोत.

**जुबेर इनामदार :-**

१०० टक्के अनुदान.

**मा. आयुक्त :-**

१०० टक्के अनुदान घेतलेले आहे. जो आपल्याला जे.एन.एन.यु.आर.एम मध्ये मिळणार होता. ते बंद झाल्यामुळे आपल्याला आपल्या फंडातून करायची वेळ आली होती. तर त्याबदल्यात आपली ऐपत नाही आम्हाला यामध्ये वर्ल्ड बँकेचा पैसा नाही तर वापस जाणार होता. आम्हाला ह्या डि फ्रेन्स बसेससाठी अनुदान द्यावे तर राज्यशासनाने त्यासाठी आणि डेपोसाठी अनुदान दिलेले आहे. तर मला वाटते की आता फक्त आपल्याला ऑपरेटर नेमुन त्या सेवा अंतिम चालवणे एवढेच आता अंतिम राहिलेले आहे. मी ह्यासाठी जे आपल्याकडे उत्तन आणि त्या परिसरातले काही सोशियल चांगले लोक आहेत त्यांना त्याची फार गरज आहे. त्यांच्याशी मागच्या आठवड्यामध्ये डिटेल आम्ही चर्चा केली. त्यांचेही काही म्हणणे ऐकून घेतलेले आहे आणि २-३ परिवहनचे डिटेल आम्ही ऑपरेशन खर्च आणलेला आहे. तर त्याच्याशी कम्पेअर करुन आम्ही स्टॅन्डिंगला थोड्याच दिवसात रेफर करुन आणि आपल्याला जशी अपेक्षित आहे तशी परिवहन सेवा आम्ही पुर्वपदावर आणू आणि परिवहन समिती गठीत करणेसाठी सुध्दा थोड्याच दिवसात त्याची सुध्दा आम्ही ॲड काढून टाकतो आणि परिवहन समितीसुध्दा आम्ही गठीत करतो.

**अनिल सावंत :-**

साहेब रॉयल्टीचे तुम्ही काही बोलले नाही.

**मा. आयुक्त :-**

दोन गोष्टी आहेत. रॉयल्टी बेस्ट ठेकेदार आपण नेमत होतो. याच्यामध्ये रॉयल्टी बेस ठेकेदार नाहीत आणि पुर्वीचे जे वाद आहेत व आर.बी.ट्रेशन वादात आहेत. सावंत साहेब आताच्या ठेकेदार ऑपरेटर बेस आहेत. जुन्याचा मुद्दा आहे. ते जुने आपल्याला वसुल व्हायचे आहेत म्हणून तो आपण ठेवलेले आहेत आताचे नाहीत.

**गिता जैन :-**

साहेब आता आपण जी निविदा काढणार आहोत ते एन.सी.सी. का जी.सी.सी.

**मा. आयुक्त :-**

ऑलरेडी निविदा काढलेल्या आहेत एन.सी.सी.साठी.

**गिता जैन :-**

पहिली जी.सी.सी. ने दिलेली ती कॅन्सल झाली का?

**मा. आयुक्त :-**

हो कॅन्सलच झाली ना.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते, आताच कमिशनर साहेबांनी निवेदन केले मला अपेक्षित होते की परिवहन व्यवस्थापक म्हणून म्हसाळ साहेबांनी निवेदन करायचे आमची अपेक्षा होती परंतु ठिक आहे आयुक्तांनी आमच्या मागण्या बऱ्याचशा त्याच्यामध्ये मांडलेल्या आहेत. साहेब तांत्रिक सगळ्या गोष्टी सांगितल्या आणि शेवटी तुम्ही आमच्या परिसराचा पण उल्लेख केला कारण आमची आताच एक आठवड्यापूर्वी शिष्ट मंडळाची मिटींग झालेली होती. परंतु आता येत्या १० दिवसाच्या आतमध्ये जेव्हा आपली लोकसभेची निवडणूकीची आचारसंहिता लागेल त्या मधल्या पिरेडमध्येच २ महिन्यांसाठी आमच्या लोकांची जी विनंती होती.

**मा. आयुक्त :-**

ह्या ठिकाणी आता जी चालू असलेली आपली सेवा आहे तुम्ही म्हणता की त्या लेव्हलची नाही. तर त्यामध्ये ९ कोटी २२ लाख आहे त्या सेवेत आपले वार्षिक उत्पन्न आहे आणि सॅलरीवर आपण ८ कोटी रुपये खर्च केलेला आहे आणि मेन्टेनन्ससाठी फक्त ९१ लाख रुपये खर्च केलेला आहे आपले काहीच नाही असे नाही आणि फ्युलवर खर्च केलेला आहे.

**शर्मिला बगाजी :-**

आयुक्त साहेब, आता शेवटचा जो मुद्दा सांगितला की आपल्याकडे उत्पन्न आहे. उत्पन्नाचा स्त्रोत पण तुम्हाला माहित आहे की जास्तीत जास्त प्रॉफीटेबल रुट आमच्या उत्तनचा परिसरच आहे. हे असतानाही देखील परत परत तेच होते. आता परत तुम्ही निविदा काढणार. तांत्रिक गोष्टी आहेत त्याच्यामध्ये वेळ जाणार हे नक्कीच आहे. परंतु आपली जी पर्यायी व्यवस्था होती त्याच्यासाठी पण परत तुम्ही निविदा आणि ह्याच्यामध्ये अजून दोन तीन महिने जाणारच आहेत. तर त्या काळामध्ये आमच्या लोकांचे परत तेच...........

**मा. आयुक्त :-**

तुमची बाजू ऐकल्यानंतर जे ब्रेक होण्याचे मुख्या कारण त्यांच्या टायरचा होता. मला सांगायला आनंद होत आहे स्थायी समितीने आमच्या टायरचा विषय मान्य केलेला आहे. त्यामुळे १५ ते १० अजून बसेस आपल्या रस्त्यावर लवकर येतील आता त्याच्यात अडचण राहणार नाही.

**शर्मिला बगाजी :-**

टायरचा मुद्दा आला काल तुमची निविदा झाली, म्हसाळ साहेब आमच्याकडे त्या ३-३ महिने झाले. बसेस उभ्या आहेत ते उचलायच्या नसतील तर आम्ही उचलायची व्यवस्था करु कारण तिथे उभ्या राहिल्यानंतर प्रत्येक वेळेला लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला त्याचे त्या सगळ्या लोकांचा रोश आम्हाला ऐकावा लागतो. तर प्लीज जे मेन्टेनन्स आहेत ती तरी पूर्ववत करा आणि नंतर तुमच्या निविदेपर्यंत आम्हाला पर्यायी व्यवस्था द्यावी अशी आमची विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

तुमची सुचना रास्त आहे. ह्या अंतिम होईपर्यंत त्याच्यात अजून जे इंटरनल आपल्याला आवश्यक आहेत. त्या गोष्टी पूर्ण करुन आम्ही याची वाट न पाहता त्याच्यात सुधारणेचे मान्य करु.

**नरेश पाटील :-**

मा. महापौरांच्या मान्यतेने बोलतो, आपल्याला विनंती आहे मिरारोड स्टेशन ते उत्तन बस सेवा चालू करण्यात यावी.

**मा. महापौर :-**

ठराव बहुमतांनी मंजूर.

**प्रकरण क्र. १३७ :-**

**परिवहन सेवेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . २०८, ठराव क्र. १७३)**

**ठराव क्र. १३४ :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या "परिवहन" विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात व्हायबल फंड तरतूद अंतर्गत ५ कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती, ती रक्कम रु.१ कोटी करण्यात येवून काही दुरुस्त्या करून आजची सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2018-19 (सुधारित अंदाज) | 2019-20 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहीत) | 7401.31 | 8055.96 |
| परिवहन खर्च | 7387.35 | 8054.35 |
| **अखेरची शिल्लक** | **13.96** | **1.61** |

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३८, **अग्निशमन विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २०९, ठराव क्र. १७४)** सन्मा. सदस्य जुबेर इनामदार दि. २५/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला "ज" अन्वये प्रस्ताव क्र. १४१, **सन्मा. सदस्य श्री . जुबेर अ . इनामदार यांचा दिनांक २५/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०२/०३/२०१९ प्रकरण क्र. १३८ वर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट २ (ज) अन्वये प्रस्ताव सादर.** सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांचा दि. २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव प्रकरण क्र. १४४, **सन्मा. सदस्य श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी यांचा दिनांक २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --_अग्निशमन विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. प्रकरण क्र. १३८ (मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २०९, ठराव क्र. १७४)**

**प्रशांत दळवी :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या "अग्निशमन" विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे अंदाजपत्रकास आजची सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

(आकडे लाखात)

| तपशिल | 2018-19 (सुधारित अंदाज) | 2019-20 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| **एकूण जमा** | 5653.22 | 4875.07 |
| **एकूण खर्च** | 3043.15 | 4860.00 |
| **अखेरची शिल्लक** | 2610.07 | 15.07 |

**अनिल विराणी:-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम याच्यामध्ये फक्त एकच मुद्दा आहे नविन फायर फायटर खरेदी १६ करोड गेल्या वर्षी आपण १७ करोड केली होती. ते काही खर्च करु शकलो नाही. मला आठवते मॅडम महासभेमध्ये यापूर्वी एक ठराव झालेला आहे. ह्या शहरामध्ये मोठमोठ्या टोलेगंज इमारतीसाठी आपण परवानगी देत आहोत. त्यावेळी काही विकासकांनी ती फायर फायटर देण्याची तयारी दाखवली होती आणि त्या

अनुषंगाने महासभेमध्ये ठराव झाला होता. त्याचे पूढे काय झाले. साहेब तुम्ही नव्हता तुमच्या अगोदर एक ठराव झाला होता. महासभेमध्ये काही लोकांनी विकासकांनी प्रस्ताव दिले होते की ज्या इमारतींना आपण एवढी २४-२५ मजल्यांची परमिशन देत आहोत ते विकासक ह्या महापालिकेला फायर फायटर सिस्टीम देणार आहेत. विकासक देणार आहेत पालिकेचा पैसा खर्च न होता.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या विकास करातून ते म्हणत असतील.

**अनिल सावंत :-**

नाही.

**मा. आयुक्त :-**

फायर कर आणि विकास कर हे दोन्ही भरतात ना.

**अनिल सावंत :-**

नाही दोन्ही भरले तरी त्यांनी सोमोटो मला वाटते इंद्रलोक मधलेच कोणते तरी बिल्डर होते महासभेमध्ये चर्चा झाली आणि ठराव झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे, मी तो ठराव काढेल आणि त्यानुसार एक संबंधित विकासकांची एक बैठक घेऊन त्यांच्याकडून आपण ते अनुदान डोनेशनच्या रुपाने आपण घेऊ शकतो.

**अनिल सावंत :-**

त्यामुळे महापालिकेचे पैसे वाचतील.

**मा. आयुक्त :-**

प्रयत्न करु.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, आयुक्त महोदय खरतर अग्निशमन म्हणजे गरजेची सेवा उत्पन्नाची बाजू खरतर खर्चाचीच बाजू आहे. उत्पन्न आहे मात्र ते उत्पन्नाच्या वरती लक्ष कोणी देत नाही. सेवा कर कॅपेटेशन फी तुमच्याकडे येणाऱ्या नविन इमारतीसाठी तुम्ही घेणार. सेवा कर जो आहे त्यावर आमची बरीच चर्चा झाली होती. आपल्याकडे किती तरी बहुमजली इमारती ह्या शहरामध्ये आहेत. पाच माळ्याच्यावरची इमारत असली की त्याला लिफ्ट लागते. त्याला अग्निशमन यंत्रणा लागतात, फायर फाईटिंग सिस्टिम बसवावी लागते आणि त्याला दरवर्षी त्याच्या रिन्युव्हल आहे म्हणजे तुमची फायर सिस्टीम आहे ती व्यवस्थित चालते नाही चालते त्याचा रिन्युव्हल फी आपण आकारु शकतो. मात्र साहेब आपल्या अग्निशमन विभागाकडून तशी कुठलीही काही मेहनत घेतली जात नाही. जो समोरुन चालून आला त्यालाच फक्त दिली जातात. हा एक उत्पन्नाचा स्त्रोत आहे. कुठेतरी आग लागली त्यांनी नाही त्याची फायर सिस्टीम चालू होती. तरी आपल्याला धावत जावच लागेल. मानवी हत्या आपण करु शकत नाही. मग अशा परिस्थितीमध्ये जिथे आपल्याकडे कुठेतरी उत्पन्न आपले ह्या बाजूने वाढू शकतो. तिथे पालिका प्रशासन प्रयत्न का करत नाही. कितीतरी बहुमजली इमारती असतील साहेब आता आपल्याकडे म्हणजे आपलाच अंदाज २ कोटी ८० लाखाचा आहे. स्थायी समितीने २ कोटी ५७ लाखाचा अंदाज दिलेला आहे. आम्हाला खरेतर याच्यावर जास्त काही विरोधाचा विषय नाहीच आहे. तुम्हाला हे मान्य आहे का. हे वाढीव जे फिगर आम्ही दिलेले आहेत तुम्ही तिथपर्यंत पोहचु शकतात कारण साहेब तुमच्या सुधारीतमध्ये बराच फरक आहे. आम्ही किती काहीही केले तरी तुम्ही सुधारीत बजेट घेता. एका बाजूला करुन तेही आपण पोहचू शकत नाही त्याच्यामधून त्याच्यात तफावत होते. साहेब हा प्रयत्न कुठेतरी प्रशासनाने केला पाहिजे. प्रामाणिकपणे केला पाहिजे तर होईल साहेब आणि परिस्थिती डोळ्याच्या समोर आहे. समारेच बहुमजली इमारती होत आहेत.

**मा. आयुक्त :-**

अग्निशमन तुम्ही बोलल्याप्रमाणे वसुलीला वाव आहे. आम्ही निश्चित प्रयत्न करु. आणि आता जे आपण व्हेईकलवर खर्च ठेवत आहोत आपल्याकडे ती रक्कम नव्याने देण्याची गरज नाही. तो आपण आतापर्यंतचा कॅसॉलिडेट जमा रिझर्व्ह फंड आपल्याकडे आहे २४ कोटी आपण त्याच्यामध्ये सरकुलेस आहोत. त्यामुळे तेवढा इश्यू नाही पण याच्यामध्ये अजून उत्पन्नाला वाव आहे. आम्ही प्रयत्न करु.

**जुबेर इनामदार :-**

धन्यवाद साहेब.

**मर्लिन डिसा :-**

आयुक्त साहेब तुमच्या परवानगीने, आयुक्त साहेब प्रत्येक सोसायटी प्रत्येक शाळा, हॉस्पीटल सगळे जे पण इमारती आहेत, इस्टॅब्लीशमेंट आहेत तिथे कम्पलसरी रिन्युवल फायर फाईटींग इक्वीपमेंट प्रत्येक वर्षी हे भरून घेणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब रस्त्यावर खाण्याचे पदार्थ बनवतात. कधी कुठे सिलेंडर ब्लास्ट झाला तर त्याच्यासाठी काय उपाय ते आपण वाट पाहणार का असे मोठे हादसे होण्यासाठी काही ते अनधिकृतपणे रस्त्यावर बसून स्नॅक्स बनवतात. सिलेंडर घेऊन कारण तीन वर्षा अगोदर टॉवर बिल्डींगमध्ये माझ्या वॉर्डमध्ये रात्री ९.३० वाजता शॉर्ट सर्किट झाले आणि खाली जी दुकाने आहेत तिथे समोसा आणि वडापाव  बनवणारा होता तर ती जर आज ह्या गॅस सिलेंडरमध्ये कुठे काही झाल असतं ब्लास्ट झाला असतात, वरती दोन तीन हॉस्पीटल आहेत. नर्सिग होम्स आहेत. तर ह्यावेळी मोठी घटना होऊ शकते. दुर्घटना होऊ शकते. तर याची जरा कल्पना घ्यावी. टेक ॲक्सीडन्ट ऑल धिस पिपल. यु आर शेरिंग धिस थिंक इज इललिगली ॲन्ड सेफ्टीसाठी लोकांवर लक्ष ठेवावं.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा मांडला आहे हे अत्यंत गंभीर आहे. त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. ठराव सर्वानुमते मंजूर. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १३८ :-**

**अग्निशमन विभागाचे सन  २०१८-१९  चे सुधारित व सन  २०१९-२०  चे  मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि . २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . २०९, ठराव क्र. १७४)**

**ठराव क्र. १३५ :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या "अग्निशमन" विभागाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे अंदाजपत्रकास आजची सभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**(आकडे लाखात)**

| **तपशिल** | **2018-19 (सुधारित अंदाज)** | **2019-20 (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| **एकूण जमा** | 5653.22 | 4875.07 |
| **एकूण खर्च** | 3043.15 | 4860.00 |
| **अखेरची शिल्लक** | 2610.07 | 15.07 |

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३९, **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") (मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . २०७, ठराव क्र. १७२)** सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दि. २५/०२/२०१९ रोजीचा "ज" अन्वये दिलेला प्रस्ताव प्रकरण क्र. १४२, **सन्मा. सदस्य श्री. जुबेर अ. इनामदार यां चा दिनांक  २५/०२/२०१९  रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव  . -- मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०२/०३/२०१९ प्रकरण क्र. १३९ वर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट २ (ज) अन्वये प्रस्ताव सादर .** सन्मा. सदस्य श्री. सुरेश खंडेलवाल यांचा दि. २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव प्रकरण क्र. १४५, **सन्मा. सदस्य श्री. सुरेश खण्डेलवाल**

**यांचा दिनांक २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. प्रकरण क्र. १३९ ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + 'शिक्षण') (मा. स्थायी समिती सभा दि. २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २०७, ठराव क्र. १७२)** श्री. अनिल विराणी यांचा दि. २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव प्रकरण क्र. १४६, **सन्मा. सदस्य श्री. अनिल विराणी यांचा दिनांक २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकामध्ये शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे जॉगर्स पार्क विकसित करणेकामी आवश्यक निधीची तरतुद करुन स्वतंत्र लेखाशिर्षामध्ये (हेड) समाविष्ट करणेबाबत.**

**जुबेर इनामदार :-**

मुळ बजेट आहे. ह्यावर चर्चा झाल्यानंतर ठराव करा.

**प्रभात पाटील :-**

मॅडम मी आपल्याला एक पत्र दिलं होतं. माझा विषय असा होता की ह्या शहरामध्ये आपण अनेक विकासाचे काम करत आहेत. शहराला एक नवी दिशा आणि नविन काही देण्याचा प्रयत्न राहिलेला आहे. ह्या हिशोबांनी मी महापौरांना पत्र दिलं होतं की, आपल्या शहरामध्ये आणि बहुतेक सर्व महानगरपालिकेमध्ये मुलांना कुठे प्राणी दाखवले नाही ह्याच्यात राणीची बाग ही फेमस आहे. ठाणे महानगरपालिका असो, मिरा भाईंदर असो, वसई विरार असो, झु मध्ये एखादा राणीचा बाग माझी अशी इच्छा होती की, आपल्या शहरामध्ये आपण प्रायोगिक तत्वावर जर हा एक उपक्रम चालू केला तर आपल्या शहरातील मुलांना आणि नागरिकांना मुंबईपर्यंत जायला नको आणि ती उपलब्धतः किंवा एक सुविधा आपल्या शहरात आपण देऊ शकते. मी असं म्हणत नाही की, अगदी राणीची बाग ती आताच इथे निर्माण झाली पाहिजे, पण त्याची एक तरतूद म्हणा किंवा त्याची एक सुरुवात आपण ह्या बजेटमध्ये करावी असे एक मी महापौरांना पत्र दिलं होते?

**मा. आयुक्त :-**

चांगली सुचना आहे. सन्मा. प्रभात पाटील मॅडमची आणि आपण जवळ जवळ विविध उद्यान आपण जे प्रस्तावित केलेले आहेत आणि त्यामध्ये एक आपण हा झू ॲनिमलचा सेक्शन त्याच्यामध्ये आहे. आपण ती लॅन्ड जिल्हाधिकारी महोदयांकडून ट्रान्सफर स्टेजला आहे, ती आल्यानंतर आपली सूचना आम्ही त्याच्यात प्रयत्न करु.

**प्रभात पाटील :-**

पण त्याच्यासाठी तुम्ही आपली आर्थिक तरतूद ह्या बजेटमध्ये करावी अशी माझी सुचना आहे. ते कृपया ह्या बजेटमध्ये घ्यावी.

**अनिता पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलते, मा. आयुक्त साहेब, वसई विरार महानगरपालिकेला तिकडची गार्डनची देखभाल करणेकरिता बचत गटाला प्राधान्य दिलेले आहे तर माझी अशी सूचना आहे की, मिरा भाईंदरच्या गार्डनची देखभाल करण्याची जबाबदारी किंवा तशी कारवाई करण्याची बचत गटाला देण्यात यावी. तसे शासनाचे एक पत्र पण आले आहे आता माझ्याकडे नाही पण तसे जर केले तर एक महिलांना रोजगार पण मिळेल अशी माझी एक सूचना आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. मान्य आहे.

**गिता जैन :-**

मा. आयुक्त साहेब त्यासाठी मध्ये आपण हे ही काढलेल की ज्या संस्थेला फ्री ऑफ कॉस्ट करता येईल. लायन्सने आपल्याला हे लेटर दिलेले त्यांनी लेटर दिलेलं की, दोन गार्डन सांभाळायला तयार आहोत. तिथे एक फक्त फलक लावायचा होता. धिस गार्डन इज मेनटेन्स सो ॲन्ड सो. पण आपल्याकडून पूढे काय गेलेच नाही. आपला खर्च वाचते. तिथे संस्था अशी येते एन.जी.ओ. येतात. फलक लावले तर काय फरक पडणार. मुंबईमध्ये सगळीकडे आहेत.

**मा. आयुक्त :-**

कधी काही पॉलीटिकली निर्णय होत नाही. जर नो अलाऊड केले तर अजूनही इझीली होऊ शकते.

**गिता जैन :-**

साहेब ते एन.जी.ओ. आहेत, पॉलीटीकल पार्टी नाही.

**मा. आयुक्त :-**

मला माहित नाहीत कोण आहेत काही नियमन शक्तीला त्यात बाधा न येता चांगला होत असेल.

**गिता जैन :-**

मुंबईमध्ये सगळीकडे लागलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपला तो प्रस्ताव सुध्दा चांगला राहील. आपला खर्च कमी होईल त्याच्यात.

**मदन उदित नारायण सिंह :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मा. आयुक्त साहेब आपले उप-आयुक्त म्हसाळ साहेबांनी एक सर्व नगरसेवकांना पत्र दिले आहे. सन २०१८-१९ ह्या वर्षाच्या मालमत्ता कराच्या वसुलीकरिता आपणांकडून सहकार्य मिळणेबाबत. म्हणजे नेमकं आम्ही काय करावे, त्यांची काय अपेक्षा आहे.

**जयेश भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, म्हसाळ साहेबांनी पत्र दिलेले आहे. पण आम्ही लोकांपूढे हा विषय काढला की, तुम्ही लवकरात लवकर टॅक्स भरा. पण आमचे राई, मोर्वा, मुर्धा आपण मलनिःसारण कर लावलेला आहे. तो आमच्यामधून वापर होत नाही. त्या लोकांचा म्हणजे भुयारी गटार नसल्यामुळे म्हणजे आम्ही कुठलीही वस्तु खात्यातील बील भरू का? असा उद्देश लोक आम्हाला करतात. त्याबद्दल काय आहे. जी सुविधा आमच्या राई, मोर्वा, मुर्ध्याला वापरतो ना आम्ही त्याचा पण आम्ही टॅक्स भरतो.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

मा. महापौर मॅडम, हमारे यहाँ ईस्ट में भी गटार का काम हुआ ही नही, होनेवाला ही नही। एस.टी.एम.एल का काम जो दिया हुआ है अंडर ग्राऊंड गटार वो हमारे ईस्ट में होनेवाला ही नही। हमारे प्रभाग में वहाँ रोड ही नही तो गटार बनायेंगे कहाँ से। उसे भी तो टॅक्स लगाया है। दुसरा टॅक्स भी आ गया, घनकचरा शुल्क भी आ गया।

**गिता जैन :-**

साहेब माझा पण एक मुद्दा आहे. मी पत्र पण दिले आहे.

**मा. महापौर :-**

एक एक मुद्दा मांडा आणि परवानगी शिवाय बोलू नका.

**मदन उदित नारायण सिंह :-**

त्यांनी पत्र पाठवले ती चांगली गोष्ट आहे. आम्हाला ते केले पण पाहिजे. पण तुम्ही बीलच देत नाही. लोक बील मागायला येतात. मी सिरियस मुद्दा मांडतो आणि ह्या शहरातील लोकांना त्रास आहे. लोक पैसे भरायला तयार आहेत. आपण पैसे घ्यायला तयार नाहीत.

**गिता जैन :-**

साहेब आपण जो घनकचरा शुल्क लावलेला आहे ते योग्य आहे का? तुम्ही एक रुपये स्क्वेअर फुट लावलेला आहे. ते बरोबर आहे की नाही तेवढे फक्त सांगा. म्हणजे मी पुढचे मांडते.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही तुमचा पूर्ण मुद्दा मांडा. मी त्याचा खुलासा करतो.

**गिता जैन :-**

साहेब तुम्ही हो सांगितल तर मी बसून जाणार. साहेब महाराष्ट्र शासनाचे राजपत्र आलेले आहे. दि. १९ डिसेंबर २०१८ त्यात क आणि ड वर्ग महानगरपालिकेने कशा रितीने घनकचरा शुल्क लावायचं ते दिलेलं आहे आणि त्यात क आणि ड वर्ग महानगरपालिकेने ५० रुपये पर हाऊस असे सुचवलेले आहे का ५० रुपये पर हाऊस तुम्हाला लावायचा आहे आणि तरी आपण एक रुपया प्रति चौ.मी. लावलेले आहे. तर ते योग्य आहे का मला फक्त तेच विचारायचे आहे. हे राजपत्र येऊन सुध्दा मग आपण याला फॉलो करायचे नाही का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदय, हा जो युजर टॅक्स आहे कोणत्याही सर्व्हिसचा मोबदला हा वसुल केला पाहिजे. सिटीझन सिटकडून आणि टॅक्स वेगळा टॅक्स हे सेवा देणे अपेक्षित नाही. व ह्या कॉन्सलटेड कामासाठी हा टॅक्स घेतला जातो. एक्ससाईजमध्ये सगळ्या प्रकारच्या सेवासाठीचा टॅक्स असतो. मालमत्ता करामध्ये आपल्याकडे सगळ्या प्रकारच्या सेवेचा टॅक्स असतो आणि युजर टॅक्स सगळे त्या स्पेसिफीक

ॲक्टीव्हिटीचा भार असतो आणि दैनंदिन प्रशासनामध्ये कामाच्या व्याप्ती खूप वाढलेल्या आहेत. आपल्याला माहिती आहेत आणि ते काम करणे आणि उत्पन्न याची जर सांगड घातली तर आपण मायनसमध्ये आहोत आणि ते भरुन काढण्यासाठी वेगवेगळ्या ॲक्टीव्हीटीला वेगवेगळा भार आपण घेतला पाहिजे. हा केंद्राचा, राज्य शासनाचा आपल्याला निर्देश होते. मोठमोठ्या योजनेमध्ये आपण लाभ कर घेतला पाहिजे. वास्तविक आपली जी आर्थिक परिस्थिती आहे आपले जे नागरिकांचे राहणीमान आहे. त्यांच्याकडे तेवढ्या प्रकारचा इनकम नसल्यामुळे आपण आहे त्या लोकांकडून हे वसुल करु शकत नाही. आपल्या प्रेझेन्टी रो मध्ये हे आपल्याकडे अडचणी आहेत. वास्तविक ह्या ज्या मोठ्या योजना आपल्याकडे मंजूर झाल्या केंद्र शासनाच्या पाणी पुरवठ्याच्या आणि मलनिःसारणाच्या त्यावेळी आम्ही केंद्रशासनाशी करार केला होता की, लाभ कर आम्ही लावू. पण त्याला आपण वेळोवेळी डिले होत गेलो. जेव्हा जेव्हा हा विषय महासभेसमोर आणला ते मंजूर झालेले नाही. आम्ही आता ठाणेमध्ये प्रयत्न केला पण ठाण्यामध्ये घनकचरा लाभ हा पूर्वीच मंजूर झालेला आहे. आणि अद्यादूत विभागाला तो ह्या जी.आर येण्याच्या फार पूर्वीपासून तिथे अंमल आहे. मी आल्यानंतर आपल्याकडे सुध्दा हा यूजर टॅक्स वसूल करण्याचा आपण ह्या महासभेने ठराव केलेला होता आणि वेगवेगळ्या काळामध्ये हे आमच्याकडे कारवाई होत नाही म्हणून शेरे येत होते. ए.जी.लेखापरिक्षणामध्ये मग आपल्याला त्याची अंमलबजावणी करणे प्राप्त होते. म्हणून आम्ही तुमच्या ठरावाप्रमाणे त्याची अंमलबजावणी केलेली आहे. राज्यामध्ये सगळी महापालिका, नगरपरिषदा हे करत नव्हत्या. म्हणून राज्य शासनाने, केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे आता कम्पेन केलेलं आहे आणि त्याचे बेस रेट त्यांनी नमूद केलेले आहेत. आता आपण जे ठराव केले आहेत. ऑलरेडी पहिलेच केलेले होते आणि त्याची अंमल आम्ही सुरु केलेला होता आणि राज्य शासनाच्या आता राज्याला निर्देश आलेले आहेत तर त्यामध्ये दराच्या बेस दरामध्ये तफावत आहे. जर आपल्याला त्या आपण जे कायम केलेले दर जास्तीचे वाटत असतील असा आक्षेप असतील तर त्याचे रिव्हीजन करुन येणाऱ्या काळात मी तसा प्रस्ताव देईल आपल्याला आणि आता जे भरतात त्याचे दर आपणाला ॲडजस्ट करता येतील. हा त्याच्यामधला मुद्दा होऊ शकतो. केलेली कारवाई चूकीची आहे असे नाही. ती आपल्याला आवश्यक आहे आणि आपण फार उशीरा करतो.

**गिता जैन :-**

साहेब आवश्यक आहे त्याबाबत मी नाकारत नाही. मी सांगते आपले जेव्हा बील निघाले त्याआधी तुमच्याकडे हा राजपत्र आलेले नव्हते.

**मा. आयुक्त :-**

हा राजपत्रे बील निघण्याची जी प्रोसेस आहे त्याला तीन महिने आम्ही मेहनत केली. कम्प्युटराईज पूर्ण सेटअप केला. आता हे नविन बदल करायचा तर आम्हाला अजून परत तीच प्रोसेस करावी लागते. म्हणजे एखाद्या नागरिकांचे दोन पैसे आम्ही घेतले म्हणजे आम्ही अकाऊंटेबल आहोत उद्या जर त्यामध्ये सुधारणा झाली तर तो त्यामध्ये रिकोप होऊ शकतो. ॲडजेस्ट होऊ शकतो.

**गिता जैन :-**

साहेब आपण प्रोसेस केली म्हणून जे मनात येईल ते रेट लावून घ्यायचे का?

**मा. आयुक्त :-**

माझा याला आक्षेप आहे. ह्या सभागृहाने मंजूर केलेले दर आहेत. त्याला मनात आलेले दर कसे म्हणता येईल.

**गिता जैन :-**

साहेब सभागृहाने मंजूर केलेले.......

**मा. आयुक्त :-**

आपण एवढे सिनियर एक पक्षाचे आहेत. एक्स महापौर आहात. मनात आलेले दर कस म्हणता येईल.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला विखंडीत करायला दुसऱ्या ठरावाची गरज नसते. ४५१ अंतर्गत मा. आयुक्ताला अधिकार आहेत.

**गिता जैन :-**

साहेब आम्ही काही ठराव करुन दिला तुम्हाला वाटले योग्य नाही आहे. तर तुम्ही विखंडनाला पाठवत नाही का?

**मा. आयुक्त :-**

पाठवतो ना. मेजर ठराव आपण पाठवतो. हा महापालिकेच्या निगडीतची बाब आहे. नागरिकांना सुध्दा पेईंग कॅपेसिटी बद्दलचे जागृती झाली पाहिजे. लोकांना पेची ॲडिट झाली पाहिजे. शेवटी आज न उद्या आपल्याला ह्या प्रभाणात करणे अपेक्षित आहे आता त्यामध्ये दराची सुधारणा आपण जर ठरवत असणार तर तसा प्रस्ताव मी सादर करेल.

**गिता जैन :-**

साहेब वसुल केलेले आहेत त्या पैशाचे काय करणार.

**मा. आयुक्त :-**

सांगितले ना ते ॲडजस्ट होतील. मी पूर्वीच सांगितले.

**गिता जैन :-**

साहेब तशी हमी द्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम अभी जो विषय उपस्थित हुआ है उसके अंदर पचास रुपया पर स्क्वेअर फीट पर मन्थ, पर अवर्स हाऊस पर हाऊस ५० रुपया एव्हरी मन्थ पर मन्थ ठिक है। उसका मतलब यह हो गया की, साल का ६०० रुपया हो गया। मुझे यह समझना है की, यदी इसके हिसाब से हम कर लगाऐंगे तो जिसका २०० फुट का कार्पेट एरिया है आज उसको एक साल का ६०० रुपया लग रहा है। तो उसका भी २०० रुपया लगेगा और जिसका कार्पेट एरिया हजार फीट है यदी इसके हिसाबसे लगालेंगे की उसको भी उतनाही लगेगा। तो इसकी उपर स्टडी करने की जरुरत है। और यदी कही भी ऐसे कोई विसंगती है तो कमिशनर साहब को पुरी जातपडताल करने के बाद में जो भी रेक्टीफिकेशन करना है सभागृह को विश्वास में लेके किजिए। नही तो ऐसा नही जाए की १०० रुपया फुटवाला भी वही भर रहा है। और हजारवाला भी वही भर रहा है।

**मा. आयुक्त :-**

तुमची सूचना मान्य आहे.

**गिता जैन :-**

पर दर स्क्वेअर फुटवर होत नाही. त्या घरात किती माणसं राहतात त्यावर होते.

**सुरेश खंडेलवाल :-**

घर के हिसाब से ५० रुपये है मॅडम।

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये जे काही सुधारणा होईल ते सभागृहातच होईल.

**गिता जैन :-**

मी परत सांगते मी माझा मुद्दा मांडत असेल. तेव्हा प्लीज कोणीतरी इंटरफेअर करायचे नाही. मी आयुक्तांकउे जवाब मांगते. त्यांनी द्यावे की तुम्ही द्यावे.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. आयुक्तांनी जवाब दिलं होत तुम्हाला तरी पण तुम्ही उभे होता म्हणून आम्ही आमची शंका मांडली. त्याच्यामध्ये विषय एकच चालू आहे. तुम्ही बोलत आहेत ते बरोबर आहे. ते सभागृहाला माहिती पडू द्या की त्या विषयामध्ये प्रत्येक घराच्या मागे..................

**गिता जैन :-**

साहेब मी तर सांगते तुम्ही त्यांना २०० बदली ६०० लावा. तुमचा जी.आर काय सांगतो लावायचं की नाही लावायचा. ते फक्त सांगा आणि ते जे २०० चे बोलतो माझा २० हजार फुटचे घर आहे. काय करणार मी. साहेब आम्ही दोनच माणस राहतो. आमच्याकडे कचरा फार कमी निर्माण होतो. मी माझ्याबद्दल बोलतच नाही. पण ज्यांचा हजार आहे त्यांना कर जास्त भरावा लागतो की नाही. ज्यांचं बाराशे, पंधराशे ते ही आहेत ना ह्या शहरात. तुम्ही २०० धरुन कसे करु शकता. ही बोलायची पध्दत नाहीच आहे की दोनशेवाल्यांनी ६०० भरावे लागेल. मग हजारवाल्यांनी............

**मा. आयुक्त :-**

त्यांचा मुद्दा असा आहे मोठ्या आणि ज्याच्या वेगवेगळ्या बाबी असतील त्यांना ही तोच होतो आणि लहान गरिब त्यांना ही तोच टॅक्स होतो. हा तो त्यांनी मुद्दा मांडलेला आहे.

**गिता जैन :-**

साहेब गरिब असो की श्रीमंत असो. कचरा कोण निर्माण करतो तेवढेच होते की वेगळे होते. गरिब आहे म्हणून कचरा कमी करतात का?

**मा. आयुक्त :-**

हे पहा मॅडम, इंटरनॅशनल मॉलचे जर पाहिला गरिब देशामध्ये पर पर्सन, २०० ग्रॅम होते. पर डे आणि इंटरनॅशनलला युरोपीयन कंट्रीमध्ये त्याचा आपल्यापेक्षा १० पट आहे. हा त्यांच्या जीवनमान राहणीमानावर कचरा निर्माण होतो. व्यक्ती म्हणून नाही.

**गिता जैन :-**

कोण किती निर्माण करते त्या वादातच जायचं नाही. मी नियम काय आहे ते सांगते.

**मा. आयुक्त :-**

त्याचे मालक आहे, गरिब माणसाचा कचरा जास्तीचा होणारच नाही.

**गिता जैन :-**

हा बजेटमध्ये इनकम कसे धरले आहे पर स्क्वेअर फुट धरली आहे की नाही? मग मी ते सांगते तुम्हाला ते इनकम कसे धरु शकणार. तुम्ही एक बाजू हमी पडत आहेत की आम्ही ते परत द्यायला बांधिलकी आहोत. मग परत देणार तेव्हा तुमचे हे फिगर कुठे थांबते ते मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये याबद्दल जी चर्चा झाली त्याची नोंद घेतो. उपमहापौर साहेब म्हटल्याप्रमाणे आणि याचा डिटेल अभ्यास करुन याच्यामध्ये जे काही सुधारणा करणे अपेक्षित आहे. ते सभागृहाला विश्वासात घेऊन केले जाईल.

**प्रभात पाटील :-**

ताईला ही तेच बोलायचे आहे की जे बील आपण दिलेली आहेत कोणतेही पक्षाचे नगरसेवक असो, भाजपचे असो, कॉंग्रेसचे असो कोणाचेही असो शहरामध्ये ह्या घनकचरा शुल्काविषयी खूप असंतोष आहे. हे मला तुम्हाला पुन्हा सांगावे असे वाटत मॅडम आपण जबाबदार आहात. शहराचे प्रथम नागरिक. मा. आयुक्त साहेब तुमची पण तेवढीच जबाबदारी बनते की ह्या शहरातील नागरिक हा नेहमी तणाव फ्री किंवा तुमचा कारभार विषयी समाधानकारक असला पाहिजे. समाधानी असला पाहिजे जी काही देयक गेलेत घरी त्याच्याविषयी शहरामध्ये असंतोष आहे. आता तुम्ही जे म्हटलं मॅडमने प्रश्न उपस्थित केला खूप चांगला प्रश्न आहे. आणि तुम्ही जे आश्वासित केले की पुढच्या महासभेमध्ये किंवा ह्या सभागृहामध्ये ह्या विषयी चर्चा करुन ते देयके आपल्याला कसे कमी करता येतील किंवा समाधानकारक आपण नागरिकांना कसे उत्तर देऊ शकतो. ह्या विषयाचा प्रस्ताव लवकरात लवकर महासभेत आणावा आणि लोकांना ह्या कचरा शुल्काविषयी समाधानकारक उत्तर तुमच्याकडून मिळावी अशी माझी अपेक्षा आहे. तो विषय लवकरात लवकर करावा.

**मा. आयुक्त :-**

निश्चितच तशी कारवाई केली जाईल.

**गिता जैन :-**

साहेब जर तुम्ही हमी देतात ठीक आहे. आमच्याशी ती चूक झाली आणि आम्ही लावले आहे. पण आता सांगते जे लावलेले आहेत ज्यांनी भरले त्यांना परत करा आणि ज्यांना लावलेले आहेत त्यांना वजा करुन तुम्ही ते बील जमा करा. नाही तर परत तुम्हाला तेच करावे लागेल.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला अजूनही सांगतो. आमच्याकडून काही चूक झालेली नाही. मी परत परत सांगतो आम्ही चांगले करण्याचा प्रयत्न करतो. ह्या महासभेने जे निर्णय केलेले आहेत मला ते जनतेच्या हितासाठी आणि महापालिकेच्या भल्यासाठी चांगले वाटले म्हणून त्याची अंमल केलेली आहे. त्यानंतर राज्यशासनाचे त्यात दर आलेले आहेत. राज्यशासनाचे दर हे लोअर साईटला आहेत. त्याच्यात सुधारणेचा प्रस्ताव आणला जाईल. ज्या लोकांनी पैसे भरले आहेत त्यांचे पैसे ॲडजस्ट केले जातील. आता ह्याच्यात हेवा करण्याचा काही विषय नाही आणि तुमच्या विषयाची नोंद घेतलेली आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण जो ठराव महासभेमध्ये पास केला त्या ठरावाचे व्यवस्थापन हाताळून २०१६ अन्वये केला आणि हा जो जी.आर आला आहे. हा डिसेंबर २०१८ ला आला आणि आपला ऑलरेडी फेब्रुवारीच्या महासभेत पास झाला होता. त्याच्यात तुमची बील जुलै ऑगस्टला द्यायला पाहिजे ती बील गेली जानेवारी फेब्रुवारीला आणि त्याच्यामुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला तर साहेब आमची सगळ्या सभागृहाच्या वतीने विनंती आहे की ते सगळे रद्द करुन ह्या दोन्ही जी.आर चा क्लब करुन फेरप्रस्ताव पुन्हा महासभेत सादर करा.

**गिता जैन :-**

साहेब आपण हे बील लावलेली आहेत. जानेवारी २०१८ पासून जेव्हा बील तुम्हाला लावायची आहेत. जानेवारी नेक्स्ट मंथ २०१९ पासून कारण १५ डिसेंबर २०१८ ला तुम्हाला आलेली आहेत. मग आपण ते पूर्ण वर्षाचे का कलेक्ट करतो.

**मा. आयुक्त :-**

मला काय म्हणायचे आहे मॅडम हा जी.आर चा आता तुम्ही आल्यानंतरचा अर्थ काढून तुम्ही बोलायला लागलात. आमची कारवाई जसं धृवकिशोर पाटील सांगितले की ऑलरेडी झालेली होती आणि त्याचे इम्प्लीमेंटेशन टाईमींगमध्ये निघाले होते. आता आपल्या नागरिकांना बोजा होऊ नये आणि त्यांना जास्तीचे देय आपल्याकडून होऊ नये ह्याचे रेक्टीफिकेशन केले जाईल आणि तसे ह्या सभागृहात त्याला अंतिम करुन अंमल केलं जाईल आणि ज्या लोकांनी पैसे भरले असतील त्याच्याबद्दलचा निर्णय घेतला जाईल. त्यांचे एक्सेस पैसे बीलात ॲडजस्ट केले जातील.

**गिता जैन :-**

साहेब ते ही मी ॲग्री करते. आपले प्रोसेस झालेले ते ही ॲग्री करते. आपल्याला डिसेंबर २०१५ ला जेव्हा आलं तेव्हा एक समाचार पत्रामध्ये असे काही लोकांना कळवायची गरज नव्हती. आता तुम्हाला हे रेट लावायचे आहेत. तुम्ही ते जुने बील भरु नका. काहीतरी करायला पाहिजे होते. आपण दोन मंथ काहीच बोलले नाही. साहेब आपल्याकडे फेब्रुवारी महिना होता. फेब्रुवारी आधी आपण प्रस्ताव आणला असता नविन ठरावाचा.

**मा. आयुक्त :-**

राज्यशासनाने बेस रेट डिक्लेअर केलेले आहेत. एखादी महापालिका त्याच्या जास्तीची सुध्दा लावू शकते. त्यांना जर लावायचं असेल तर.

**गिता जैन :-**

असे कुठे आहे ते दाखवा.

**मा. आयुक्त :-**

हा राहतो कुठलेही टॅक्सचे धोरण तसेच असते.

**गिता जैन :-**

मी तुम्हाला सांगते. तुम्ही तसे दाखवा नाहीतर मी खरंच कोर्टात जाणार.

**मा. आयुक्त :-**

आपण जकात वापरत होतो. जकातमध्ये सगळ्यात बेस्ट रेटपेक्षा कितीतरी हायर साईटचे रेट लावत होतो. आपली इथली व्यवहाराची दक्षता पाहून................

**मा. महापौर :-**

आयुक्तांनी उत्तर दिले ना.

**गिता जैन :-**

मा. आयुक्त साहेब एकतर आता तुम्ही डिक्लेअर करा. जे तुम्ही लावलेले आहे ते रिफंड भेटणार ज्यांनी अजून भरलेले नाहीत त्यांनी भरु नये. फक्त जे लावलेले आहेत घनकचरा तेवढेच सांगते. पूर्ण बील घ्या. साहेब मला कोर्टात जावं लागेल.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, जो घनकचरा आणि एस.पी.एम.एल चा प्रोजेक्ट न पुरवता जो टॅक्स लावला जातो वर्षानुवर्षे जसे राई, मोर्वा, मुर्धा, घोडबंदर, चेणा आमचा पूर्वीकडचा भाग हा ज्या दिवशी अनाऊंसमेंट झाली. त्या दिवसापासून लोक तो टॅक्स भरत आहेत. पण त्यांना सुविधा नाहीच आहे आणि आता नक्की ठरल आहे की ह्या एरियामध्ये हा प्रकल्प राबवला जाणार नाही. मग एरिया कमी करण्याचा मग टॅक्स व्हाईस रिफंड द्यायला म्हणजे आम्ही तर रिफंड मागत नाही. टॅक्स वर्षानुवर्षे भरतो. लोकांच कस होत की ज्यावेळी लोक प्रश्नोत्तरला सुरुवात होते तेव्हा एक एक प्रश्न वाढत जातो. आता त्यांना आपण सोयी देतच नव्हतो आणि टॅक्स घेत होतो. त्याच्यात घनकचराचा टॅक्स दिला तर हा कोणता टॅक्स आहे. ते आधीचे तर भरतच नव्हते. आम्ही विनंती करत होतो.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या मुद्दयाबद्दल आपण त्याचा अभ्यास करुन आणि त्याच्यात काय सुधारणा अपेक्षित असेल ते आपण करु.

**मदन उदित नारायण सिंह :-**

म्हसाळ साहेब आपण हे पत्र दिलं आहे म्हणजे तुमची आमच्यापासून काय अपेक्षा आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

सन्मा. महापौर महोदया यांच्या परवानगीने बोलतो, मध्यंतरी मागच्या वर्षी आपण जी घरपट्टी भरलेली नाही म्हणून कारवाया चालू केल्या होत्या. त्यावेळी अनेक सदास्यानी आमच्याकडे भावना व्यक्त केल्या की जर साहेब आम्हाला पूर्वी कळवलं असते तर आमच्या मतदार संघामध्ये नागरिकांच्या आमच्याकडे तक्रार येतात. आमचे मतदार येतात आणि आम्ही लवकर त्यांना भरण्यासाठी सांगितलं असतं तुम्हाला फक्त विनंती केली की, तुमचे आम्ही कारवाई जी करणार आहोत नळाचे कनेक्शन कट करणे वगैरे ह्यासाठी तर त्याची तुम्हाला कल्पना देण्यासाठी हे पत्र दिलं बाकी काही नाही.

**मदन उदित नारायण सिंह :-**

साहेब हे ठिक आहे. ज्यांना आपण बीलच देत नाही लोक पैसे भरायला तयार आहेत. आपण बीलच देत नाही. माझ काय म्हणणे आहे ज्यांचे २०-२०, २५-२५ वर्षापासून आपण टॅक्स लावला आहे. त्यांचे बील येत होते. अचानक त्यांचे बील येणे बंद झाले आहे. असे आपल्या शाळेतील कितीतरी प्रकरण आहेत आणि मी जेव्हापासून प्रभाग सभापती झालो तेव्हापासून मी बरेच प्रकरण इथे पाठवले आहेत की यांची येणारी बील मागील वीस वर्षापासून येत होती ती बील आता बंद झाली आहेत. ती बील काढून द्या. आपल्या विभागातून बिल देत नाही. लोक टॅक्स भरणार कुठून .

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

आपण मोस्टली बिल दिली आहेत........

**मदन उदित नारायण सिंह :-**

मी खोट बोलतो का सांगा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

मला तुम्ही दाखवा.

**मदन उदित नारायण सिंह :-**

मी किती वेळा पाठवले आहे. तुमच्या विभागप्रमुखांना फोन केले. ज्या माणसाचे बिल बंद झाले तो १०-२० वेळा येऊन गेला. अजून पर्यंत त्याची बिल निघत नाहीत. तुम्ही बिल देत नाही म्हणून लोक पैसे भरणार कुठून. लोक पैसे भरायला तयार आहेत. तुमची घ्यायची तयारी नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

आपली बिल जनरेट झाली आहे.

**मदन उदित नारायण सिंह :-**

जनरेट झाली नाहीत. पूर्वी २० वर्षापासून बिल येत होती अचानक बिल बंद झाली ते फेरफटका मारतात की आम्हाला आमची बिल द्या. तुम्ही बिल देत नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

कोणत्या एरियाचे आहे ते सांगा.

**मदन उदित नाराण सिंह :-**

पूर्ण मिरा भाईंदरचा प्रश्न आहे. माझ्या प्रभाग समितीमध्ये २५ प्रकरण आहेत आमचे लिपीक येऊन दमले पण तुम्ही बिल देत नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

आपण मला सांगा.

**मदन उदित नारायण सिंह :-**

आता कोणावर कारवाई करायची. तुम्ही म्हणता ज्यांनी बिल नाही भरले त्यांचे कनेक्शन खंडीत करु. आणि बिल देत नाही त्याची कारवाई कोणावर करायची तुमच्यावर करायची का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

त्याच्यासाठी जबाबदारी निश्चित करतो. तुम्ही म्हणता बिल काढली नाहीत. त्याची जबाबदारी निश्चित करतो.

**मदन उदित नारायण सिंह :-**

माझे असे म्हणणे आहे की ज्यांची बिल निघाली नाहीत ते कोणाच्या चूकीमुळे झाले आणि ते कधीपर्यंत द्याल ते लवकरात लवकर निश्चित करण्यात यावे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

देतो.

**मदन उदित नारायण सिंह :-**

नाहीतर आपल्या चुकीमुळे त्यांना भुर्दंड भरावा लागेल.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करतो.

**मदन उदित नारायण सिंह :-**

त्याची दखल घेण्यात यावी. आणि अंमलबजावणी करण्यात यावी.

**जयेश भोईर :-**

म्हसाळ साहेब मुर्धा ते उत्तन भुयारी गटार अजुन झाले नाही. त्याचा टॅक्स आपण मालमत्ता करामध्ये लावतो. आम्ही लोकांकडे गेलो आणि सांगितले की मालमत्ता कर भरा तर लोक आम्हाला बोलतात की आम्ही भुयारी गटारचा वापरच करत नाही आणि आम्हाला टॅक्स येतो. त्याचे काय करायचे. मुर्धा आणि उत्तनमध्ये योजना राबवली गेली नाही.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

आपल्याकडे मल लाभ कर जे आहे ते ॲक्च्युअली ह्याच्यासाठी नाही. ही योजना आपल्या शहरासाठी आलेली आहे.

**विनोद म्हात्रे :-**

आता जयेश भोईर ने जो मुद्दा उपस्थित केला मुर्धा ते उत्तनमध्ये भुयारी गटार योजनाच नाही. आणि आपण टॅक्स वसूल करतो. मागच्या सभेमध्ये विषय काढला होता की मुर्धा ते उत्तनमध्ये वसूल केले जाणार नाही. मग परत तिकडे का पाठवले. त्याचे मला स्पष्टीकरण द्या.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त) :-**

सन्मा. सदस्य ज्यावेळी हा कर लागू केला त्यावेळी त्याची पूर्ण चर्चा झाली होती. भांडवली खर्च म्हणजे आपल्या शहरासाठी ही स्किम आहे. त्याची..........

(सभागृहात गोंधळ)

**विनोद म्हात्रे :-**

साहेब मुर्धा ते उत्तनपर्यंत पूर्ण समाज गरिब आहे. पूर्ण ग्रामीण भाग आहे. त्याच्यावर नाना प्रकारचे आपण कर लावतो. उत्पन्नाचे काही स्त्रोत नसताना विनाकारण त्यांच्याकडून कर वसूल करतो. आता घनकचरा कर तुम्ही लावला म्हसाळ साहेब त्याचा मला खुलासा द्या.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला स्पष्टीकरण देतो. सन्मा. सदस्यांना विनंती आहे आपण चांगली चर्चा केली तर सगळे मुद्दे निरसन होऊ शकतात. आपण आपआपसात चर्चा केली तर तो गोंधळ होतो.

**गिता जैन :-**

तुम्ही उत्तर देणार त्याआधी अजून एक मुद्दा आहे. एवढी खोटी बीले आलेली आहेत. जिथे बिल्डींग चार माळ्याची आहे. तिथे ७-७ माळ्यापर्यंत बिले आलेली आहेत. कुठून वसूल होणार ते ही माहित नाही. तिथे पाचवा, सहावा, सातवा माळाच नाही. इथे अक्सा इन्क्लेव्ह म्हणून आहे. तिथे २ फ्लॅट बांधलेच नाही बिल्डरने पण अजून त्या नावाचा ७०१, ७०२ बिल्डरने बांधले नाही तरी त्या नावाने बील येतात. हे सगळे खोटे बिल काढत का नाहीत. खोटे आपल्याला फिगर खोटे मिळते म्हणून वसूली होत नाही. आपण एवढी खोटी बिल प्रोड्यूस केलेली आहेत की, आपल्याला फिगर मिळणारच नाही. मग आपण दरवेळी ५० टक्के पर्यंतच राहतो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी सुविधा लाभ करावर चर्चा करतात की आम्हाला ती फॅसिलिटी नाही. त्याचा आम्हाला टॅक्सचा बोझा येतो. टॅक्स हे २-३ प्रकारचे असतात. सामान्य माणसाचे सुध्दा डिफेन्सला टॅक्स जातो हेल्थला टॅक्स जातो, नेव्हीला टॅक्स जातो, एअरला टॅक्स जातो. वेगवेगळ्या माध्यमातून तो कन्सल्टेड तो जी.एस.टी. मधून जातो. किंवा एस.आय मधून जातो. केंद्राच्या राज्याच्या तसेच महापालिकेच्या मालमत्ता करामध्ये कन्सलटेन्डेड टॅक्समध्ये वेगवेगळे टॅक्स आहेत आपण नुसते शहरासाठीच नाही आहे तर ग्रामीण भागासाठी सुध्दा टॅक्स देतो आहे शहरामध्ये आपल्या मालमत्ता करामध्ये शिक्षण कर आहे जो रोजगार हमी योजना कर आहे त्याप्रमाणे वृक्षकर आहे आणि अग्निशमनकर आहे आणि सुविधा कर आहे. पाणीलाभ कर आणि मलनिःसारण लाभ कर हा कन्सलटेन्डेंड प्रॉपर्टी टॅक्सचा भाग आहे की याच्यात भविष्यामध्ये जी योजना करणे आणि योजनेचे कार्यपालन करणे लगेच त्याची मला आज सुविधा आहे म्हणूनच मी देतो असे नाही. तरी कृपा करुन त्याची दोघांची गल्लत करु नका आपण नाहीतर कुठलीच योजना होणार नाही. हा मुल्यमापन इन्ड्युज्वल माणसाशी निगडीत नाही तर पूर्ण शहराशी निगडीत आहे.

**रोहिदास पाटील :-**

ज्यावेळी आधी लावले त्यावेळी लोकांनी तक्रार केली नाही. हे शहराशी सामुदायिक आहे म्हणून त्यांनी स्वागत केले. जेव्हा तुमचे आता नक्की होते आहे की भाईंदर पूर्वेला देऊ शकत नाही, उत्तनला देऊ शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

मी उत्तनसाठी सांगतो आता आपण नविन डी.पी.आर करतो आहे. आपल्याला फक्त नवघरचा दलदलीचा भाग असल्यामुळे आणि आता तिथे असलेल्या स्ट्रक्चरल धोका होऊ शकतो  काम करताना ही प्रॅक्टीकली अडचण आहे म्हणून फक्त भाईंदरचे जे पश्चिम आणि पूर्वेचे अडचण आहे. मला ही माहित आहे की तिथे जुन्या बिल्डींग आहेत आणि ९ मीटर, ८ मीटर जर खाली खोदले तर दोन्ही साईडच्या बिल्डींग कोलॅप्स होतात म्हणून तिथे अंमल करणे अवघड आहे आणि राई, मुर्धाच्या जो सोर्स एरियाचा भाग आहे म्हणून हायर साईड लोअर साईड भौगोलिक दृष्टीनुसार तिथली परिस्थिती तर त्याचा आपण नविन डी.पी.आर करत आहोत. तर ह्याचा पॉकेटसाठी सलग्न पूर्ण गावाची एकत्र न करता त्या वस्तीनिहायमध्ये आपण करतो आहे. तो पूर्ण शहरासाठीचा टॅक्स आहे. इन्डीव्युजवल टॅक्स नाही.

**विनोद म्हात्रे :-**

याच्या आधी जे काही ८ टक्के प्रमाणे कर लावले ते लोकांनी भरले.

**मा. आयुक्त :-**

किती भरलेले आहेत त्याची सांगड काढून देऊ. ॲक्च्युअल काय होते त्याच्यावर चर्चा केली पाहिजे.

**विनोद म्हात्रे :-**

गावकऱ्यांची काय अवस्था आहे. अक्षरशः स्वतःचे टॅक्स भरू शकत नाही. अजून त्यांच्यावरती ॲडीशनल टॅक्स लावत चालले.

**मा. आयुक्त :-**

आपण त्याची एक वेगळी बैठक घेऊन चर्चा करु त्याच्यावर काय करता येईल.

**दिनेश जैन :-**

विजयकुमार म्हसाळ साहब जो पत्र भेजा है वो सभी को भेजा है। मेरी प्रभाग समिती क्र. ५ के अंदर २५ करोड रुपया दुबारा निर्लेखित मैंने पुरा डेटा निकाल के भेजा था। लेकिन वो दुबार बारबार लेके आता है। दुबार तो हम लोग निकाल सकते है। तो सामनेवाला टॅक्स भर सकते है। एक ही फ्लॅट के २-२ बील आ रहे है। तो वो कौनसा बील भरना है। कौनसा बील नही भरना वो तो कॅन्सल करो। उसके बाद में निर्लेखित का है तो निर्लेखित के उपर भी कोई विचार नही हुआ है तो वो सारा वापीस मुझे मेरे सभापती कार्यालय में पुछा गया की वहाँ देखा जाएगा। इसके बाद टॅक्स के बील भी प्रभाग समिती बहुत जगह पे नही पहुँचे। उसकी अलावा वहाँ पे जो टॅक्स कलेक्शन करते है उनके पास में टॅक्स के पेपर नही है, रीम नही है। तो उनको मैं ३-४ बार मैंने खुद लाके रीम दिया है। ताकी उनको टॅक्स कलेक्शन कर सके। तो यह सब चिजो पे आप गौर करीए और निर्लेखित दुबार है, वो खास करके के २५ करोड रुपये खाली प्रभाग समिती क्र. ५ के अंदर ही है।

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम, नागरिक टॅक्स हा भरतो. प्रत्येक माणूस टॅक्स महापालिकेच्या भितीने भरतो. पण मॅडम आता आपण डब्बे वाटप केले, फक्त डब्बे आपण बिल्डींगलाच वाटप केले. आता आमचे गाव राहिले, उत्तन भाग राहिला, आमच्या झोपडपट्ट्या राहिल्या आमचे काय?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी ही देऊ आपण .

**नयना म्हात्रे :-**

कधी?

**मा. आयुक्त :-**

दुसरा लॉटमध्ये त्यांनाही देऊ. अजून कोणी रोहिले असतील त्यांना ही देऊ.

**नयना म्हात्रे :-**

साहेब त्याला किती दिवस जातील.

(सभागृहात गोंधळ)

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम, मी पानपट्टे साहेबांना एक पत्र दिलं की मला आमचा आरोग्याच निधी होता त्याच्यातून कुंड्या बनवून द्या. आम्हाला झोपडपट्टीला जेणेकरुन त्याच्यात कचरा तरी त्याच्यामध्ये टाकतील. त्याच्यावर पानपट्टे साहेबांनी आतापर्यंत काही केलेच नाही.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या निधीतून ही वाटू शकता तुम्ही तसा आपण निर्णय घेऊ.

**नयना म्हात्रे :-**

पण निधी पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग निधी किंवा विशेष समितीचे निधी.

**नयना म्हात्रे :-**

सर्व निधी संपला आता.

**मा. महापौर :-**

आप सब बैठ जाईए और एक एक करके बोलिए।

**प्रविण पाटील :-**

भाईंदर पूर्वेला तुम्ही मगाशी म्हणालात जे काही मॅपींग करतात. भाईंदर पुर्वेला कशाला करणार तुम्ही बोललात भाईंदर पूर्वेला करणार नाही असे बोलले मगाशी.

**मा. आयुक्त :-**

भाईंदर नवघरचा जो भाग आहे तिथे मॅग्रोज असल्यामुळे तिथे सिव्हरेजचे काम करायला सध्या अडचण आहे. तर तिथे विशेष टेक्नॉलॉजी घेऊ.

**प्रविण पाटील :-**

नवघरचा म्हणजे नेमका कुठला एरिया आहे.

**मा. आयुक्त :-**

जो जुना गावठण आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब तुम्ही आता सांगत आहेत तिथे दलदल झाले, तिथे मोठ मोठे टॉवर्स आले. कुठलेही कारण सांगून त्या भागातला वगळण्याचा प्रयत्न करु नका. तिथे तुम्हाला कोणी सांगितले दलदल आहे. तिथे मोठ मोठे एकवीस माळ्याचे टॉवर्स आहेत. मॅपींग म्हणतात तो भाग वगळणार.

**मा. आयुक्त :-**

रेल्वे स्टेशन आपला जो मेन नवघर रस्ता आहे त्याला वेगळ्या टेक्नॉलॉजीने आपल्याला करावं लागेल.

**प्रविण पाटील :-**

मॅपींग तर करुन घ्या ना तुम्ही. मॅपींगमध्ये पूर्ण घ्या. करताना नंतर करा.

**मा. आयुक्त :-**

मॅपींग १०० टक्के करु.

**राकेश शहा :-**

म्हसाळ साहेब, हमारी सोसायटी में कितने परसेंट टॅक्स जमा होने के बाद में उनका पानी कनेक्शन कट कर सकते है।

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

८० टक्के.

**राकेश शहा :-**

कारवाई कितने परसेंट टॅक्स नही भरने पे करते है। बहुत सारे सोसायटी में म्हसाळ साहब ऐसा है की, वो लोग सोसायटी का मेनटेनन्स बील भी भरते नही और उनका पानी कनेक्शन जो में बाकी लोगो का क्या उसमें गलती है।

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय, ह्याच्यावरती असे आहे की तत्कालीन मा. आयुक्त शिवमुर्ती नाईक होते. त्यावेळेला आपण जसे म्हणत आहेत तुम्ही सोसायटीचे महापौर मॅडम, सोसायटीचे कनेक्शन आपण बंदर करणार. ८० टक्के टॅक्स नाही भरला तर मा. आयुक्त महोदय आज एका बिल्डींगमध्ये सरासरी चार माळ्याची बिल्डींग असली की २० फ्लॅट असतात त्यामधील १० फ्लॅट टॅक्स भरते किंवा मेन्टेनन्स भरते.

परंतु १० फ्लॅट भरत नाही. तर त्याचा भुर्दंड हा सोसायटीला भरावा लागतो. तर मा. आयुक्त महोदय आपण हे सगळे करत असताना संबंधित पोलिस स्टेशनला आपण ही पत्र द्यावे. जेणेकरुन त्या सेक्रेटरी आणि चेअरमन जेव्हा त्याची लाईन कट करतील तेव्हा त्या संबंधितांवर गुन्हा दाखल न व्हावा हे जरा पत्र आपण पोलिस स्टेशनला द्यावे. धन्यवाद.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक अंतिम मंजुरीसाठी स्विकारुन सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे काही दुरुस्त्या सुचविण्यात आलेल्या आहेत. बांधकाम व पाणीपुरवठा विभागाच्या सोबत जोडण्यात आलेल्या कामांच्या यादीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देवून त्याचप्रमाणे आस्थापना विषयक तरतुदी पाहता शासनाचे ७ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन प्रदान करणेस तसेच शहरातील पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या नाले सफाई व सक्शन पंप भाड्याने घेणेच्या रु.३ कोटीच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देवून निविदा मागविणेस ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**<u>सन २०१८-१९ चे सुधारित अंदाज व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक</u>**

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2018-19 (सुधारित अंदाज) | 2019-20 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| **एकूण जमा** | 92658.28 | 170391.19 |
| **एकूण खर्च** | 92631.11 | 170375.69 |
| **अखेरची शिल्लक** | **27.17** | **15.50** |

**सुशील अग्रवालः-**

माझे अनुमोदन आहे

**अनिल विराणी :-**

महापौर मॅडम ठराव में मेरी एक सुचना है। मिरा भाईंदर महानगरपालिका सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये शहीद मेजर कौस्तुभ राणे जॉगर्स पार्क विकसित करणेकामी आवश्यक निधी तरतुद करुन स्वतंत्र लेखाशिर्षकामध्ये हेड समावेश करण्यात यावे अशी माझी सुचना आहे.

**स्नेहा पांडे :-**

उसने बोला की, कुछ पार्ट कम पडे, कई डब्बा एक्स्ट्रा है। उसके व्हील्स नही मा. महापौर मॅडमने ही पत्र दिया था तो उसपर क्या हुआ है। अभी तक खुलासा नही हुआ।

**मा. महापौर :-**

उसकी जानकारी बाद में दि जाएगी।

**स्नेहा पांडे :-**

क्लिअर खुलासा करना चाहिए। खुलासा हमको कमिशनर कॅबीन में ही लेना रहता है तो यह महासभा क्यों लगती है।

**अनिल सावंत :-**

बजेटची विशेष महासभा मी सकाळपासून चर्चा बघतो. सभागृह नेत्यांनी सुरुवात केली बजेट सोडून इतर सर्व चर्चा होत आहे. महापौर भाजपाचे, आमदार भाजपाचे ज्यांच्या मार्गदर्शनाखाली हे बजेट बनलं. स्टॅन्डींग कमिटी सभापती भाजपाचे ज्यांनी हे बजेट बनवलं आणि तुमचे भाजपाचे सदस्य "ज" चे प्रस्ताव मांडत आहेत आणि तेच चर्चा करत आहेत बजेटच्या विरोधात.

**प्रशांत दळवी :-**

बजेटच्या विरोधात चर्चा नाही.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

सभागृहाचा वेळ कशाला वाया घालवत आहेत. ठराव करायचे तुम्ही शुल्क लावायचे आणि आता त्यानंतर चर्चा घडून आणायची त्यावेळी ही विरोध करायचा होता की शुल्क लावला म्हणून आता बजेट आलेला आहे. मा. महापौर महासभेमध्ये हक्क आहे पण कशाप्रकारे चर्चा करणार आम्ही बोलायला उभे

राहीलो की तुम्ही बसा. स्टॅन्डिंग कमिटी सभापती तुमचे आहेत. तुमच्या सदस्यांचे सूचना तुम्ही का नाही घेतल्या त्याच्यामध्ये. २०१९-२० चा बजेट, २०१८-१९ चा मूळ अंदाजपत्रक होता. १३६९ करोडचा सन्मा. सदस्य माझे मित्र धृवकिशोर पाटील यांनी मांडले होते आणि आज ते सुधारीत बजेट ज्यावेळी या आयुक्तांनी दिलं ते होते. फक्त ९२६ करोड म्हणजे आपण फक्त ४८ टक्के म्हणजे आपण फक्त गेल्या वर्षीच्या बजेटच्या ४८ टक्क्यापर्यंत पोहोचू शकलो. ह्या वर्षामध्ये ४८ टक्के फक्त सन २०१८-१९ चा बजेट आणि आज गेल्या वर्षीचा बजेट होता. १३६९ करोड २०१८-१९ टोटल बजेट जमा १३६९ खर्च दराचे धृवकिशोर पाटील यांनी मांडले होते आणि आज तोच ज्यावेळी सुधारीत बजेट २०१८-१९ मा. आयुक्त साहेबांनी दिलेले आहे. तो फक्त ९२६ करोड आहे. म्हणजे फक्त गेल्यावर्षी जे स्टॅन्डिंग कमिटी सभापतीने महासभेला जो बजेट दिला होता त्याचे फक्त ४८ टक्के आपण पोहोचू शकलो. सुधारीत ९२६ दिले आहेत काढून बघा सभागृहाचा टाईम वेस्ट करु नका. आज आपले बजेट आहे १६८१ करोड म्हणजे गेल्या वर्षीचे जे सुधारीत बजेट आहे ९२६ करोड आणि आज आपलं बजेट आहे १६८१ करोड म्हणजे जवळ जवळ त्याच्यामध्ये ८१ टक्क्यांची वाढ केलेली आहे बजेटमध्ये कुठून येणार आहे. पैसे येणार कुठून शहर काय डबल होणार आहे. १६८१ करोडच बजेट मालमत्ता करामध्ये प्रोजेक्शन आहे १४० करोड सन २०१९-२० साठी ही काय छुपे भाडेवाढ तर नाही. शहरावर लादणारी आजची परिस्थिती ही आहे. आज मा. आयुक्तांचे अंदाज गेल्यावेळचे अंदाज आयुक्तांनी ७० करोड दिले होते. सन २०१८-१९ आज २०१८-१९ पूर्ण करण्याच्या मार्गावर आहोत. २५ फेब्रुवारीपर्यंत फक्त ५२ करोड रुपये आपण जमा करु शकलो. मालमत्ता कर आणि कुठलीही फाईल वगैरे पेंडींग नाहीत. मग २०१९-२० मध्ये १४० करोड येणार कुठून काहीतरी खुलासा करा. काही तरी जस्टीफिकेशन द्यावे. १४० करोड म्हणजे शहरातील लोकांनासुध्दा कळू द्या. आज शहरातील जवळ जवळ नागरिक १०० परसेंट पाणीपट्टी भरणारे आहेत. ८० ते ९० टक्के मालमत्ता कराची बील भरणारे लोक आहेत. ह्या शहरामध्ये भिवंडी सारखी परिस्थिती नाही आहे तरी सुध्दा आज फक्त २५ तारीखपर्यंत ५२ करोडवर आपण पोहोचलो आहोत. मग ते फुगवून फुगवून १४० करोड होणार कसे काय करणार आहात. तुमचे मध्येच प्रस्ताव देऊन येणार आहेत की, रेट वाढवण्याचा आणि त्या अनुषंगाने तुम्ही खर्च दाखवणार. मोकळ्या जागेवरील कर हे जे बजेट केले आहे. आजपर्यंत २५ तारीख पर्यंत जमा किती आहेत माहित आहे १५ ते १६ करोडमध्ये आहे आणि आपण किती दिले.

**मा. आयुक्त :-**

आजचे फिगर नाहीत ते तुम्ही जे म्हणत आहोत ५२ कोटी ८ कोटी ते फिगर मागच्या ८ महिन्याचे आहेत आणि चार महिन्यांचे अमाऊंट त्याच्यात आलेले नसतात. मालमत्ता कराचे ५२ करोड नाही. आजची फिगर फार मोठी आहे.

**अनिल सावंत :-**

आजची कालची २५ तारीखची फिगर ५२ करोड होती. मालमत्ता कराची २५ फेब्रुवारीची फिगर ५२ करोड होती. मी आठव्या महिन्याची फिगर नाही सांगत. २५ फेब्रुवारीचे सांगतो.

**मा. आयुक्त :-**

नोव्हेंबर पर्यंतच्या ह्या बजेट फिगर आहेत.

**अनिल सावंत :-**

ॲक्च्युअल कलेक्शन करमणूक कर फक्त म्हणतोय मालमत्ता कर २५ तारखेपर्यंत फक्त ५२ करोड होती. तुम्ही बघून घ्या की जास्तीत जास्त ६० ते ६५ करोड होईल आता मग १४० करोड कुठून जमा करणार आहात. मोकळ्या जागेवरील कर आज तुमचे २५ तारखेपर्यंत १५ ते १६ करोड जमा झाले आहेत. बजेटमध्ये तुम्ही दाखवत आहेत ७५ करोड. किती प्रकरण पेंडींग आहेत. मालमत्ता कर डिपार्टमेंटने काहीतरी जस्टीफिकेशन द्या. बजेटमध्ये आणि अशी आकडे फुगवलेले आहेत की त्याच्यासमोर खर्च दाखवायचे, टेंडर काढायची महापालिकेला तिजोरीमध्ये ठणठणाट आणि आता त्यांनी काहीतरी ठराव केले त्याच्यामध्ये सेव्हन पे कमिशन पण नमूद करून टाकलं. परिस्थिती आहे का आपली? टाळे लावायची पाळी येईल पालिकेला बाजार फी, मा. आयुक्त साहेब मागच्या मिटींगमध्ये आपण प्रॉमिस केले होते. बाजार फी चा ठेकेदार आम्ही काढून टाकणार आणि महापालिका चालवणार. आज रोड वाईडिंगच्या नावाखाली संपूर्ण कॉर्नर बिल्डींगचे तोडले. साहेब जाऊन परिस्थिती बघा. त्या तोडलेल्या जागांवर फेरिवाले डब्बल झालेले आहेत. शांती पार्क असु दे, स्टेशन असू दे आणि बाजार फी १० टक्के वाढवून आपण फेरिवाल्यांना आणखी प्रोत्साहन देणार आहोत शहरामध्ये इमारत परवाना फी चे २९६ टक्के वाढीव बजेट दाखवला आहे म्हणजे किती बोझा ह्या शहरावर येणाऱ्या लोकसंख्येचा इन्फ्रास्ट्रक्चर आपण देऊ शकतो का? हे शहर ७९ स्क्वेअर कि.मी. त्यापूर्वी सुध्दा मी सांगितले होते. जास्तीत जास्त मॅक्झीमम आपण साडे सात लाख लोकसंख्या सांभाळून घेऊ शकतो. आज व्हर्टीकल प्रोग्रेस चालू झालेले आहे. या शहरामध्ये टोलेगंज

इमारती आपण बांधत आहोत. कुठून देणार त्यांना इन्फ्रास्ट्रचर, पाण्याची मेन समस्या आहे. जी.एस.टी. अनुदान आपण १० करोड दाखवलेले आहे. किती आस्थापना आहेत. काही आहे कॅल्क्युलेशन १० करोड आज जी जी.एस.टी. तर पूर्ण महाराष्ट्र शासन जमा करते. आपल्याजवळ काय आहे. वॉर्ड साफसफाई एरिया तेवढाच वॉर्ड साफसफाईमध्ये १२० करोड ३३ टक्के जास्त वॉर्ड साफसफाईमध्ये डिसेंट्रलायझेशन करणार आहोत. ८ ते १० ठिकाणी वेगवेगळे स्पॉट ठरवून त्याठिकाणी वेस्ट कचऱ्याची प्रक्रिया होणार आहे. ट्रान्सपोर्टीशनचा डेफीनेटली कमी होणार आहे. कलेक्शन चार्जेस कमी होणार आहेत. मग ह्या ठिकाणी ३३ टक्के वाढवायची गरज काय? मेन ह्या शहराला भेडसावणारा प्रश्न इललिगल बांधकाम नेहमी आपली बोंबाबोंब असते इललिगल बांधकाम तोडा म्हणून. पण आपल्याकडे पोलिस फोर्स नसतो, इतर फोर्स नसतो. जो आपण घेऊ शकत नाही. ह्या बजेटमध्ये चक्क तुम्ही अतिक्रमणाचा सुरक्षा खर्च कमीच करुन टाकला. बजेटमध्ये खर्चामध्ये मा. आयुक्तांनी जे प्रोव्हिजन केले होते त्याच्यापेक्षा खर्च कमी म्हणजे ज्या ठिकाणी गरज त्याठिकाणी आपण काही करत नाही. समावेशक आरक्षणे ह्याठिकाणी ऐवढी मोठी झालेली आहेत की ती ताब्यात घेण्याची कोणतीही तरतुद त्याशिवाय कोणतेही निवेदन ह्या बजेटमध्ये तुम्ही दिलेले नाही. शहराची फार मोठी गरज आहे. समावेशक आरक्षण किती व्हेकेंड पडलेली आहेत. ताब्यात घेण्याबाबत महिला गेल्यावर्षी, महिला दिनाच्या दिनी मोठा गाजावाजा केला. आमच्या शानू गोहिल मॅडम सभापती होत्या त्यांनी फार परिश्रम घेऊन ह्या शहरातील महिलांना रिक्षा देण्याचा प्रस्ताव महासभेमध्ये पास करण्यात आला आम्ही विरोध नाही केला. द्या ना शहरातील महिलांना. आज दहा रिक्षा दिलेल्या आहेत. ह्या बजेटमध्ये तरतूद फक्त १५ लाख ठेवलेली आहे. बाकीच्या ज्या ९० महिला आहेत त्यांना रिक्षा देण्याची तो प्रोजेक्ट कॅन्सल केला तुम्ही तसे निवेदनमध्ये म्हणायला पाहिजे होते की आम्ही महिलांना देणार नाही. लोकांची दिशाभूल कशाला करता. दुसर एक शुल्क याच्यानंतर काही दिवसांनी येणार आहे. मलवाहिनी जोडणी शुल्क ह्यापुढे जे प्रॉपर्टी कनेक्शन देण्यात येणार आहे त्याचा सुध्दा लोकांना ते भरावे लागणार आहे. कित्येक लोकांना त्याची कल्पना नाही. आज सहा महिन्यांपूर्वी मिटींग झाली. त्यामध्ये सुध्दा सांगण्यात आले होते की आमच्या ७५ टक्के काम पूर्ण झालेलं आहे. जी जे.एन.यू. अंडर ग्राऊंड रेनी सिस्टीमची जी सुविधा होती त्याचे ९५ टक्के काम पूर्ण झालेले आहे ज्याठिकाणी आपण ही सुविधा देणार आहोत. आज परिस्थिती काय आहे. आज त्यांच्या एरियामध्ये ती सुविधाच नाही. आमच्या एरियामध्ये सुविधा आहे, पाईप लाईन टाकलेले आहेत. पण अजूनही जवळ जवळ आठ वर्षे टॅक्स लोक भरत आहेत. अजून ही ती सुविधा प्रॉपर्टी कनेक्शन जॉईंट केलेली नाही. कारण आपले एस.टी.पी. चालू नाहीत. त्यांचे सर्व काम अर्धवट आहेत. आज कॉन्ट्रक्टर लोक खोदून ठेवतात. पाईप लाईन टाकतात नंतर ठिकाण नाही. तो रोड रिपेरिंग करायचा आणि मला तर साहेब तुम्हाला आश्चर्य वाटेल. तुम्हाला कानावर मी गोष्ट घातलेली आहे त्या कॉन्ट्रॅक्टरने सांगितले की आम्हाला पैसे मिळत नाही तर आम्ही काम कुठून करणार. मग खोदायचे कशाला ते कधी पूर्ण करणार. त्याबद्दल काहीच दिलेले नाही. एवढी मोठी योजना साहेब ज्या एरियामध्ये तुम्ही देणार तिथे तरी सांगा. आम्ही एवढ्या वेळेमध्ये पूर्ण करणार आहोत. हा जो ह्याच्यावर फार मोठी चर्चा झाली. विशेष स्वच्छता लाभ कर जो गेल्या ७-८ वर्षापासून आठ टक्के ह्या शहरातील नागरीक भरत आहेत. मग कुठे खर्च केला. एखादी तम्ही सांगितले एखादी आपण सेवा देतो त्याच्याकडून तो खर्च आपण वसूल करु शकतो. गेली ८ वर्ष सुरु तुम्ही शहरातील संपूर्ण १०० टक्के लोकांजवळून घेतलेला पैसा कुठच्या योजनेवर कुठे खर्च केला. त्याचे कोणतेही निवेदन ह्या ठिकाणी लेखी, पाणी पुरवठामध्ये सगळा केला. पाणी पुरवठ्याचे रेट आज तेरा, आठ रुपये, साडे सात, नऊ रुपयांनी आपल्याला पाणी मिळते. तरी सुध्दा डेपी सीटमध्ये पाणी पुरवठा बजेट मलनिःसारण केंद्र देखभाल साडे आठ करोड ते आपण कोणाला देणार आहोत. एस.पी.एम.एल. ला देणार आहोत की आणखी कोणाला देणार आहोत. आज आठ एस.पी.एम.एल केंद्रापैकी तीन केंद्र चालू आहेत. पालिका चालवते आज प्रत्येकाचा एवरेज खर्च साधारण ३२ ते ३० आहे. त्याच्यात जवळ जवळ कर्मचारी जाऊन बघाल तर तीन ते चार कर्मचारी भेटतील त्याच्यापेक्षा जास्त कर्मचारी भेटणार नाहीत आणि एस.पी.एम.एल ने ते करावे. ५ वर्ष ह्या ही योजना पूर्ण झाल्यानंतर एस.पी.एम.एल ने करावे. ह्याच्यासाठी ॲडीशनल कॉस्ट सुध्दा त्याला देण्यात आलेली आहे. तरीसुध्दा हा ॲडीशनल साडे आठ करोड का दाखवला. त्यांनी फ्रीमध्ये करायचे आहे. साहेब त्याचे कॉन्ट्रॅक्ट बघा. त्यावेळी ठरावसुध्दा महासभेमध्ये झालेले आहेत. बी.ए.यु.पी प्रधानमंत्री आवास योजना किती तरतुद करण्यात आलेली आहे. आज त्या योजनेसाठी वारंवार या ठिकाणी नगरसेवक/नगरसेविका वारंवार सांगतात की साहेब ती चालू केलेली योजना तेवढी तरी पूर्ण करा. कोणताही ठोस आश्वासन या ठिकाणी नाही. कधी पूर्ण करणार. वृक्ष प्राधिकरण तरतूद, वृक्ष प्राधिकरणच आपल एक वेगळ बजेट बनते. ह्या मेन बजेटमध्ये तीन ठिकाणी खर्च दाखविलेले आहेत. खर्च आता पी.डब्ल्यू.डी. करणार की वृक्ष प्राधिकरण करणार. तीन ठिकाणी दाखविलेले आहेत. वृक्ष प्राधिकरणसाठीचे

खर्च, मैदान सुशोभिकरण, उद्यान सुशोभिकरण, शेणखत, माती तीन तीन ठिकाणी दाखविलेले आहेत. खर्च सांस्कृतिक भवनासाठी आपण तरतूद केलेली १० करोडची परत एकदा मी माध्यमातून अशी मागणी करतो की ते सांस्कृतिक भवनावर पालिकेने खर्च न करता आगरी भवनाला जागा द्या तसे प्रस्ताव महासभेसमोर आणा. आम्ही त्याला समर्थन देऊ. त्याला ती दीड की दोन एकरची जागा पाहिजे ती त्याला देऊन टाका. सी.सी.टी.व्ही गेल्या वर्षी तर एक रुपया खर्च केला नाही. सर्व रिॲप्रोप्रिएशन केलं. शहरामध्ये सी.सी.टी.व्ही. लावायचे आम्हाला उपमहापौरांनी सांगितल होते राज्य शासन पूर्ण अनुदान देणार आहे. पूर्ण शहरामध्ये आम्ही लावणार आहोत. आज १० करोडची प्रोव्हीजन केलेली आहे स्टॅन्डिंग कमिटी सभापतीने १० ठिकाणची १० करोडची प्रोव्हीजन केलेली आहे. परत त्याच्यामध्ये दुसरे हेड घुसवले. आपत्ती व्यवस्थापन आणि इतर साहित्य खरेदी करणे आणि सी.सी.टी.व्ही साठी ॲक्च्युअल प्रोव्हिजन आता राज्यशासन देणार आहे की पालिका करणार आहे. मागच्यावेळी तर तुम्ही सांगितले होते की राज्यशासन देणार म्हणून तर हे रिॲप्रोप्रिएशन केले पूर्ण एक रुपया खर्च नाही करु शकलो आपण. आज ह्या शहरामध्ये सी.सी.टी.व्ही ची नितांत गरज आहे. ते एकदा डिसीजन घेऊन टाका. पालिका करणार आहे की राज्य शासन करणार आहे आणि आता दहा करोडची जी प्रोव्हिजन केलेली आहे त्याच्यामध्ये इतर का घुसवले तुम्ही. आपत्ती व्यवस्थापन साहित्य खरेदी करणे आणि इतर खरेदी करणे सी.सी.टी.व्ही ला द्यायचे होते. तर असा हा अर्थसंकल्प आहे. फेरिवाल्यांना प्रोत्साहन देण्याचा, अतिक्रमण अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी तरतूद कमी करणारा परिवहन सेवेबाबत ठोक कारवाई नसलेला बी.एस.यू.पी. योजनेबाबत उदासिनता असलेला ह्या शहरातील वाढती वाहतूक समस्या सोडविण्याबाबत धोरण नसलेला वाढीव लोकसंख्येला चालणा देणार येणाऱ्या वाढत्या पाणी समस्यांबाबत उपाययोजना नसलेल्या भूमिगत गटार योजना कधी पूर्ण करणा शिवाय उत्तनचा घनकचरा प्रकल्प कधी बंद होणार याचा कोणताही उल्लेख नसलेला, दुसरा सुर्या प्रकल्प साहेब २०० एम.एल.डी. पाण्याचे भूमीपूजन झालं. पण तुमच्या अर्थसंकल्पामध्ये काही नोंदच नाही. ते पाणी येणार आहे की नाही येणार आहे. मा. मुख्यमंत्री साहेब आले भूमिपूजन झालं पुढे काय?

**मा. आयुक्त :-**

एम.एम.आर.डी.ए असा आहे आपला हिस्सा एम.एम.आर.डी.ए. ला वर्ग केलेला आहे. म्हणून इथे दाखवले नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब एम.एम.आर.डी.ए ला हिस्सा वर्ग केला तरी ह्यामध्ये डिस्ट्रीब्युशन सिस्टम पालिकाच करणार आहे.

**मा. उपमहापौर :-**

त्याच्यासाठी ३४ महिन्यांचा कालावधी दिला त्याच्यातून एक महिना पण कमी केला नाही. २१० एम.एल.डी. ची योजेनचे काम चालू आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब ह्याच्यामध्ये उल्लेख करा. अर्थसंकल्पामध्ये कळू द्या.

**मा. आयुक्त :-**

तो निधी ट्रान्झीक्शन झाल असता तर करता आला असता.

**अनिल सावंत :-**

हा फुगीर अर्थसंकल्प ह्या शहराच्या भविष्यात नुकसान करणारा ठरणार आहे. तरी ह्याबाबत पूर्ण फेरविचार करुन मा. आयुक्तांनी जे अंदाज वर्तविलेले आहेत त्या अनुषंगाने ह्या अर्थसंकल्पाला मंजूरी द्यावी.

**गणेश भोईर :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलतो, सी.सी.टी.व्ही यंत्रणा कार्यन्वित करण्यासाठी सी.सी.टी.व्ही साठी आपण १० करोड रुपये खर्च दाखवला आहे. त्याची देखरेख कोणता अधिकारी बघणार आहे. जी सी.सी.टी.व्ही. यंत्रणा दाखवली या अदांजपत्रकात.....................

**मा. आयुक्त :-**

सी.सी.टी.व्ही. नाही हे सावंत साहेब बोलले म्हणून तुम्ही त्यांच्या शब्दावर डायरेक्ट जाऊ नका त्यामध्ये आपत्कालीन..................

**गणेश भोईर :-**

मला गोल गोल नका फिरू. मला फक्त एका प्रश्नाचे उत्तर द्या. जो आपण निधी सांगितला आहे तो कधीपर्यंत होणार. २०३० पर्यंत होणार. २०३५ पर्यंत होणार कधीपर्यंत होणार. मिरा भाईंदरमध्ये

सी.सी.टी.व्ही. चे जे तुम्ही बोलत आहेत कॅमेरे लावणार आता चाललेला आहे २०१९ ते कधीपर्यंत होणार २०३० पर्यंत की २०३५ पर्यंत होणार की २०१९ मध्येच होणार. माझ्या निधीमधून मी १० लाखाचे काम टाकलेले आहे. त्याच्यासाठी चार महिने गेले म्हणून मी विचारतो की, २०३० पर्यंत होणार की २०३५ पर्यंत होणार. मला फक्त एक प्रश्नाचे उत्तर द्या की आपण जी काम करतो.

**मा. आयुक्त :-**

मी ते प्रोसेस पूर्ण केली तुमच्या कामाची त्यामध्ये आपल्याला सी.सी.टी.व्ही. लावणे फार सोपे आहे. म्हणजे जे काही एनीमेशन करुन जागेवर आणणे फार सोपे आहे. पण त्याचे कार्यपालन होणे त्याचे ऑब्जव्हेशन होणे त्याच्यावर नागरिकांना बेनिफीट भेटणे त्याच्या सगळ्या गोष्टी कंट्रोल करणे म्हणून तुमच्या कामाला वेळ लागण्याचे मुख्य कारण असे होते की, आपल्याकडे तशा प्रकारचा सेल नाही. मग आम्ही पोलिस विभागाशी विश्वासात घेतला आणि पोलिस विभागाला सांगितले की, ह्याच्यापुढे जे काही सी.सी.टी.व्ही लावले जातील सगळ्या प्रभागात, शहरात, त्या-त्या पोलिस स्टेशनला त्याचा युनिट केला जाईल आणि ते सगळे देखभाल दुरुस्तीचा खर्च दिला जाईल. कार्यपालन आपल्या माध्यमातून होईल अशी हमी घेण्यासाठी आम्हाला थोडा वेळ गेला म्हणून आपल्या कामाला थोडा वेळ लागला.

**गणेश भोईर :-**

तुम्ही आता आले पण त्या डिपार्टमेंटचे अधिकारी तर पहिल्यापासून आहेत ना.

**मा. महापौर :-**

गणेशजी आपका मुद्दा पर्सनली मा. आयुक्त से मिल कर ठीक करना।

**मा. आयुक्त :-**

आपल्याला पोलिस विभागाने पूर्ण सहकार्य केलेला आहे. आमच्या आणि त्यांच्या चांगल्या पध्दतीने कम्युनिकेशन एस्टॅब्लीश झालेला आहे. आपण हि यंत्रणा लावून ऑपरेशन आणि निमंत्रणासाठी त्या-त्या पोलिस विभागाच्या पी.आय कडे आपण करतो आणि आता तुमचे काम प्रगतीपथावर आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, ठराव झालेला आहे. परंतु महापौर मॅडम जर विरोधक चर्चा करत असतील तर मला एवढेच म्हणायचे आहे की माझे सहकारी मित्र अनिल सावंत साहेब असे नाही की अर्थसंकल्पावरती आपण चर्चा करतो. खूप काही बोलतो म्हणजे आपल्यालाच अर्थसंकल्प कळतो असं नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

आमच्या सदस्यांना ते हे म्हणतात की तुम्हाला कळत नाही तुम्ही खाली बसा हे कोण बोलणारे आणि म्हणून मी ह्यांचे नाव घेतले. स्वतःचा प्रश्न विचारतात आणि स्वतःच उत्तरे देतात. स्थायी समितीमध्ये आमचे ॲड. रवि व्यास सभापती आहेत. एवढा चांगला अर्थसंकल्प यावेळी मांडला आहे. त्यांनी आणि तुम्ही म्हणत आहेत विचारले नाही यांचे पण सदस्य आहेत स्थायी समितीमध्ये मग त्यांनी चर्चा केली नाही, मॅरेथॉन चर्चा झाली. महापौर मॅडम जे काही चांगले केले विश्वास का दौर विकास की और जी काही प्रगती चाललेली आहे ती बघवत नाही त्यांना हे म्हणतात महापौर तुमचे, आमदार तुमचे सगळेच आमचे आहे. तुम्हाला हे जे मंजूर नसेल तर पुढच्या वेळेला २०२२ चा आपण विसंगत नाही दिसणार आणि म्हणून मी सांगतो. मा. महापौर मॅडम खूप छान अर्थसंकल्प सादर केलेला आहे म्हणून मी आपले आदरणीय आमदार नरेंद्र मेहता साहेबांचे आणि प्रशासनाचे अभिनंदन करतो.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम एकतर तुमचा शब्द पाहिजे मला की इथे कमीत कमी विरोधी पक्षाला तुम्ही संधी देता खरी परिस्थिती आहे. स्थायी समिती, उपमहापौर सगळे तुमचे काही असताना सत्ता तुमची असताना तुमच्या अर्थसंकल्पाला त्यांनी त्याच्यानंतर टिकाटिप्पणी करणे योग्य नाही. खरतर केले नाही पाहिजे. दुसरा एक विषय असा आहे मी कदाचित विसरुन जाणार. मा. आयुक्त महोदय तुमच्या माध्यमातून आज एक आदेश परत खरतर त्याची गरज नाही सचिवांना करा आपल्याला खंड आयमध्ये स्पष्ट उल्लेख आहे. शासनाकडून आलेल्या कुठलेही परिपत्रक आदेश अधिसुचना हे सदस्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. येत नाही.

**मा. आयुक्त :-**

सचिव ते लिहून घ्या. जे काही स्टॅन्डिंग सूचना येतात ते अजेंडा सोबत देत राहायचं त्या त्या महिन्यामध्ये.........................

**नगरसचिव :-**

पुढच्या सभेमध्ये देण्यात येतील.

**जुबेर इनामदार :-**

आमचे सन्मा. मित्र सदस्य अनिल सावंतजीने अर्थसंकल्पातल्या खर्चाच्या बाजू चांगल्या मांडल्या. त्यांनी समोर आणून द्यायचा प्रयत्न केला. खरी परिस्थिती अंदाजपत्रकाची काय नुसत थोडीशी जमेच्या बाजूमध्ये येतो. खर्चाचा विशेष उल्लेख करत नाही. कारण जमाच नाही तर खर्च कसा करणार. सुरुवातीलाच बोलले अदांजपत्रक आहे की, अंडापत्रक आहे तेच माहित नाही आणि विरोधी पक्ष आहे. जिवंत तरच प्रशासन शासन चालतो. एक चांगले शेअर सांगतो. मम्मीजी युनान मिश्र हो रोम सब मिट गए जहाँ से अब तक मगर बाकी है नामो निशा हमारा जब तक रहेंगे लढेंगे। मा. आयुक्त महोदय, विषय असा आहे मालमत्ता कर महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय कारण हा विषय तुमचा प्रशासन बजेट म्हणजे अर्थसंकल्प तयार करण्याचा अधिकिार प्रशासनाचा आर्थिक परिस्थितीचा अवलोकन करायचा अधिकार प्रशासनाचा आम्ही इथे बसलेले लोकप्रतिनिधी परिपूर्ण नसतो प्रत्येक व्यक्ती इथे असलेला वेगवेगळ्या माध्यमातून आले तो किती अभ्यास करेल, त्याला किती समजेल हा विषय समजायचा मला किती असेल, तुम्हाला किती जास्त हा नाही. मा. आयुक्त अर्थसंकल्प तयार करतात अंदाज आपले तयार करतात. स्थायी समिती समोर ठेवतात. स्थायी समितीला त्याच्यामध्ये कमी जास्त जे काही सुचना करायच्या त्या स्थायी समितीने करुन पुढे महासभेच्या मान्यतेसाठी पाठवले. म्हणून हे विषय महासभेसमोर आले आणि त्यावर चर्चा गरजेची आहे. आणि चर्चा सत्ताधाऱ्यांनी धारण केलेली म्हणून विरोधी पक्षाचा जास्त अधिकारच होतो. मा. आयुक्त महोदय मी थोडासा मागे जाईल तुमचा २०१७-१८ ला म्हणजे आपला उत्पन्नाचा स्तोत्र सर्वसाधारण मालमत्ता कर एकमेव आहे. कारण की तो येणार आपल्याला खात्री आहे. खातरजमा की ते हा प्रकार होणार तो आपला येणारा उत्पन्न आहे. २०१७-१८ ला शंभर कोटी रुपये प्रस्तावित होते. तेच २०१७-१८ ला होते. तुम्ही त्याचा सुधारीत अंदाज कारण सुधारीत अंदाज याच्यासाठी कारण आपला अर्थसंकल्प फेब्रुवारीमध्ये होतो आणि मार्चपर्यंत तर आपले मालमत्ता कराची वसुली होते. मालमत्ता कराची वसुली ३१ मार्च शेवटपर्यंत करतो म्हणून ते सुधारीत अंदाजपत्रक फेब्रुवारी महिन्यामध्ये अर्थसंकल्पाला सुधारीत अंदाज म्हणून आपण तुम्ही आमच्या समोर सादर करता तरीही साहेब २०१७-१८ मध्ये फक्त ५८ कोटी रुपये हे जमा झाले. स्थायी समितीचा अंदाज किती शंभर कोटी, सुधारीत अंदाज मा. आयुक्तांना विश्वास होता की मी इतके पैसे कमीत कमी जमवेल. त्यांनी किती दिलेत. ७६ कोटी आणि मुळात म्हणजे वास्तविकतः किती जमले फक्त ५८ कोटी की ५९ कोटी जमले.

**मा. आयुक्त :-**

गेल्या वर्षाच्या अर्थसंकल्पाचे फिगर ८ महिन्याच्यानंतर आपण त्याला सुधारीत करतो. ८ महिन्यात झालेल्या कामकाजाचे जरी आज बजेटवर चर्चा होत असल्या तरी ह्या फिगर नोव्हेंबरच्या आहेत. मी सावंत साहेब बोलले त्याच्यात सांगितले.

**अनिल सावंत :-**

नोव्हेंबरमध्ये तुमचे ३५ करोडच आहेत. आम्ही ५२ करोड सांगितले.

**मा. आयुक्त :-**

आज आपल्याकडे मालमत्ता कराची १०२ कोटीची वसुली झालेली आहे. मोकळ्या जागेच्या कराची वसूली १६ कोटी २२ लाख आहे आज तारखेपर्यंतची.

**जुबेर इनामदार :-**

मी २०१७-१८ वर आलो साहेब २०१७-१८ वर ह्याच्यासाठी आलो कारण तुमचा सुधारीतमधली असलेली तफावत ४८ टक्के सुधारीत आणि मूळ १०० कोटीची स्थायी समितीची मंजूरी तुम्ही त्याला सुधारीत केले. ७६ कोटी रुपये मुळात जमले. फक्त ५९ कोटी तफावत किती ४८ टक्के उत्पन्नाची तफावत विषय हा अंदाजपत्रकाचा आहे. आपल्याला कुठेतरी मागे जावे लागेल. आपत्ती परिस्थिती बघावी लागेल. साहेब सर्वात जास्त मालमत्ता कधी जमली ह्या शहरामध्ये फक्त २०६-१७ ला जमली आणि त्याला मूळ कारण फक्त नोटबंदी होती. तेव्हा साहेब फक्त ९ टक्क्यात तफावत राहिली होती, स्थायी समिती आणि मूळात जितके काही पैसे जमले त्याच्यामध्ये कारण नोटबंदीच्या काळामध्ये लोकांनी होते नव्हते खिशातले पैसे काढून नेऊन तिथे भरले सर्वांत जास्त त्या काळामध्ये ६८ कोटी त्या काळामध्ये आपले ह्या पालिकेला जमवता आले. त्याच्यानंतर २०१८-१९ ला स्थायी समितीने अदांज दिला १२५ कोटी रुपयाचा ज्याचा तुम्ही आता उल्लेख केला. साहेब सुधारीत अंदाज तुम्ही ७२ कोटी रुपयाचा दिला. आज किती आहे त्याची मला कल्पना नाही. त्या विषयावर मी परत जात नाही. मात्र ४२ कोटी रुपयाचा सुधारीतमध्ये फरक आहे. आणि त्याच स्थायी समितीने आज १४० कोटी रुपये म्हणजे आमचे सन्मा. सदस्य अनिल सावंतजी बोलले ते योग्य आहे. कुठेतरी कर लावा हा सत्ताधारीच्या मधला विषय असू शकतो, मधुन १३० कोटी रुपयेपर्यंत मालमत्ता कराची वाढ मग साहेब उत्पन वाढवायच माझा पगार १० हजार रुपये मी खर्चानंतर १५ हजार

रुपये करील किंवा २० हजार करेल तर माझी दिवाळी निघणारच. मी कर्जबाजारी होणार, माझे घर विकले जाईल, आज नाही तर उद्या म्हणजे अशी परिस्थिती डोळ्याच्या समोर असताना हा झालेला ठराव प्रशासनाने केलेले इथे सभागृहाने अंदाजपत्रकाचा ठराव खरतर ठराव होण्याची गरजच नसते. माझ आधी ठाम मत आहे हो किंवा नाही प्रशासनाने दिलेल्या अंदाजात त्याच्यामध्ये सुचना आणि सुधारणा होऊ शकतात आणि तसेच काही झाले प्रशासनाला योग्य वाटत नाही. महासभेने केलेला ठराव आम्ही केलेला ठराव कुठेतरी चुकीचा आहे. तो तुमचा अधिकार आहे. ४५१ अंतर्गत त्याला त्याच दिवशी तुम्हाला विखंडीत करुन आणायला पाहिजे आणि आता सुधारित अंदाज प्रशासनाने आपले पुढचे अर्थसंकल्पाचे खर्च मोजले पाहिजे. साहेब एवढी वाईट परिस्थिती आहे. मोकळ्या जागेवरती कर सरळ १४० टक्क्यांनी वाढ. मोकळ्या जागेवरचा कर म्हणजे सी.सी. टू ओ.सी. किंवा त्या लोकांनी येऊन कधीतरी मागे मालमत्ता टॅक्स लावून घेतला. मालमत्ता कर आकारणी झाली तर त्याचा मोकळ्या जागेवरचा कर तुम्ही कमी करता. साहेब त्याची सुध्दा तफावत काढली जात नाही की कधी कोणी कधी केला पाच वर्षाचा असलेला अवधी तीन वर्षे मागे गेले. तर दोन वर्षाचा मोकळ्या जागेचा कर कोण भरणार. विकासक भरणार की ते लोक भरणार त्याचा निर्णय कुठेच आजपर्यंत घेण्यात आलेला नाही. जाणूनबुजून साहेब तुम्हाला तुमच्या समोर आणलेला आहे. साहेब स्थानिक संस्था कर प्लस एक अधिभार शासनाकडून येणार तुम्ही ह्यावेळी कमी दिला. साहेब, स्वतः तुमचा फक्त ७५ कोटी रुपये ७० कोटी रुपये आहेत. ७५ कोटी रुपये तुम्ही तुमचा अंदाज ७२ कोटी रुपये माफ करा. तुमचा अंदाज तुम्ही दिला तर स्थायी समिती त्याला ७७ कोटीमध्ये फक्त ५ कोटी रुपये वाढवले म्हणून तफावत उत्पन्नाची फक्त कमी झाली ६० टक्क्यावर आली. कारण याच्या आधी साहेब २०१७-१८ ला २१२ कोटी रुपयाची केली होती. तरतुद साहेब जाणूनबुजून सांगतो. २०१७-१८ ला २१२ कोटीची तरतुद केली तरतुद केली उत्पन्नात वाढ दाखवली. अर्थसंकल्प फुगवला तेव्हाच खर्च जास्त केला, कारण का त्याप्रमाणे खर्चाची तरतुदी होत्या. साहेब माझा बोलण्याचा उद्देश एकच तरतुद नाही. उत्पन्न नाही हे स्पष्ट असताना खर्चाची बाजू का कमी केली जात नाही. जी.एस.टी. शासनाकडून प्राप्त होणारी जी.एस.टी. मध्ये माध्यमामध्ये बातम्या होत्या. माझ्याकडे लोकमत येतो, तो लोकमतच्या बातम्या होत्या ते शासनाने स्वतः कबुल केले की ह्यावेळी जी.एस.टी. जसे पाहिजे त्या पध्दतीने किंवा त्या आकडेपर्यंत आम्ही पोहोचू शकलो नाही. जी.एस.टी चे उत्पन्न कमी झालेले आहे. आपल्याकडे जी.एस.टी. गेल्या वर्षामध्ये २०१८-१९ ला २० ते २९ टक्क्यांची तफावत आहे. तुमचा दिलेला अंदाज सुधारीत आणि २०१९-२० ला २९ टक्के परत वाढ बऱ्याच काही वस्तुमध्ये जी.एस.टी. कमी करण्यात आली असल्यामुळे शासन आपल्याला तेवढ्याप्रमाणे तुम्हाला अनुदान देत नाही. गेल्या वर्षी दिले नाही, ह्यावर्षी ही देणार नाही. साहेब एकत्रित त्याचे सारांश लावलं तर उत्पन्नाच्या बाजूमध्ये ४५ टक्क्यांची तफावत आहे. ४५ टक्के उत्पन्न तुमचा मेन सोर्स तुमचा इन्कम नाही, तुमचा एक्सपेन्डीचर कसा वाढवता. या बाजूला एक्सपेन्डीचर वाढले भरमसाठ. साहेब कॉक्रीटचे रस्ते पाहिजे आम्ही कुठे बोललो की नाही पाहिजे. चांगली गोष्ट आहे विकासाची काम झाली पाहिजे. शंभर टक्के अनुदानाच्या माध्यमातून करा आले तर करा जितके अनुदान आहे, त्याच्यातून करा. कर्ज घेतला तर कर्ज फेडावे लागते. ३८ कोटी रुपये वर्षाला कर्ज भरतो आणि आपले कर्ज अजून बाकी आहेत आणि उघड्यावर अजून कर्ज आपण घेतो, बोझा साहेब ३५ टक्क्याची अट शिथिल केली शासनाने. स्थायी आस्थापनेची ३५ टक्क्यांची अट शासनाने शिथिल केली म्हणजे याचा अर्थ लोकसंख्येप्रमाणे आस्थापनेचा खर्च वाढणार आणि तो सगळ्यांचा सेव्हन कमिशन सुध्दा तुम्हाला आहे. म्हणजे खर्च वाढत चालला. आस्थापनाचा सुध्दा तुमचा उद्या ५० टक्क्याला आस्थापनेचा खर्च गेला तर काय सांगता येत नाही. म्हणजे ५० टक्क्यामध्ये आम्ही करायचे तरी काय काम म्हणजे कुठेतरी आपल्याला काही केलेली काम हे आटोक्यात आणावे लागतील. आमचे तत्कालीन आयुक्त गीते साहेबांनी २०१८-१९ मध्ये एक चांगला प्रयोग २०१८-१९ मध्ये मा. आयुक्त गीते साहेबांनी केले होते. साडे अकराशे कोटी रुपया शिथिल होते. २०१८-१९ मध्ये जी काम होती गेल्यावर्षीच्या २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये १३० कोटी रुपयेची काम प्रस्तावित झाली होती, सार्वजनिक बांधकाम विभागाची म्हणजे ही साडे चारशे कोटीची काम चालू असताना १३० कोटी रुपये कामाची केली.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे रेकॉर्ड आहेच ना.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय प्रत्येक नगरसेवकाचे एक स्वप्न नगरसेवक निधी कारण तो त्याचा अधिकार आहे.

**मा. आयुक्त :-**

नगरसेवक निधी, प्रभाग निधीचे आपण सगळे निर्णय केलेले आहेत. कोणाचाही पेंडींग नाही.

**जुबेर इनामदार :-**

मी तुमच्यावर आरोप करत नाही. तुम्ही केला तुम्ही तुमची भुमिका इतकी चांगली मांडली. जी प्रशंसा करील तेवढी कमी आम्ही आभारी आहोत विरोधी पक्ष पूर्णपणे तुमचा बरेच प्रयत्न करण्यात आले. प्रभाग निधी नाही द्यायचा पण तुम्ही साहेब ती भुमिका घेतली. तुमचे आभार. नगरसेवक निधी, प्रभाग निधी हा नगरसेवकांचा स्वयंम आणि त्याची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आहे, म्हणून तुम्ही करता बाकीचा हा निधी महापौर स्वेच्छा निधी, उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी, स्थायी समिती सभापती, विधी व नियोजन समिती.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. महापौर मॅडम, क्या मुझे समझ में नही आ रहा है क्या कुछ भाषण कर रहे है। क्या सिखा रहे है। आप जो बता रहे है की सब तरतुद है, प्रभाग समिती निधी का है। नगरसेवक निधी का है यह सबको पता है। यह में जानना चाह रहा हूँ। बजेट के विषय में आप की यदी कोई सुचना है, कोई ठराव है तो लाईए।

**जुबेर इनामदार :-**

चर्चा करने को आपको सुनने को कोई प्रॉब्लेम है क्या? डर क्यों रहे हो।

**सुरेश खंडेलवाल :-**

स्टॅन्डिंग में आपने चर्चा किया, इस स्टॅन्डिंग का हमारे सब आ गया हो गया चर्चा स्टॅन्डिंग में और हम भी चर्चा कर रहे है। लेकिन पॉईंट पे चर्चा करो आप।

**जुबेर इनामदार :-**

सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है देखना है जोर कितना बाजुओ कातील में फिर वक्त आने दे पर पता देंगे आसमा हम हमेशा क्या बताए क्या हमारे दिल में है।

**सुशील अग्रवाल :-**

किसी की अमानत देखकर यू ही हैरान ना हो खुदा तुझे भी देगे यू परेशान ना हो।

**जुबेर इनामदार :-**

हाथो से तराशा था मुझे सब मैने ना जाने कहाँ से डाकू आ गए। महापौर निधी मी तुम्हाला जाणुनबुजून हा विषय तुमच्या समक्ष आणून देऊ इच्छितो. महापौर निधी हा विषय कुठेही महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये नाही. महापौर स्वेच्छा निधी, उपमहापौर स्वेच्छा निधीत कुठलाही स्वेच्छा निधी, कुठलाही पदाधिकारीला देता येत नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ महानगरपालिकेत स्वेच्छा निर्णयानुसार तरतुद करता येईल अशी बाबह मात्र तो खर्च फक्त महानगरपालिकेच्या माध्यमातून होतो आणि तो प्रशासकीय अधिकार आहे. सभागृहात कुठल्याही सभापती, कुठल्याही पदाधिका-याचा तो अधिकार नाही. तेवढेच नाही आयुक्त महोदय, बेलवटे साहेब आमचे ही ऐकावे. मला माहित आहे तुम्ही काय बोलणार आहात.

**मा. आयुक्त :-**

त्यांना माहिती सांगतो की तुमच्या पध्दतीनेच तयार झालेल..............................

**जुबेर इनामदार :-**

कान पकडायला आमची तयारी आहे. आम्ही चुकलो मात्र प्रशासनाने ते सुधार केले पाहिजे होते. आम्ही सुरुवात केली. आम्ही मान्य करतो. चुकलो आम्हाला प्रशासकीय माहिती नव्हती. आज ती तांत्रिक चूक सुधारा. प्रशासनाला आवाज देऊन मी सांगतो, त्याच वेळेवर पाणी पुरवठा, मलःनिसारण, विधी, शिक्षण, आरोग्य साहेब हे तदर्थ समित्या आहेत, तुम्ही त्याची तरतुदच नाही ठेवली आणि तुम्हाला कशी ठेवता येईल.

**मा. आयुक्त :-**

कायद्याच्या बाहेर जाऊन मला कामकाज करता येत नाही. म्हणून माझ्या ज्या सुधारीत बजेटमध्ये होते जे कायद्याला अपेक्षित तरतूद आहे तेच ठेवलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुमच्याकडून हेच ऐकायचे होते. विषय असा आहे की ज्या विषयाची तरतूद आपलया ग्रंथामध्ये नाही. थोडक्यात हा महापालिकेचा ग्रंथ आहे. कामकाजाचा ग्रंथ आहे. नियम आहेत त्याच्यामध्ये त्याची तरतूद नाही अशी कुठलीही कृती प्रशासनाने कृपया करु नये. चुका झाल्या असतील तर सुधारा. आमची चूक झाली. आम्ही कान पकडून माफी मागतो. सभागृहामध्ये पण तुम्ही चूक करु नका. आम्ही तुमच्यासमोर होतो तेव्हा विरोध पक्षाचे काम होते की अशाप्रकारे आमची चूक त्यांनी समोर आणून दिली पाहिजे होती ते कुठे तरी कमी पडले. आज आम्ही कमी पडणार नाही म्हणून अशा प्रकारे जे काही खर्च

आहे त्याला तुम्ही आटोक्यात आणा. नको ते कर्ज घेवून पालिकेच्या अर्थसंकल्पावर बोझा वाढवू नये आपण एक चांगले सक्षम अधिकारी आहात, अनुभवी अधिकारी आहात आमच्या आपल्याकडून बरेच काही अपेक्षा आहेत. या डबघाईला जाणाऱ्या महानगरपालिकेला वाचवा अजून जावू देवू नये, पुढची कामे जी तुमच्याकडे आहेत काम सुरू आहेत त्याला पुढच्या वर्षाच्या वर्षामध्ये त्यांचे देयक अदा करा. तद्नंतर नविन काम प्रस्तावित करा. असलेला निधी दुसऱ्या विभागामध्ये सुध्दा साहेब गरज लागली तर तिथे वर्ग करा मात्र एक विषय संपवा. हा वर्षानु वर्ष असलेला स्पील व्होअर चुकीचा आहे. एक तर तरतुद नसतांना आर्थिक प्रशासकीय मंजुरी तुम्ही आमच्याकडून १० हजार, ५० हजार कोटीची घ्या. निविदा प्रक्रिया करतांना ज्या पुढच्यामध्ये खर्च पडणारा ते ही घ्या. तितकीच आपल्याला तरतुद करता येईल, अननेसेसरी केलेली तरतुदी चुकीच्या आहेत. महापौर मॅडम, आपण केलेला ठराव त्याच्या बरोबर एक यादीमध्ये कामाची आहे असे त्यांनी ठराव केला त्याला वाचून दाखवायला लावा ती यादी कुठली आहे कारण असे आहे सभागृहामध्ये ती यादी वाचावी लागेल. सभागृहामध्ये यादी वाचतात घरी गेल्यावर नवीन काही तरी होतो. याच्यामध्ये बरेच काही झालेले आहे स्थायी समितीमध्ये अडचण काय आहे. मॅरेथॉन मिटींग होते पण त्याची रेकॉर्डींग नाही तो मी नाही हात वरती होतात तिकडे झाली होती चर्चा म्हणून बरेच काही चर्चा ह्याच्यामध्ये झालेले नाहीत ते आले तिथे फिगर आलेले, माझी आपल्याला विनंती आहे केलेले ठराव त्याची यादी सभागृहामध्ये वाचून दाखवावी अन्यथा यादीला मान्यता देवू नये.

**धृवकिशोर पाटील :-**

हमारे सन्मा. दोस्त अनिलजी और जुबेरजी इस बढीया बजेट हमारे ॲड रवि  साहबने बनाया था काफी चर्चा हूई। हमारे जुबेरजी भी थे स्टॅन्डिग कमिटीमें दो दिन तक सुबह से शाम तक बैठे थे। और काफी चर्चा किया, मॅडम एक बात सभी को कहना चाहता हूॅं। लोगो की बाते दिल पर नही लेनी चाहिए लोग अमृत खरीदते समय भी पूछते है मिठे है ना और खाते समय नमक लगाकर खाते है। तो इतना बढीया बजेट को नमक मिर्च लगाकर काली मिर्च लगाकर नमक लगाकर आपने बहूत ही बेकार तरीकेसे पेश किया और आप तो इतने अच्छे विद्वान हो हमारे दोस्त हो २०१२ से अनिलजी और आप साथ में ही जो करतुते जो काम हम सबने मिलकर किये है। आपने तो माफही माग ली ही, अभी आपने कहा की महापौर स्वेच्छा निधी उपमहापौर स्वेच्छा निधी मुझे तब याद है की तुलसीदास म्हात्रे महापौर थे। तभी महापौर निधी आपने रखी थी और वही परंपरा आज दिन तक चली आ रही है। और वह भी महापौर अपनी हाथ से नही खर्चा करती है, वो लेटर देकर या आयुक्त को यह काम करना है और उसके उपर आप अंमल करके दो। "ये दोस्तो इतना सच बोलो की ओठो ना तबस्सुन ना करो ये दोस्तो यह दोस्ती खत्म ना कर आगे अंधेरा ना हो जाए।" विश्वास का दौर मिरा भाईंदर शहर प्रभाग की और यह नारा लेकर हमारा आदरणीय आमदार साहब हमारे आदरणीय महापौर मॅडम, हमारे स्टॅन्डिंग कमिटी के चेअरमन रवीजी व्यास उन्होनें बहुत ही बढीया बजेट किया और आप भी उसमें शरीफ थे। पिछली बार जब भी आयुक्त ने जो बजेट पेश किया था त्या बजेटमध्ये मॅडम आयुक्तांनी १२१ करोडचा बजेट आपल्याला सादर केला होता आणि आता सुधारीत केला ९२ करोडचा म्हणजे ॲक्च्युअली त्याच्यामध्ये कदाचित प्रशासनाने वसुलीमध्ये कमी केले असेल किंवा काही टॅक्स आले नसतील त्याच्यामुळे वसुली कमी झाली असेल आणि हे अंदाजपत्रक आहे. आपण अंदाज बांधत आहोत की, ह्या वर्षी एवढे एवढे इनकम येणार आहे. ह्यावर्षी आपला एवढा एवढा खर्च होणार आहे. आणि ह्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद केल्यानंतर स्थायी समितीमध्ये ज्यावेळी चर्चा होते त्यावेळी चर्चेमध्ये सगळे नगरसेवक विभिन्न पक्षाचे असतात. चर्चा करतात त्याच्यामध्ये आपले विचार ठवेतील आणि त्या विचाराअंती निर्णय होतो की एवढे एवढे पैसे येणार आहेत. तर मालमत्ता कर करामध्ये १४० कोटीची तरतुद आम्ही केलेली आहे. आपल्या स्वच्छ सर्व्हेक्षणाची निविदा आपण मंजूर केलेली आहे आणि त्याचे काम सुरु होऊन ६ ते ७ महिन्यामध्ये आपल्या महापालिकेच्या क्षेत्रामध्ये जेवढ्या काही मालमत्ता आहेत ज्याला टॅक्स लावला असेल ज्यांनी मालमत्तामध्ये वाढ केली असेल आणि त्याच्यामुळे हा टॅक्स वाढणार आहे. आणि अनेक अशा इमारती अजूनही भरत आहेत आणि त्याच्यामध्ये सुध्दा जे लोक राहायला येतील त्यांना सुध्दा तो टॅक्स लागेल आणि म्हणून मालमत्ता करामध्ये तेवढी वाढ होणार आहे. त्याच्यानंतर आता इमारत परवाना फी सुध्दा साहेब कॉमन डी.सी.आर आला आहे. त्याच्यामध्ये पॉईंट ३० च्या एफ.एस.आय महापालिकेत प्रिमियम घेऊन देऊ शकते असा निर्णय सुध्दा मागच्या कॅबिनेटमध्ये झालेला आहे. तो जो कॅबिनेट डी.सी.आर आल्यानंतर आपल्या महापालिकेचे उत्पन्न त्याच्यामध्ये वाढणार आहे. त्याच्यामध्ये जे आपण फ्लावर बेड सी.बी.झेड देत आहोत. फ्रीमध्ये त्याच्यावरती पण आपल्याला चार्जेस घ्यायचे त्यांनी सांगितलेले आहे. त्याच्यामुळे हा जो इमारत परवाना फी आहे त्याच्यामध्ये वाढ होणार आहे. म्हणून ती आम्ही वाढ केलेली आहे. दुसरी गोष्ट सुर्या

प्रकल्पाचे भुमिपुजन झाले आहे. त्याचे काम पण सुरु आहे. आणि त्याचे सारे फंडींग एम.एम.आर.डी.ए तर्फे करण्यात आलेले आहे. त्याच्यामुळे ह्या बजेटमध्ये त्याची तरतुद आपण केलेली नाही. ज्यावेळी ते आपल्या फाऊंटन हॉटेलपर्यंत पाणी आणतील त्याच्या अगोदर आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये त्याची जी पाईपलाईन अंथरायची त्याची आपण बजेटमध्ये तरतुद आपल्याला करण्यात येईल. त्याच्यानंतर तुम्ही सांगितलेली प्रॉपर्टी कनेक्शनचे काम बंद आहे. सर माझ्या एरियामध्ये सुध्दा प्रॉपर्टी कनेक्शनचे काम आजही चालू आहे. जर समजा त्याच्या एरियामध्ये काम बंद असेल तर काहीतरी टेक्नीकल बाबी असेल म्हणून ते काम बंद असेल. परंतु शहरामध्ये प्रॉपर्टी कनेक्शनचे काम सुरु आहे. दुसरी गोष्ट वॉर्ड साफसफाईमध्ये पहिला ९० कोटीची तरतूद होती. आता १२० करोडची तरतुद आपण ठेवलेली आहे. मिरा भाईंदर शहर वाढलेले आहे. गोल्डन नेस्ट रोडपासून ते हटकेशपर्यंत ज्या इमारती वाढलेल्या आहेत. पुन्हा तुमच्या त्या सिल्वर पार्क तिथे इमारती वाढलेल्या आहेत. १५० फिट रोडच्या तिथे इमारती वाढलेल्या आहेत आणि ह्या लोकसंख्या वाढीमुळे आपल्याला ती वॉर्ड साफसफाईचे बजेट वाढवलेले आहे. त्याच्यानंतर दुसरे पाणी पुरवठा पाणी पुरवठ्याचे बील आपल्याल १० ते ११ रुपयांनी रेट एम.जी.पी. आणि स्टेम प्राधिकरणातर्फे आकारण्यात येत आहे. ७ ते ८ रुपये नाही. त्याच्यामुळे आपल्याला ते वाढ केलेली आहे. दुसरी गोष्ट बी.एस.यु.पी. साठी सुध्दा आपण २० करोडची तरतुद केलेली आहे. नेहमी आपल्या मिरादेवी यादव आणि ज्योत्सना हसनाळे मॅडम यांच्या प्रभागामध्ये तो बी.एस.यू.पी. च्या येतो प्रत्येक वेळी ते बोलतात आणि त्यावेळी आमच्या सभापतींनी त्याच्यासाठी २० कोटीची तरतुद ठेवलेली आहे. सी.सी.टी.व्ही. साठी सुध्दा १० कोटीची तरतुद ठेवलेली आहे. सी.सी.टी.व्ही साठी मागे पोलिसाचे आणि महापालिकेचे प्रशासनाचे थोडेसे ताळमेळ होत नसल्यामुळे पोलिसांनी सांगितले की, ह्याच्या सगळा कंट्रोल आमच्याकडे राहील आणि याचे मेन्टेनन्स तुम्ही करणार. थोडेस ह्याच वादामुळे तो पेंडींग राहिला होता. आता आयुक्त साहेबांनी सांगितले की पोलिसांनी आम्हाला सगळे देण्याचे कबुल केले आहे. त्याच्यामुळे आपण ते सी.सी.टी.व्ही पण तरतुद ह्यावेळी त्याचा वापर करण्यात येईल. आणि असे अनेक मुद्दे जे आपण सांगितले दुसरे तदर्थ समिती आता आपण जर ४ समित्या निर्माण केल्या आहेत. तर त्या ४ समित्या आता समजा शिक्षण समिती आहे. ती शिक्षण समिती अंतर्गत विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी काही उपक्रम करावयाचे असतील तर त्या करु शकतात. दुसरी पाणी पुरवठा समिती आहे. आपली आणखीन विधी समिती आहे. नियोजन समिती आहे. अशा अनेक समित्या जर आपण केल्या तर त्यांना सुध्दा आपल्याला फंड देणे गरजेचे आहे. म्हणून हा असा चांगला अर्थसंकल्प आमचा मित्र सन्माननीय यांनी केलेला आहे. तर माझी आपणांस विनंती आहे महापौर मॅडम ठराव झालेला आहे. जर विरोधी पक्षाचा ठराव असेल तर त्यांनी तो ठराव मांडावा. अन्यथा आमचा जो ठराव आहे त्याला आपण समर्थन द्यावे ही माझी आपणांस विनंती आहे. धन्यवाद.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम, काफी देर से बजेट पर चर्चा चल रही थी। मैं भी परमिशन मांग रही थी। आपने अभी परमिशन दिया। कमिशनर साहब बजेट आपने लाया तो अच्छा है। लेकिन पिछले ३ सालो का जो हम लोग रेकॉर्ड देखते है तो आपके एक्स्पेक्टेशन के हिसाब से कही भी वसुली हुई नही है। इसका मतलब है की बजेट हर साल स्पिल ओव्हर हो के जाता है और लास्ट में ऐसा होता है की, कुछ भी काम लेके जाओ तो निधी नही है। बजेट नही है। अभी तक कॉन्ट्रॅक्टरो के बिल पुराने बहुत सारे सालो से पडे है। जिसकी वजह से कॉन्ट्रॅक्टर आज कोई कम्पलेंट करने जाए तो डरता भी नही है। बोलता है हमें बिल ही नही मिला है तो हम आगे का काम करेंगे नही एक्झाम्पल के लिए में सी.सी. रोड का बोलती हूँ। मेरे वॉर्ड में गोल्डन नेस्ट सर्कल से लेके ज्योती पार्क तक सी.सी. रोड छोटासा ही रोड है। लेकिन इलेक्शन के पहले से ही काम चालू था। आज इलेक्शन होके देड पावणे दो साल हो गया है। फिर भी सी.सी. रोड कम्पलीट नही हुआ है और जब भी कॉन्ट्रॅक्टर को कुछ बोलते है तो वह बोलता है मॅडम जितना काम किया वह बिल नही मिला तो आगे का क्यों करे। ऐसी परिस्थिती में लोगो को बहुत तकलीफ होती है। इसके उपर भी ध्यान दिया जाए। बाजार फी हम लोगो ने कॉन्ट्रॅक्टर को दिया हुआ है तो इसमें हम लोगो को जो बजेट आया है की ८ महिने में इतना वसुली हुआ है और ४ महिने में इनता एक्स्पेक्टेड है यह कौनसे तरिके से हम लोग लेते है। जरा इस पे खुलासा किजीए। कॉन्ट्रॅक्टर हमे मंथली देता है की इयरली देता है। यह तो कॉन्ट्रॅक्टर का लुकआऊट है। उसने कितना वसुल किया और कितना आगे वसुल करेगा। हमने कॉन्ट्रॅक्टर दिया है वह किस हिसाब से दिया है हम मंथली लेते है की इयरली लेते है। बाजार फी में आपने दिखाया है की ८ महिने में ३ करोड ४५ लाख आया है और ३ करोड २५ लाख ४ महिने का उम्मीद है। एक्स्पेक्टेड है वो किस तरह से आप कॉन्ट्रॅक्टर से कैसे लेते है।

**नरेश पाटील :-**

मी महापौरांच्या परवानगीने बोलतो, आरक्षण क्र. १७८ आला हजरत गार्डन काही वर्षापासून दुष्काळग्रस्त झालेला आहे. ३ एकरचे गार्डन आहे. ते गार्डन विकसित का होत नाही. प्रत्येक वेळेला बजेट नाही. बजेट नाही. नयानगरमध्ये का लोक राहत नाहीत का? जरा गार्डन तुम्ही बघून या कसे आहे अधिका-यांना सांगितले अधिकारी म्हणतात की, आमच्याकडे बजेटच नाही. आम्ही गार्डन कुठून विकसित करणार. ते जरा गार्डन विकसित करुन द्यावे.

**मा. सभापती :-**

महापौर मॅडम आपके परमिशन से बोलता हूँ, अभी जैसे की २३ करोड रुपये हम लोगो ने इस बार तरतुद किया है। आरक्षण को विकसित करने के लिए तो वह इसबार निश्चित रुपसे हो जाएगा।

**नरेश पाटील :-**

होना चाहिए, दुसरा मेरा एक मुद्दा है २०१५ ला एक मुलगा आणि एक वृध्द माणूस म्हणजे म्हातारा माणूस गटारामध्ये पडून मेला. नर्मदा पॅराडाईस रेल्वे समांतर रोडवरती रोडला गटार आहे. १० फुट खोलचे गटार आहे. सर्व वृत्तपत्रामध्ये बातम्या छापल्या होत्या पण त्या गटारावर अजूनपर्यंत स्लॅब टाकला नाही. बजेट केवढा ३ ते ४ लाखाचे बजेट आहे. जास्त नाही तेव्हा आम्ही जेव्हा जेव्हा अधिका-यांना बोलतो आयुक्त साहेब मी काकाणी साहेबांना पत्र दिले होते, त्यानंतर नरेश गिते साहेबांना पत्र दिले होते आणि आपल्यालाही पत्र दिलेले आहे. महापौर मॅडम मी आपल्यालाही पत्र दिले पण ते ३ ते ४ लाखाचेच बजेट आहे. तिकडे आणखीन माणसे मरावी का? असे तर नाही. त्याच्यावर लवकरात लवकर स्लॅब टाकून घेण्यात यावा.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब त्यांना लवकरात लवकर स्लॅब टाकून द्यावा.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम आता ह्या बजेट वरती आपली चर्चा चालू आहे. आता आम्ही सत्ताधारी माजी सभापती ध्रुवजी बाकीचे सर्व सदस्यांनी विषय मांडले. बजेट आर्थिक संकल्प आमच्या सभापतींनी अतिशय सुंदरपैकी मांडला. सत्ताधारी आहेत ते बोलणार. सत्य आहे आम्ही पण सभापती होतो. त्यावेळेला हेच बोलायचे राजू भोईर ज्या वेळेला सभापती होते तेच झाले गेल्या वेळेला ध्रुवजी होते अख्या सभागृहाने अर्थसंकल्प असा परत घडलाच नव्हता. परत आता त्यांचे स्वप्न आणि आज मात्र आम्ही अर्थसंकल्पाबद्दल दुमत नाही. आपले भरपूर जणांनी लक्ष वेधून दिलेले आहे. सत्ताधारी आहेत ते आपले बजेट तुमच्याकडे अर्थसंकल्प आणून देतात. परंतु त्या अर्थसंकल्पामध्ये तरतुदी कशा प्रकारच्या आहेत. कशा नाहीत शहराचा विकास हा संपूर्ण प्रशासनाच्या हातामध्ये आणि कमिशनरच्या हातामध्ये असतो. आज महाराष्ट्रामध्ये अशा कित्येक नगरपालिका महानगरपालिका आहेत. त्या डबघाईला गेलेल्या आहेत आणि राज्य शासनाला महानगरपालिका बडतर्फ करायची वेळ आलेली आहे. कमिशनर साहेब मिरा भाईंदर शहराची इज्जत प्रशासनाने सत्ताधा-यांच्या हातामध्ये आहे ती वेळ नको आली पाहिजे कारण आजपर्यंत अशी वेळ आलेली नाही. आजची जी तफावत आहे. कारण सत्ताधारी बजेट फुगवून देतात. कमिशनर साहेब मी आपल्याला सांगु इच्छितो तिथे बेलवटे साहेब आहेत. पहिला टेंडर निघायची कामे निघायची ठेकेदारांना किती महिन्यामध्ये पेमेंट मिळत होते? बेलवटे साहेब ९,१०,११,१२ आकडे ह्या २-३ महिन्यामध्ये बिले निघत होती. आता किती महिन्याने बिले निघतात. त्याचे कारण काय? एवढा उशीर का? हे कमिशनर साहेब हे आपण बघा. ७-८-९ महिन्यावरती गेले. उद्याला हे वर्ष आणि दिड दोन वर्ष वगैरे जाऊन तर ह्या शहराचे कॉन्ट्रॅक्ट कोणी घेणार नाही अशी वेळ ह्या ठिकाणी. येऊ देऊ नयेत तुमच्या हातामध्ये आहे. मी जास्त बोलत नाही. महापौर मॅडम, आज मी तुम्हाला सांगतो पाण्याच्या बाबतीमध्ये परिस्थिती आज अशी आहे ३ महिन्यापूर्वीचे बिल १४ हजार त्याच्यानंतरचे बिल १६ हजार आणि साहेब आज बिल आलेले आहे. २६ हजार मीटर बदली केले त्याचा आवाज नगरपालिकेत गेला नाही हे नंतरच्या डेटमध्ये आलेले आहे. साहेब एक बिल्डींग आहे. २५ जण आहेत. १००-१०० बिल्डींग मी तुम्हाला अशा दाखवतो की तिथे गोंधळ चालू आहे. मग हे पाण्याचे बजेट आणि पाणी डिपार्टमेंट काय करत आहे. तेच स्वच्छता करच्या बाबतीमध्ये प्रभागातून ५०-५०, १००-१००, २००-२०० बिल्डींगचे फोन येत आहेत. आज बजेट चांगला आहे. ठिक आहे सत्ताधारी त्यांनी सभापतींनी त्यांच्या पध्दतीने मांडलेले आहे. परंतु कमिशनर साहेब आज छोटी छोटी कामे महापौर मॅडम ५० हजार, १ लाख, १.५ लाख, २ लाखाच्या कामाला जिथे लोकांना जी काही छोटी कामे करुन घ्यायची आहेत. त्याठिकाणी ते कामे होत नाही. बांधकाम डिपार्टमेंट सरळ बोलते आमच्याकडे एकही पैसा नाही. चेक निघत नाहीत. पैसा नाही. मग तरतुद काय सभापती महोदय मग तरतुद कुठे जाते. ही छोटी छोटी कामे करायची नाही का? उपमहापौर साहेब फार वर्षांची कामे पडलेली आहेत.

लोकांना त्याचा नाहक त्रास होत आहे. ५० हजार, १ लाख, १.५ लाखाची कामे आणि २ करोड, ५ करोडची कामे काढतो. ठेकेदाराचे बिल साहेब शहरामधली छोटी छोटी कामे करुन घ्या. त्यामध्ये लोक खुश होतील. तर आम्ही म्हणू की अर्थसंकल्प चांगला मांडला धन्यवाद साहेब.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम धृवकिशोर पाटील आमचे मित्र त्यांनी मला चांगले स्पष्टीकरण दिले. मला हीच अपेक्षा होती. १४० करोड रुपये आले कुठून? पण त्यांनी जे बजेट मांडले होते ते फक्त आपण ४८ टक्के का अचिव्ह करु शकलो त्याचे तर स्पष्टीकरण दिले असते तर जास्त बरे झाले असते. त्यानंतर आता एक गोष्ट स्पष्ट झाली. पुढील काळात ह्या शहरामध्ये मालमत्ता कराच्या वसुलीसाठी ही महानगरपालिका ठेकेदार नेमला आणि ठेकेदार नेमलेला आहे. लोकांजवळ तो जाणार मोजमाप करणार आणि त्यानंतर वसुली सुध्दा तोच करणार ही जी.आय.एस. सिस्टीम मी सत्ताधाऱ्यांनी ओपनली करुन सांगायचे ना. आम्ही १४० करोड अशाप्रकारे वसुल करणार आहोत.

**मा. आयुक्त :-**

वसुली ठेकेदार नाही करणार.

**अनिल सावंत :-**

साहेब तो तुम्ही ठराव बघा. देखभाल काय पुढील ५ वर्ष देखभाल करणार. ते तुम्ही कसले पैसे देत आहेत? जाणार मॅपिंग करणार म्हणजे सर्व ज्या प्रॉपर्टीज आहेत त्याची रिमेजरमेंट करणार. आज परवाना शुल्क वसुलीसाठी ठेकेदार नेमला. आज परिस्थिती काय आहे. परवाना शुल्कचे जे ठेकेदार आहेत त्यांची माणसे जातात. दुकानांमध्ये त्याला सांगतात त्याला ५०० रुपये साल का है, ३ साल का १५०० का में सर्टिफिकेट लेके आऊंगा। मेरा हजार रुपये एस्ट्रा. साहेब ही शहरामध्ये वस्तूस्थिती आहे प्रत्येक गोष्ट आपण ठेकेदाराला देत चालले आहोत. रवी व्यास कॉंग्रेच्युलेशन इसमें कोई पर्सनल लेने की बात नही है। बजेट है अपोझिशन का काम है। उसको क्रिटीसाईज करना वह हमने किया है। फक्त जो स्टॅन्डिंग कमिटीने बजेट मांडलेला आहे तो तुम्ही ८० ते ९० टक्के अचिव्ह करुन दाखवा. पुढच्या महासभेमध्ये तुमच्या अभिनंदनाचा ठराव आम्ही करु.

**दिनेश जैन :-**

बहुत अच्छा बोला अनिल सावंतजी ने खाली क्रिटीसाईज करना था इसके लिए है बाकी बजेट अच्छा है।

**साराह अकरम :-**

सगळ्यात अगोदर तर मी आनंद प्रकट करते. पायलट अभिनंदन हे भारताला परत आले त्यामुळे आणि दुसरी गोष्ट जसा आपला बजेट आला आहे ह्या वर्षाचा १५६८.४० चा त्याच्यामध्ये आपण वाढ केलेली आहे. ३५० कोटी मला आयुक्त साहेब तुम्ही सांगा आपल्याकडे एवढे पैसे उत्पन्न होतात. काय जेवढे आपण अंदाजपत्रकामध्ये जमा दाखवले आहेत. तेवढे होतात का?

**मा. आयुक्त :-**

जितके उत्पन्न होतील तेवढ्यातच आपण कामे करायचे ठरले ना.

**साराह अकरम :-**

आपल्याकडे जमा होतात का कारण मी सांगते.......

**मा. आयुक्त :-**

एक उदाहरण मी सांगतो. गेल्या अर्थसंकल्पामध्ये १०० कोटी आपल्याला रस्त्याला पैसे भेटणार होते. ते गेल्यात नाही मिळाले ह्यात आता मिळाले म्हणजे आता बी.एस.यू.पी. साठी आपण प्रयत्न करत आहोत. मिळण्याचे तर असे काही कॅरीफॉरवर्ड होतात.

**साराह अकरम :-**

मी सांगते जेव्हा पण आपण कुठलेही नगरसेवक पालिकेकडे जातो. आपले कुठेलेही काम घेऊन तर आम्हाला एकच उत्तर भेटते. आमच्याकडे तरतुद नाही. आपण बजेट कशाला बनवत आहोत. वर्षाचे बजेट आहे ना. एक दोन महिन्याचे बजेट नाही. संपूर्ण वर्षाचे आहे. कधी पण गेलो तर आमच्या कामासाठी तुमच्याकडे तरतुद असायलाच पाहिजे. किती वेळा असे झालेले आहे की पालिकेच्या लोकांना मानधन सुध्दा भेटत नाही. तरतुद आहे मग कशाला भेटत नाही. आपण जेव्हा बजेट बनवतो तेव्हा आपण त्याच्यामध्ये डेप्रिसिएशन कशाला ठेवत नाही. २० टक्के, १५ टक्के कदाचित ते पैसे आले नाही. ते ठेऊन तुम्ही बजेट बनवा ना. कारण की आम्हा नगरसेवकांना पण त्रास होणार नाही. लोक जेव्हा काम घेऊन येणार आमचे हे काम करा. तेव्हा आम्ही त्यांना काय सांगायचे. आम्ही त्यांना काय सांगतो तुम्ही तुमचा टॅक्स भरा. ते लोक सांगतात आम्ही टॅक्स भरायला राजी आहोत. पण आमचे काम तुम्ही अगोदर करा.

त्यांची काम अपुरे राहिलेले आणि आम्ही टॅक्स भरायचा का? ते शक्य नाही. तर नेक्स्ट जेव्हा आपण बजेट करणार. त्याच्यामध्ये डेप्रिसिएशन ठेऊन मग बजेट करा.

**जुबेर इनामदार :-**

सत्ताधाऱ्यांना एक प्रेमाची सुचना खरी परिस्थिती आहे त्यावर बोलावे. त्याचप्रमाणे अर्थसंकल्प तयार करावे. दुसरा ठराव केला महापौर मॅडम त्याची अजून यादी त्याच्यामध्ये जोडलेली वाचला गेला.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यासोबत यादी आहे का?

**जुबेर इनामदार :-**

आहे पण ती वाचली गेलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या यादीची कॉपी सर्वांना देऊन टाकायची.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय ती यादी जोडली जाईल.

**मा. आयुक्त :-**

ती यादी इथे पटलावर ठेवा ना.

**जुबेर इनामदार :-**

आता ती यादी वाचायला सांगा.

**मा. आयुक्त :-**

सचिव त्याची झेरॉक्स करुन सगळ्यांना द्या.

**जुबेर इनामदार :-**

खरी परिस्थिती आहे धृवजी, आपण कुठेतरी सत्ताधारी असलो तरी खरी परिस्थिती आपल्याला समजून घेतली पाहिजे आणि प्रेमाचे दोन शब्द "तकाजा है वक्त का तुफानो से झुंजो यह भी एक तुफान है, कहाँ तक चलोगे, किनारे किनारे"। अपने आपको बाजु में रखके सिर्फ बढाओ मत ट्राईक पर बात करना चाहिए।

**धृवकिशोर पाटील :-**

कितने चेहरे लगे है, चेहरे पर चेहरे क्या हकीकत है और क्या सियासत है।

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने आयुक्तांच्या अंदाजासह सन २०१८-०९ सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरीसाठी स्थायी समितीकडे पाठवले प्रस्तावित केले. स्थायी समितीने दि. २१/०२/२०१९ रोजी अर्थसंकल्पाच्या जमाखर्चाच्या निधीमध्ये फेरबदल करुन अर्थसंकल्प महासभेमध्ये मंजूरसाठी प्रस्तावित केले. सदर अर्थसंकल्पाच्या अवलोकन केले असता मिरा भाईंदर महानगरपालिका डबघाईच्या दावावर उभी आहे असे स्पष्ट दिसत आहे. मालमत्ता करामध्ये सन २०१८-१९ सुधारीतमध्ये ४२ टक्केची वाढ दिसून येत आहे. मोकळ्या जागेवरील कर ह्या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० मध्ये १४० टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान, जी.एस.टी. यात सन २०१८-१९ मध्ये २९ टक्के ची तफावत तसेच २०१९-२० मध्ये २९ टक्केची तफावत ची वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. एकत्रित उत्पन्नाच्या बाजूस सन २०१८-१९ मध्ये ३७ टक्क्यांची तफावत तसेच सन २०१९-२० मध्ये ४५ टक्के ची वाढ अर्थसंकल्पात दिसून येत आहे. मुळात हे अर्थसंकल्प अंदाजपत्रक बिनबुडाचा राजकीय हेतुसाठी फुगवलेला आहे. सदरच्या अर्थसंकल्पामध्ये काही दुरुस्त्या सुचवत आहे. जसे जमच्या बाजुमध्ये सर्वसाधारण कर, स्थायी समितीचा अंदाज १४० कोटी कमी करुन १०० कोटी प्रस्तावित करण्यात येत आहे. मोकळ्या जागेवरील कर स्थायी समितीचा अंदाज ५० कोटी कमी करुन २० कोटी करण्यात येत आहे. जी.एस.टी. अनुदान स्थायी समितीचा अंदाज २०० कोटी कम करुन १६० कोटी कमी करण्यात येत आहे. सन २०१८-१९ उत्पन्नाच्या बाजूस १३० कोटी रु. कमी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच अंदाजपत्रकातील खर्चाच्या बाजूमध्ये महापौर स्वेच्छा निर्णय निधी २७० कोटी, उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी १५० कोटी, स्थायी समिती सभापती स्वेच्छा निधी १५० कोटी पाणी पुरवठा मलःनिसारण समिती १ कोटी निधी, विधी व नियोजन समिती १ कोटी निधी, शिक्षण व समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती १ कोटी, आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती १ कोटी रु. एकूण ९ कोटी ७० लाख निधी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममध्ये अशा तरतुदीला कुठेही स्थान नसल्यामुळे बंद करण्यात येत आहे. परिवहन विभागाला

आस्थापना स्थायी समिती अंदाज १५ कोटी करुन ११ कोटी आहेत तेच ठेवले. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्तांनी शासनाकडून प्राप्त अनुदानाला सर्वपरी मान्यता मिळाल्यानंतरच विकास कामाची निविदा प्रक्रिया आरंभ करावी शहर विकास कामासाठी घेतलेल्या कर्जाचा हप्ता प्रस्तावित वर्षामध्ये ३७ कोटी ७० लाख इतका पडणार आहे. तरी नविन विकास कामे करावयाचे असल्यास शासनाचे १०० टक्के अनुदान कामासाठी प्राप्त करुन करावे. आर्थिक कर्ज मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीला पेलवणार नाही. प्रशासनाने चालु वर्षामध्ये विभागणीय अर्थसंकल्पातील तुट पुढील आर्थिक आर्थिक वर्षामध्ये आधी करुन काढावी व पूर्ण करावी. पुर्ण झालेले किंवा सुरु असलेले कामाचे व विभागणीय देय अदा करावेत. तद्नंतरच नवीन कामे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात प्रस्तावित करावीत असा मी ठराव मांडत आहे. तसेच घनकचरा शुल्क रद्द करण्यात येत आहे. नागरीकांना पाठवलेले दर रद्द करण्यात यावे. त्यांनी सदर भरलले असल्यास ते पुढच्या मालमत्ता करामध्ये परत करण्यात यावे. तसेच पान क्र. ३९ बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन गॅलरी मनपा निधी रु. ८ कोटी तरतुद करावी. पान क्र. २१ मार्केट ३ कोटी तरतुद करणे, पान क्र. ४० घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण करणे, शिवसृष्टी विकसित करणे रु. १ कोटी तरतुद करणे. पान क्र. ४२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मनपा निधी नविन १ कोटी तरतुद करणे. पान क्र. ४२ मुलभूत सुविधा मनपा हिस्सा बस स्टॅन्ड बांधकाम बाबत ५० लाख तरतुद करणे असा मी ठराव मांडत आहे.

**राजू भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, ह्या ठरावाला अनुमोदन कोणी दिलेले आहे? महापौर मॅडम, ह्या ठरावाला विरोधी पक्षनेत्यांनी अनुमोदन दिलेले आहे. ज्या ठरावामध्ये गेल्या महासभेमध्ये गदारोळ माजला होता की, बाळासाहेब कलादालन यांच्यासाठी आपण आता १५ करोडची तरतुद केलेली आहे आणि ह्या ठरावामध्ये त्यांनी ती ८ करोड केली म्हणजे त्यांनी तरतुद कमी करुन टाकली आणि त्या कमी केलेल्या ठरावाला ते मंजुरी देत आहेत. म्हणजे स्थायी समितीमध्ये आपण अनुमोदन द्यायचे आणि इकडे महासभेमध्ये ॲक्च्युअली फ्युचर क्लिअर करायचे. त्याचा उद्देश काय आहे.

**राजू भोईर :-**

१५ च्या जागेवर १७ केलेले आहे. एकूण १७ आहे.

**प्रविण पाटील :-**

व्यवस्थित वाचून घ्या. कुठला यांचा ठराव दिलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्यांनी स्वतः सांगावे. त्यांनी नाव घेतले आहे. बाळासाहेब ठाकरे कलादालनाचे त्यांनी नाव घेतलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब तो तुम्ही ठराव वाचा त्याच्यामध्ये तो हेड वेगळे आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्यांनी क्लिअर कट सांगितले.

**प्रविण पाटील :-**

तो हेड वेगळा आहे. त्या ठरावामध्ये निट वाचा. बजेटमध्ये आधी बघा तो कुठला ठराव केलेला आहे. पान क्र. वाचून बघा.

**धृवकिशोर पाटील :-**

त्यांच्या सगळ्या सुचनांचे आपण बजेटमध्ये प्रावधान ठेवलेले आहे. त्यांनी सांगितले डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन ऑलरेडी आपण बुध्द विहारचे निविदा सुध्दा काढलेली आहे. परत त्यांनी सांगितले बाळासाहेब ठाकरे आणि प्रमोद महाजन कलादालन यांच्यासाठी ८ करोड रुपये आपण ऑलरेडी १५ कोटीची तरतुद ठेवलेली आहे. प्रत्येक मुलभूत सुविधा फक्त ५० लाख बस स्टॅन्डसाठी आम्ही ऑलरेडी बस स्टॉपसाठी आपले नगरसेवक निधी आमदार निधीमधून भरपूर प्रस्ताव ऑलरेडी मांडलेले आहेत. आणि आपण ते बी.ओ.टी. वरती पण देणार आहोत. त्याच्यामुळे त्याची काही गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

महापौर मॅडम, त्या मॅडमचा मुद्दा होता. बाजार फी ६ कोटी ७१ लाख इतकी फिगर आहे आणि मार्च ३१ पूर्वी ते आपल्या वसुल करणे अपेक्षित आहे. ६ कोटी ७१ लाख.

**स्नेहा पांडे :-**

साहब यह तो कॉन्ट्रॅक्ट हम लोगो ने दिया हुआ है। कॉन्ट्रॅक्टर हमको वन टाईम, फोर टाईम, थ्री टाईम जो स्लॅब होगा उस तरह से पेमेंट करेगा नगरपालिका को।

**मा. आयुक्त :-**

वह में आपको लिखीत में लिखके देता हूँ। ती पूर्ण वसुली होईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३९,१४२,१४५,१४६ करिता जो ठराव सुचक श्री. सुरेश खंडेलवाल, अनुमोदन श्री. सुशिल अग्रवाल यांनी ठराव मांडलेला आहे. ह्या ठरावाच्या सोबत जी यादी जोडलेली आहे त्याचे मी वाचन करतो. (सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३९. प्रकरण क्र. १४२,१४५,१४६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. सुरेश खंडेलवाल, अनुमोदन डॉ. सुशिल अग्रवाल. ह्या ठरावात सुचना आहे. सुचक श्री. अनिल विराणी, अनुमोदन श्री. दिनेश जैन. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदन श्री. राजू भोईर. दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. सुरेश खंडेलवाल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५२, विरोधात २६, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण " + "अंध व अपंग " + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") (मा. स्थायी समिती सभा दि . २१/०२/२०१९ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. २०७, ठराव क्र. १७२)**

**ठराव क्र. १३६ :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०१८-१९ चे सुधारीत व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक अंतिम मंजुरीसाठी स्विकारुन सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे काही दुरुस्त्या सुचविण्यात आलेल्या आहेत. बांधकाम व पाणीपुरवठा विभागाच्या सोबत जोडण्यात आलेल्या कामांच्या यादीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देवून त्याचप्रमाणे आस्थापना विषयक तरतुदी पाहता शासनाचे ७ वा वेतन आयोगाप्रमाणे वेतन प्रदान करणेस तसेच शहरातील पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या नाले सफाई व सक्शन पंप भाड्याने घेणेच्या रु.३ कोटीच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देवून निविदा मागविणेस ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सन २०१८-१९ चे सुधारित अंदाज व सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक**

**(आकडे लाखात)**

| तपशिल | 2018-19 (सुधारित अंदाज) | 2019-20 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 92658.28 | 170391.19 |
| एकूण खर्च | 92631.11 | 170375.69 |
| अखेरची शिल्लक | **27.17** | **15.50** |

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल** **अनुमोदक :- डॉ. सुशिल अग्रवाल**

सदर ठरावामध्ये सुचक श्री. अनिल विराणी व अनुमोदक श्री. दिनेश जैन ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.

दि. ०२/०३/२०१९ रोजीच्या मा. महासभेत सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूरीबाबत विषय असून सदर अंदाजपत्रकामध्ये शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे जॉगर्स पार्क विकसित करणेकामी आवश्यक निधीची तरतुद करुन स्वतंत्र लेखाशिर्षामध्ये (हेड) समाविष्ट करण्यात यावा.

मिरा भाईंदर शहरात विकसित करण्यात येणाऱ्या शहिद मेजर कौस्तुभ राणे जॉगर्स पार्क पूर्णपणे विकसित झाल्यास मिरा भाईंदर शहरात शहिदांच्या नावाचे जॉगर्स पार्क महापालिकेने विकसित केल्यास शहिदांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली वाहिली जाईल. अशी सुचना मांडत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | शिर्के अनंत गेणू | |
| ५ | सिंह मदन उदितनारायण | ५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ६ | भानुशाली वर्षा गिरधर | ६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ७ | यादव मिरादेवी रामलाल | ७ | सावंत अनिल दिवाकर | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ९ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ९ | घरत तारा विनायक | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | कदम अर्चना अरुण | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील अनिता जयवंत | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १३ | पाटील वंदना मंगेश | १३ | भट दिप्ती शेखर | |
| १४ | सोंस नीला बर्नाड | १४ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १५ | रावल मेघना दिपक | १५ | भोईर भावना राजू | |
| १६ | मोकाशी दिपाली आनंदराव | १६ | पाटील धनेश परशुराम | |
| १७ | जैन सुनिता रमेश | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | सय्यद नुरजहॉ नाझर हुसैन | |
| २२ | मुखर्जी अनिता बबलू | २२ | पाटील नरेश तुकाराम | |
| २३ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २४ | अहमद साराह अकरम | |
| २५ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २५ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २६ | म्हात्रे मोहन गोपाळ | २६ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २९ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३१ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३२ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३३ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३४ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३५ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३८ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३९ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४० | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४१ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४२ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४५ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४६ | कासोदारीया अश्विन शामजीभाई | | | |
| ४७ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४८ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४९ | खंडेलवाल सुरेश जगदिश | | | |
| ५० | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५१ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५२ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हसमुख गेहलोत :-**

ह्या सभागृहामध्ये सन्मा. सगळे सदस्य २०१७ ला निवडून आले. ते सगळे सन्मा. आहेत. महापौर मॅडम एक बात थी जो मैंने निवेदन आपको किया है उसके अंदर २०१७ में जितने भी नगरसेवक चुनके आए जिस तरीके से शहर बढते गया। उस तरीके से वॉर्ड बढते गया। उस तरीके से नगरसेवक भी बढते गए और आनेवाले समय में नगरसेवक और भी बढेंगे। उसी तरीके से महापौर मॅडम इस सभागृह के अंदर काफी नगरसेवक इस तरीके से है जो पदाधिकारी चुनके बैठे है और बने है वरिष्ठ भी नगरसेवक है और सन्मा. सभापती उपसभापती और हमारे मिरा भाईंदर महानगरपालिका के अंदर बहुत सारे ऐसे नगरसेवक है जो पहली बार सभापती बने है और पहली बार उप सभपती यहाँ पे पद दिया गया है। विषय यह था मॅडम की, मुझे भी तकलीफ होती है कहते है लेकिन इसी किसी की नगरसेवको की इच्छा है और जो पद पर है। बहुत बार ऐसा होता है की हम बता नही पाते है जो वरिष्ठ है जो पदाधिकारी है। वह अपने प्रोटोकॉल के हिसाब से बैठना चाहिए। उस तरीके से बैठ नही पाते है कोई आगे बैठते है, कोई पिछे बैठते है। तो मेरी आपसे निवेदन किया गया है वह प्रोटोकॉल के तरीके से उनको बिठाया जाए और ताकी उस सबका मान सन्मान बना रहे। आज वह पद पे है और कल पद पे ना रहे लेकिन आज की यथास्थिती यह है की अगर वह किसी पद पे बैठे है तो उनको कृपया करके प्रोटोकॉल से बिठाया जाए।

साथ में वह सभापती हो नगरसेवक हो या फिर जेष्ठ नगरसेवक हो। उनका मानसन्मान रखा जाए। यह आपसे गुजारीश है और आपको निवेदन किया गया है तो उसका खयाल रखिएगा।

**मा. आयुक्त :-**

चांगली सुचना आहे. माझी यामध्ये एकच बोलण राहील आपले जे गटनेते असतात पार्टी लेव्हलचे त्यांनी तो प्रोटोकॉल अजेंडा प्रत्येकाने तयार केला पाहिजे आणि सचिवांकडे तो दिला पाहिजे. सचिवाने ॲक्टनुसार पहिला पदाधिकारी उल्हासनगरमध्ये प्रत्येक चेअरला त्यांचा फोटो, त्याचे नाव आणि त्यांचे पद लावले जाते म्हणजे सगळ्यात पहिला सभागृहनेते त्याच्यानंतर स्थायी चेअरमन. जे काही पध्दत असेल सत्ताधाऱ्यांचे पहिले केले जाते.

**मा. महापौर :-**

पुढच्या सभेत तशाप्रकारचे प्रोटोकॉल............

**मा. आयुक्त :-**

सत्ताधाऱ्यांचे पहिला केले जातात. समजा सहयोगी सत्ताधारी असतील तर त्यांनी दोघांनी बसुन त्यांचा प्रोटोकॉल तयार करुन सचिवांकडे देतात आणि सचिव तपासून नियमाप्रमाणे ते लावतात आणि मग नंतर विरोधी पक्षांचे सुध्दा तसेच घेतले जाते. सहयोगी विरोधी पक्ष सदस्यांचे सगळ्यांचे घेतले जातात. सगळ्यांचे गटनेते पहिला येतात हे आपण जर केले तर आपण सगळ्यांनी बसुन सगळे गटनेते, महापौर आणि पदाधिकारी यांची एक बैठक करुन आपण हे धोरण निश्चित करुन घेऊ आणि त्याप्रमाणे आपण तसे ते बोर्ड लाऊन टाकू.

**मा. महापौर :-**

अगली महासभा के पहले ऐसी बैठक नियोजन करके प्रोटोकॉलके हिसाब से बैठने की व्यवस्था किया जाए।

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम आचार संहिता लागेल.......

**वर्षा भानुशाली :-**

कमिशनर साहेब माझी अशी सुचना आहे की, आता आचारसंहिता लागणार आहे त्याच्यामध्ये ह्या सभागृहाची पण थोडेसे रिपेअरींग करुन चांगली खुर्ची आणि माईक...................

**मा. महापौर :-**

सर्व करुन टाका.

**धृवकिशोर पाटील :-**

महानगरपालिकमध्ये ज्याप्रमाणे सिटींग अरेंजमेंट केली आहे साहेब त्या सिटींग अरेंजमेंटचा फोटो मी तुम्हाला व्हॉट्सअप करतो.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. जो श्रध्दांतलीचा प्रस्ताव होता तो कोणीतरी मांडा.

शोकप्रस्ताव :-

**धृवकिशोर पाटील :-**

पुलवामा जिल्ह्यामध्ये आपले सी.आर.पी.एफ. चे जवान जे शहिद झालेले आहेत. त्या शहिद जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्याकरिता आपण सगळ्यांनी दोन मिनिटे उभे रहावे.

**अनिल सावंत :-**

महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती, माजी मंत्री, माजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष सुसंस्कृत आदरणीय मा. श्री. शिवाजीराव देशमुख यांचे दि. १३/०१/२०१९ रोजी दुःखद निधन झाले. सामान्य माणूस आणि कार्यकर्ता यांच्याशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. सत्तेत असताना त्यांनी ग्रामीण विकासाला कायम महत्व दिले  मवाळ प्रवृत्तीचे सुसंस्कृतिक राजकारणी म्हणून ते कायम स्मरणात राहतील. या सभागृहातर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**नरेश पाटील :-**

मायोनिरिटीचे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्री. अखिल खरपी यांचे सुध्दा निधन झालेले आहे यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**जुबेर इनामदार :-**

ह्या सभागृहाचे सदस्य अशरफ शेख यांचे छोटे बंधु रिझवान मोहम्मद इब्राहिम यांचे दि. २८/१२/२०१८ रोजी आजारामुळे निधन झालेले आहे. मी त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**मा. उपमहापौर :-**

माजी मंत्री युनियन मिनिस्टर जॉर्ज फर्नांडिस साहेब यांचे ही निधन झालेले आहे तर त्यांचा ही शोकप्रस्ताव घेण्यात यावा.

**प्रविण पाटील :-**

माजी नगरसेवक श्री. मोहन जाधव व आजी नगरसेवक श्री. गणेश शेट्टी यांच्या वडिलांचे निधन झालेले आहेत त्यांचा ही मी शोकप्रस्ताव मांडतो.

**मा. उपमहापौर :-**

माजी परिवहन समितीचे सदस्य मुस्तफा पटेल यांच्या मातोश्री नुरजहाँ पटेल यांचे निधन झाले त्यांचाही शोकप्रस्ताव घ्यावा तसेच रफीक पटेल माजी आनंद पटेल यांच्या मिसेस हजेरीबाई यांचाही शोकप्रस्ताव घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

श्रध्दांजली देण्यासाठी सर्वांनी आपल्या जागेवर दोन मिनिटे शांत उभे रहायचे आहे.

**दुःखवठा ठराव क्र. १३६अ :-**

पुलवामा जिल्ह्यामध्ये आपले सी.आर.पी.एफ. चे जवान जे शहिद झालेले आहेत. त्या शहिद जवानांना श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती, माजी मंत्री, माजी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष सुसंस्कृत आदरणीय मा. श्री. शिवाजीराव देशमुख यांचे दि. १३/०१/२०१९ रोजी दुःखद निधन झाले. सामान्य माणूस आणि कार्यकर्ता यांच्याशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. सत्तेत असताना त्यांनी ग्रामीण विकासाला कायम महत्व दिले मवाळ प्रवृत्तीचे सुसंस्कृतिक राजकारणी म्हणून ते कायम स्मरणात राहतील. या सभागृहातर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात येत आहे. तसेच मायोनिरिटीचे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे श्री. अखिल खरपी यांचे सुध्दा निधन झालेले आहे यांना भावपूर्ण श्रध्दांजली. तसेच ह्या सभागृहाचे सदस्य अशरफ शेख यांचे छोटे बंधु रिझवान मोहम्मद इब्राहिम यांचे दि. २८/१२/२०१८ रोजी आजारामुळे निधन झालेले आहे. मी त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच माजी मंत्री युनियन मिनिस्टर जॉर्ज फर्नांडिस साहेब यांचे ही निधन झालेले आहे तर त्यांचा ही शोकप्रस्ताव घेण्यात यावा. तसेच माजी नगरसेवक श्री. मोहन जाधव व आजी नगरसेवक श्री. गणेश शेट्टी यांच्या वडिलांचे निधन झालेले आहेत त्यांचा ही मी शोकप्रस्ताव मांडतो. तसेच माजी परिवहन समितीचे सदस्य मुस्तफा पटेल यांच्या मातोश्री नुरजहाँ पटेल यांचे निधन झाले त्यांचाही शोकप्रस्ताव घ्यावा तसेच रफीक पटेल माजी आनंद पटेल यांच्या मिसेस हजेरीबाई यांचाही शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपण्याची वेळ दु. ०२.३० वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका